२००,००० प्रति आठ भाषांमध्ये!



## विश्वासाकरिता अन्न

पवित्रशास्त्रावर आधारित नियमावली

रिचर्ड ए.बेनेट यांनी वैयक्तिक पातळीवर मंडळ्यांमध्ये, सभांमध्ये आणि बायबल कॉलेजमध्ये अमेरिका, कॅनडा, युरोप आणि आफ्रिकेमध्ये 45 वर्षाहून अधिक काळ सेवाकार्य केले आहे. ट्रान्स वर्ल्ड रिडोओद्वारे त्यांनी 20 वर्षे जगभर पवित्र शास्त्राचे शिक्षण दिले. रिचर्ड आणि त्यांची पत्नी डॉरथी यांनी पुनरुत्थित ख्रिस्ताची ओळख अनेकांना व्हावी ही तळमळीची इच्छा आहे.

सर्वोत्कृष्ट लाभासाठी आत्मिक अन्न सेवन केले पाहिजे, ते पचविले पाहिजे आणि आत्मसात केले पाहिजे. डॉ. बेनेट यांनी ही प्रक्रिया अत्यंत सोप्या व परिणामकारक रीतीने विषद केली आहे.

डॉ. स्टीफन एफ् ओलफोर्ड

Authentic

ISBN-13: 978-81-7362-504-6
ISBN-10: 81-7362-504-2

Food for faith *(Marati)*

विश्वासाकरिता अन्न रिचर्ड ए.बेनेट

# विश्वासाकरिता अन्न



रिचर्ड ए.बेनेट

## *उपासना*

खरी उपासना म्हणजे पूर्ण मनाने व पूर्ण अंतःकरणाने देवाच्या पवित्र वचनातून प्रगट केलेल्या आपल्या सार्वभौम जिवंत प्रभु येशू ख्रिस्तावर नम्रपणे आपले ध्यान केंद्रित करणे होय. जेव्हा असे होते तेव्हा आपण उन्मळून पडतो व त्याला शरण जाऊन त्याची स्तुती करतो.

## *साक्ष*

जेव्हा पवित्र आत्मा हा पवित्र आत्म्याने भरलेल्या विश्वासणाऱ्याच्या जीवनातून भरभरून वाहावयास लागतो तेव्हा प्रभावी सुवार्ता गाजविल्या जाते. खऱ्या विश्वासणाऱ्याच्या जीवनातून मग त्याच्या आत वास करणारा ख्रिस्त प्रगट होऊ लागतो.

## *युद्ध*

जेव्हा तुम्ही देवाच्या वचनानुसार प्रार्थना करता तेव्हा तुम्ही देवाच्या इच्छेनुसार प्रार्थना करीत असता. सैतानावर तुम्ही विजय मिळवावा अशीच देवाची इच्छा असते. तुमचे पतन होऊ नये व तुमचे आत्मिक जीवन सुरक्षित असावे अशी देवाची इच्छा आहे.

# विश्वासाकरिता
# अन्न

# विश्वासाकरिता अन्न

***पवित्र शास्त्राधारित नियमावली***

देवासमोर सतत आणि जिवंत सहभागितेसंबंधी मार्गदर्शन

रिचर्ड ए. बेनेट

भाषांतर : सुभाष शिंदे

Authentic

HYDERABAD • COLORADO SPRINGS • LONDON

*Vishwaasaakarithaa Anna*
(Marathi)

**Food for Faith**
by Richard A.Bennett
Copyright © 1994, 1998 by Cross Currents Intl. Ministries

First Marathi edition 2006
Revised edition 2007
ISBN-13: 978-81-7362-504-6
ISBN-10: 81-7362-504-2

Published by Authentic India

India P. O. Box 2190, Secunderabad 500 003, Andhra Pradesh.
www.authenticindia.in

UK 9 Holdom Avenue, Bletchley, Milton Keynes, MK1 1QR, UK
www.authenticmedia.co.uk

USA 1820 Jet Stream Drive, Colorado Springs, CO 80921, USA.
www.authenticbooks.com

All rights reserved.
No part of this publication may be reproduced in any form or by any means, electronic, or mechanical, including photocopying, recording, or any information storage and retrieval system, without permission in writing from the publisher.

The sociological, political, doctrinal views of the author may not necessarily be those of the publisher.

Authentic Books is an imprint of Authentic India, the publishing division of STL OM Books India.

मी आणि माझ्या पत्नीबरोबर माझ्या ज्या विश्वासू सहकाऱ्यांनी आमच्या सेवाकार्यात क्रॉस करंट्स इंटरनॅशनल मिनिस्ट्रीद्वारे श्रम केले त्या सर्वांना प्रभु येशू ख्रिस्ताच्या नामांत हे पुस्तक समर्पित केले आहे.

क्रॉस करंट्स इंटरनॅशनल मिनिस्ट्री आणि इंटरनॅशनल प्रिझन मिनिस्ट्रीद्वारे 'विश्वासाकरिता अन्न' हे पुस्तक इतर भाषेतही प्रकाशित करण्यात आले आहे. पुढील सेवाकार्यासाठी भाषांतराचे काम अद्याप चालू आहे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | दोन शब्द | 11 |
| | प्रस्तावना | 13 |
| १. | रोजचा आनंद | 21 |
| २. | मस्तक आणि हृदय | 31 |
| | मस्तक | 34 |
| | हृदय | 37 |
| ३. | प्रार्थनापूर्वक तयारी | 45 |
| | गुडघे टेका | 48 |
| | हृदय उघडा | 50 |
| | माझा स्वर्गीय दृष्टीकोन | 63 |
| | माझी जगिक समस्या | 68 |
| ४. | एकत्रित समय | 77 |
| | आज्ञाधारकपणाची कृती | 79 |
| | विश्वासाचा प्रतिसाद | 82 |
| | उपासनेतील खरेपणा | 86 |
| | विरोधकापासून सावधान | 88 |
| ५. | विश्वासाचा मुद्दा | 99 |
| ६. | सांगण्याचा समय | 111 |
| | ओतप्रोत सुवार्ता प्रसार | 115 |

| | | |
|---|---|---|
| ७. | फळ अथवा अग्नी | 123 |
| | कोरा कागद | 126 |
| | वायफळ वर्षे | 128 |
| | अनंत प्रकाश | 130 |
| ८. | या आणि जेवा | 133 |
| | परिशिष्ट | 150 |
| | अ. शास्त्राभ्यास | 150 |
| | ब. एकत्रित समय | 151 |
| | क. रोजचे प्रार्थनेचे मार्गदर्शन | 152 |

# दोन शब्द

डॉ. रिचर्ड ए. बेनेट यांचे 'विश्वासाकरिता अन्न' हे नवे पुस्तक प्रशंसेस पात्र आहे. 'तुमचा देवाचा शोध' या त्यांच्या अगोदरच्या पुस्तकाचा हा सुरेख असा पुढील भाग आहे. विश्वासाशिवाय मनुष्य देवाजवळ येऊ शकत नाही (इब्री 11:6). विश्वासाशिवाय मनुष्य देवाकरिता जगू शकत नाही (रोम 1:17). हे शक्य करण्यासाठी विश्वासाचे भरण–पोषण सुरुवातीपासूनच केले पाहिजे (रोम 10:17). तो टिकवण्यासाठीही तशीच गरज आहे (1 पेत्र 2:1–3; इब्री. 5:12–14). प्रभु येशूने हीच गोष्ट सरतेशेवटी स्पष्ट केली आहे. तो म्हणतो, ''मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल'' (मत्तय 4:4). यापूर्वी यिर्मयानेही म्हटले आहे, ''मला तुझी

वचने प्राप्त झाली ती मी स्वीकारली, तुझी वचने माझा आनंद, माझ्या जिवाचा उल्लास अशी होती. कारण हे परमेश्वरा, सेनाधीश देवा, तुझे नाम घेऊन मी आपणास तुझा म्हणवितो'' (यिर्मया 15:1**6**).

भरपूर लाभ होण्याकरिता आध्यात्मिक अन्न प्रथम रूचकर वाटले पाहिजे, नंतर ते ग्रहण केले पाहिजे व नंतर ते आत्मसात केले पाहिजे. जेव्हा आपण देवाशी 'एकत्रित' होतो तेव्हा ही प्रक्रिया कशी घडत जाते हे डॉ. बेनेट यांनी छान विषद केले आहे. या संदर्भात आठवे प्रकरण फार उपयुक्त असे आहे.

आजच्या धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेमध्ये, सर्वसामान्य ख्रिस्ती मनुष्याचा बुद्धिभ्रंश केला जात आहे की, अंतःकरणात वास करणाऱ्या ख्रिस्तावर विश्वासाने विसंबून राहाण्याची गरज नाही (गलती 2:20). 'विश्वासाकरिता अन्न' हे पुस्तक म्हणजे आम्हासाठी स्वर्गातून पाठविण्यात आलेला संदेशच आहे. ह्या पुस्तकाद्वारे जे मोठे सेवाकार्य घडणार आहे ते देवबाप आशीर्वादित करो.

डॉ. स्टीफन एफ. ओल्फोर्ड
मेम्फिस, टेनेसी

# प्रस्तावना

मी आणि माझी पत्नी आमच्या लग्नाचा पंचविसावा वाढदिवस साजरा करतांना मी ‘तुमचा देवाचा शोध’ हे पुस्तक लिहिले. त्या पुस्तकाचा पुढील भाग म्हणजे ‘विश्वासाकरिता अन्न’ हे पुस्तक होय. आमच्या त्या लग्नवाढदिवसाच्या उपकारस्तुतीसाठी म्हणून मी ते पहिले पुस्तक लिहिले व ते छापून प्रकाशित केले.

‘तुमचा देवाचा शोध’ या पुस्तकाच्या पंचवीस हजार प्रति पहिल्या आवृत्तीत काढण्यात आल्या. तेव्हापासून देवाने आमच्या या समर्पणाला खूप आशीर्वादित केले आहे.

आज त्या पुस्तकाच्या तीन दशलक्ष प्रति पन्नास भाषांमध्ये जगभर प्रसृत झाल्या आहेत. अजूनही त्या पुस्तकाच्या प्रतींची मागणी सतत वाढत आहे. हे पुस्तक वाचून अनेक जणांचा नवा जन्म झाल्यासंबंधीच्या बातम्या खरोखर फार आनंददायक आहेत.

नंतर आम्ही आमचा पस्तीसावा वाढदिवस साजरा करणार होतो! या दरम्यान सुवार्तेसाठी आणि 'तुमचा देवाचा शोध' या पुस्तकासाठी दरवाजे उघडले गेले व दहा वर्षापूर्वी या पुस्तकाला एवढी मागणी येईल असे आम्हाला मुळीच वाटले नव्हते. त्यामुळेच आपल्या सर्वसमर्थ स्वर्गीय पित्याचे अधिक गौरव व्हावे म्हणूनच आम्ही 'विश्वासाकरिता अन्न' हे पुस्तक लिहिण्यास प्रवृत्त झालो. 'तुमचा देवाचा शोध' या पुस्तकामुळे जसा अनेक जणांना आशीर्वाद मिळाला तसाच याही पुस्तकामुळे अनेकांना ख्रिस्तात नवजीवन प्राप्त होवो हीच देवबापाजवळ मी प्रार्थना करतो.

'तुमचा देवाचा शोध' या पुस्तकाचा 'विश्वासाकरिता अन्न' हा केवळ पुढील भागच आहे असे नाही. माझा आणि डॉरथीचा असा विश्वास आहे की हे पुस्तक वाचल्यानंतर अनेकांचा ख्रिस्ताशी निगडीत संबंध जडेल. हे पुस्तक अगदी कळकळीची प्रार्थना करूनच लिहिले गेले आहे; यासाठी की प्रत्येक वाचकाला ते वाचल्यानंतर सहाय्य प्राप्त होऊन त्याला खरे ख्रिस्ती जीवन जगणे शक्य व्हावे.

'विश्वासाकरिता अन्न' ह्या पुस्तकाचे वरवर वाचन केले जाऊ नये. तसेच ते कसेतरी वाचून बाजूला सारले जाऊ नये. ते विचारपूर्वक वाचल्यानंतर एक मार्गदर्शक म्हणून आपल्या हाताशी नेहमी असावे. या पुस्तकातील तत्वे विश्वासपूर्वक आपल्या जीवनातून राबविली गेली म्हणजे देवाबरोबर रोज रोज चालणे आपल्याला शक्य होईल.

आपल्या शरीराची वेळोवेळी 'तपासणी' करणे हे शहाणपणाचे असते असे अनेकजण मानतात. यासाठी आपल्याला वेळ व

पैसाही द्यावा लागतो. तपासणी दरम्यान डॉक्टर जे प्रश्न विचारतात त्यावरून रोगाचे निदान होते व पुढील उपचार सुलभ होतात. ख्रिस्ती लोकांसाठी सुद्धा अशा ‘आत्मिक तपासणीची’ गरज असते. यासाठी पारदर्शी प्रामाणिकपणा व वेळेची गरज असते. देवाबरोबर एकटे काही काळ येण्याची गरज असते. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी उपयुक्त प्रश्न दिले आहेत त्याद्वारे तुमची ‘आत्मिक तपासणी’ करणे तुम्हाला सोयीचे होईल. काही प्रश्नांमुळे कदाचित तुम्ही भंडावूनही जाल. लक्षात ठेवा, शारीरिक तपासणीच्या वेळी दुखणाऱ्या भागातच रोगाचा प्रादुर्भाव झालेला आढळतो.

हे पुस्तक लिहीत असतांना एक प्रसंग मला माझे स्वर्गवासी मित्र डॉ. जे. अेडवीन ओर यांनी सांगितला. एकदा एका प्रख्यात वक्त्याला ‘मध्यस्थीच्या प्रार्थना’ या विषयावर बोलण्यास निमंत्रित करण्यात आले होते. अेडविनने ज्या वक्त्याला यासाठी निमंत्रण ध ाडले होते ते त्याने नाकारले. एका प्रार्थनागटाच्या प्रार्थनेसाठी त्याला जावयाचे होते हे कारण त्याने सांगितले. तसेच त्याने त्याच्या पत्रात नमूद केले की प्रार्थनेसंबंधी त्याच्याकडे फार सुंदर संदेश आहे व जमल्यास तो पुढील वेळी देण्यास तो तयार आहे! प्रार्थनेसंबंधी लिहिणे किंवा बोलणे किती सोपे आहे; पण प्रार्थना करणे मात्र कठीण आहे. मी जे लिहितो तो कोणी एक मोठा लेखक म्हणून लिहीत नाही तर एक भुकेजलेला दुसऱ्या भुकेजलेल्यास भाकर कोठे मिळेल हे जसे सांगेल तसेच काहीसे माझे आहे.

‘विश्वासाकरिता अन्न’ हे पुस्तक लिहिण्यास माझी पत्नी डॉरथी हिने मला प्रोत्साहन दिले; एवढेच नव्हे तर देवाबरोबर मी एकांतात

राहावे यासाठी तिने मला वेळ व प्रेरणा दिली. डॉरथीला प्रथम भेटण्यापूर्वी सी.टी. स्टड यांची एक सुंदर प्रार्थना माझ्या वाचनात आली. तिचा गोषवारा साधारण असा होताः 'हे प्रभु, तू माझ्याकरिता पत्नी नेमलेली असेल तर ती अशी असू दे की जेव्हा मी निराश होऊन एखादी गोष्ट करण्याचे सोडून देईन तेव्हा तिने मला लालभडक सळईने डागण्या द्याव्यात!'' अशी पत्नी लाभणे हे खरेच किती भाग्याचे असते! देवाची स्तुती असो.

ख्रिस्तातील माझे पित्यासमान असे डॉ. स्टीफन ओलफर्ड यांनी मला ख्रिस्ताकडे सुमारे पन्नास वर्षापूर्वी आणले. त्यावेळी स्टीफन यांनी मला पवित्रशास्त्राचे नियमित वाचन व प्रार्थना यांचे किती महत्व आहे पटवून दिले होते.

या पुस्तकामध्ये प्रगट केलेले अनेक विचार हे देवाच्या वचनावर आधारित असे आहेत. त्यामधील काही सत्ये ही देवाने जी अनेक माणसे माझ्या मार्गात आणली त्यांच्या पवित्र शास्त्राच्या दृष्टीकोनातून मला समजली. या लहानशा पुस्तकात अशा अनेक लोकांची नावे उद्घृत करणे कठीण आहे. अर्थात अशा प्रत्येक व्यक्तीसंबंधी मी देवाचे गौरव करतो.

हे पुस्तक प्रसिद्ध होतांना, मी पौलाचा मानसपुत्र तीमथ्य याला त्याने जे म्हटले तेच मीही मान्य करतो –''ज्या गोष्टी तूं पुष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या त्या इतरांना शिकविण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे'' (२ तीमथ्य 2:2).

विश्वासणाऱ्यांनी प्रभु येशूची सहभागिता सतत आनंदाने साध ावी या हेतूने हे पुस्तक लिहिले असले तरी काही जण असेही असू

शकतील की ज्यांना पापक्षमेचा आनंद अद्याप उपभोगता आला नसेल आणि सार्वकालिक जीवनाची अलौकिक खात्री पटली नसेल. जर तुम्ही या प्रकारात मोडत असाल तर मी तुम्हाला विनंती करतो की तुम्ही योहानाचे शुभवर्तमान वाचा. या शुभवर्तमानातून तुम्हाला कसे सहाय्य मिळेल याचे प्रत्यंतर येईल. 'येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्ही विश्वास ठेवावा आणि विश्वास ठेवून तुम्हाला त्याच्या नावाने जीवन प्राप्त व्हावे म्हणून ही लिहिली आहेत' (योहान 20:31).

- आर.ए.बी.

# विश्वासाकरिता
# अन्न

*तुझी वचने माझ्या जिभेला किती मधुर लागतात! माझ्या तोंडाला ती मधापेक्षां गोड लागतात....*
*ह्यामुळें मी तुझ्या आज्ञा सोन्यापेक्षा, बावनकशी सोन्यापेक्षा प्रिय मानितो.*

*स्तोत्र ११९:१०३,१२७*

प्रकरण १

# रोजचा आनंद

काही दिवसांपूर्वी एका सुंदर ख्रिस्ती स्त्रीने मला विनंती केली, ''प्रभुबरोबर माझी गाढ सहभागिता व्हावी यासाठी कृपया प्रार्थना करा''. व्यक्तीपरत्वे सहभागितेचे प्रमाण भिन्न भिन्न असते आणि प्रभु येशूबरोबर बसणारी ख्रिस्ती लोकांची सहभागिता ही वेगवेगळ्या प्रमाणात असते.

मानवी नातेसंबंधात भावनिक ऐक्य फुलण्यासाठी वैचारिक समतोल, जीवन मूल्यांची देवघेव, समान असणाऱ्या आवडीसंबंधी आनंद, मनमोकळेपणे बोलणे आणि मनांचे योग्य प्रकारे मीलन होणे यांची गरज असते.

उदाहरणार्थ, नुकतेच मला आणि डॉरथीला एक अत्यंत आनंददायक पत्र मिळाले. ते दोन आफ्रिकन व्यक्तींनी लिहिले आहे. त्या पत्रात त्यांनी लिहिले, ''कालच आम्ही आमच्या बेबी डॉरथीला दवाखान्यातून घरी आणले. आमची बेबी डॉरथी तीन किलो म्हणजे जवळ जवळ साडे सहा पौंडाची असून ती आमच्या घरी अगदी सुखरुप पोहंचली

आहे. ‘‘त्या दोघांना आणि त्यांच्या कुटुंबियांना किती अवर्णनीय आनंद झाला असेल.

जेव्हा आई-बाप आपल्या नूतन जन्मलेल्या बालकाला घरी घेऊन येतात तेव्हा त्यांचा आनंद किती भरभरून ओसंडतो हे आपण समजू शकतो. ते बालक जसजसे वाढत जाते तसतसा तो आनंद वाढत जातो. जेव्हा ते बालक पहिल्यांदाच पाय झाडू लागतो व हसू लागते तेव्हा आपल्याला किती सुखद वाटते. ती इवलीशी बोटे, ते छोटे छोटे गुडघे, मग ती मनमोहक हालचाल आणि सर्वांत आनंदाचा क्षण म्हणजे त्याने उच्चारलेले ‘मम्मा, पापा’ हे शब्द !

या लहान बालकाची होत जाणारी वाढ ही मानवी बुध्दीला तशी अगम्यच आहे. आणि नवीन जन्म पावलेली व्यक्ती ही अशीच विलोभनीय असते. त्या व्यक्तीने आत्मिक जन्मापासून आत्मिक प्रौढत्वाकडे झेप घेतलेली असते.

परंतु दुर्दैवाने कधी कधी असे दिसून येते की जन्म झाल्याचा आनंद हा फारच वेगळे वळण घेतो व ते बाल प्रौढ होईतो काहीही घडू शकते. त्या बेबी डॉरथीचा जन्म झाल्याचे पत्र आम्हाला आले त्याच आठवड्यात सिनसिनाटी येथे राहणाऱ्या आमच्या मित्राची एकवीस वर्षाची मुलगी मरण पावल्याची दुःखद बातमी माझ्या आणि डॉरथीच्या कानावर आली. त्या एकवीस वर्षांमध्ये त्या मुलीची शारीरिक, मानसिक वाढ झाली नव्हती. तिच्या आईवडिलांनी त्या मुलीचे नाव कॅरल जॉय (आनंदाचे गीत) असे ठेवले होते. जेव्हा ती कॅरल एकवीसाव्या वर्षी मेली तेव्हा देखील ती बेबी कॅरलच होती - एकवीस वर्षाची बेबी कॅरल! आपल्या आईवडिलाशी बोलण्याची तिची कुवतच नष्ट झाली

होती. मानवी दृष्टीने तिच्या आयुष्याचा असा प्रवास क्लेशदायक होता.

ज्याप्रमाणे कॅरलची बाल्यावस्था तशीच राहिली त्याप्रमाणे काही ख्रिस्ती लोकांची आध्यात्मिक वाढ खुंटलेली असते व ते आध्यात्मिक बाल्यावस्थेतच राहतात. ते जरी अनेक वर्षे ख्रिस्ती म्हणून जगत असले तर प्रभुमध्ये त्यांची वाढ झालेली नसते. देवाने खरेतर आध यात्मिक अन्नाची तरतूद केलेली आहे. ते अन्न जर आपण योग्य रीतीने ग्रहण केले तर जे नव्याने जन्मलेले आहेत त्यांची आध्यात्मिक वाढ योग्य प्रकारे होऊ शकते.

आध्यात्मिक वाढ होण्यासाठी पवित्र शास्त्र हेच देवाने आपल्यासाठी सिद्ध केलेले अन्न आहे. ते आपण ग्रहण केले नाही तर आपली आध्यात्मिक वाढ खुंटते.

आध्यात्मिक बाल्यावस्थेतून तुमची पुढे नीट वाढ व्हावयाची असेल, आध्यात्मिक दृष्ट्या तुमचे तारुण्य बळकट व्हावयाचे असेल आणि आध्यात्मिक प्रौढत्व तुम्हाला हवे असेल तर दररोज तुम्हाला आध्यात्मिक अन्नाची म्हणजेच पवित्र शास्त्र वचनांची फार गरज आहे. पवित्र शास्त्र केवळ एक कर्तव्य म्हणून वाचू नये अशी देवाची इच्छा आहे. तर त्यामुळे आपल्या जीवनात रोज आनंद फुलला पाहिजे. प्रत्येक क्षुधित ख्रिस्ती व्यक्तीला या अन्नसेवनामुळे आनंद प्राप्त होतो.

देवाचे वचन हे खरेच ह्या आनंदाचा उगम आहे. ते अन्न कसे पचवावे याची तुम्हाला जाण आली की तो आनंद अधिक वाढत जातो.

ज्यांना आध्यात्मिक अन्नाची ओढ लागलेली आहे त्यांच्यासंबंधी

देव यशया संदेष्ट्याद्वारे बोलला की त्यांनी त्याच्याबरोबर भोजनास बसावेः

“अहो तान्हेल्यांनो, तुम्ही सर्व जलाशयाकडे या. जवळ पैका नसलेले तुम्ही या. सौदा करा, खा, या पैक्यावाचून व मोलावाचून द्राक्षरसाचा व दुधाचा सौदा करा...... कान द्या, मजकडे या, ऐका म्हणजे तुमचा जीव वाचेल आणि मी तुम्हाबरोबर सर्वकाळचा करार करीन म्हणजे दावीदाला देऊ केलेले अढळ प्रसाद तुम्हास देईन” (यशया ५५:१-३).

देवाचे वचन थेट वाचल्यामुळे काही जणांना त्याचा पुरेसा अर्थबोध होत नाही. प्रत्यक्ष पवित्रशास्त्र वाचण्याऐवजी त्यांना पवित्रशास्त्रासंबंधी इतर पुस्तके वाचणे आवडते. तुमच्या हातात असलेले हे पुस्तक पवित्रशास्त्राचे स्पष्टीकरण नाही. परंतु त्यामुळे तुम्ही पवित्र शास्त्र वाचण्यासाठी प्रवृत्त मात्र व्हावे अशी अपेक्षा आहे. त्यामुळे मग तुम्हाला आपोआपच पवित्र वचनांचे स्पष्टीकरण मिळेल. परिणामी तुम्हाला तुमच्या स्वर्गीय पित्याची सहभागिता अगदी सहजपणे आणि आनंदाने उपभोगता येईल.

ज्या लोकांनी नुकतेच पवित्र शास्त्र हे आध्यात्मिक अन्न स्वीकारण्यास सुरुवात केली त्यांना मी नेहमी सुचवत असतो की :

जे तुम्हाला समजते ते वाचा मग तुम्ही तुम्हाला न समजणाऱ्या वचनांकडे याल. सतत वाचत राहा. मग थोड्या वेळाने तुम्हाला जो भाग समजत नव्हता तो समजू लागेल. हळूहळू तुम्हाला जे समजले त्यामधूनच तुम्हाला न समजलेला भाग समजावयास लागेल.

यातून तुम्हाला काही बोध होतो कां? थोडक्यात म्हणजे वाचन थांबवू नका.

लोक वाचनालयात, वर्गामध्ये किंवा हॉलमध्ये वाचन करीत असतात. त्यामुळे त्यांना विचारांचे खाद्य मिळत असते. जर आपण त्याच पद्धतीने पवित्र शास्त्राचे वाचन केले तर आपल्याला केवळ 'विचारांचे खाद्य मिळेल. परंतु पवित्र शास्त्र आपल्याला सूचना करते ज्ञान फुगविते, प्रीति उन्नति करिते' (१ करिंथ ८:१).

देवाचे वचन कसे पचवावे हे आपल्याला समजल्याखेरिज, पवित्र शास्त्रातील ज्ञानाने आपण फुगून जातो व आपल्या ज्ञानाचा डंका वाजवू लागतो. आपण आपल्या आध्यात्मिक वाढीस त्यामुळे बाध ा आणतो. आपल्या दररोजच्या देवाच्या सानिध्यामुळे आपण केवळ ज्ञानार्जनाच्या मागे लागू नये तर त्याच्या मेजावरील अन्न आपण आपल्या विश्वासाकरिता मिळविले पाहिजे.

जे लोक पवित्र शास्त्राचा अभ्यास केवळ ज्ञानार्जनासाठीच करतात त्यांच्यापेक्षा ते विश्वासणारे अधिक आनंदी असतात ज्यांना पवित्र शास्त्रवचनांच्या द्वारे त्यांच्या आध्यात्मिक पोषणासाठी सुंदर आत्मिक अन्न मिळत असते. जीवन कसे वृद्धी पावत आहे याचा सुखद अनुभव त्यांना रोज येतो. देवाचे सानिध्य, खरेपणाची उपासना आणि त्या उपासनेतून मिळणारी सुंदर फळे असा लाभ त्यांना होतो. नंतर असे लोक स्वकेंद्रित न राहता ते सतत देवाचा विचार करतात.

नवा जन्म झालेल्या देवाच्या प्रत्येक बालकाला, देवाकडे विश्वासाने

जाण्यास व पवित्रशास्त्रासह वैयक्तिकरित्या देवासमीप येण्यास मिळणारी संधी अप्रतिमच असते.

तुम्हाला कदाचित एक प्रश्न पडला असेल. प्रभु येशू ख्रिस्ताच्या प्रितीत माझी छान वाढ होण्यासाठी पवित्र शास्त्र वाचण्याची माझ्याकरिता उत्तम पद्धत कोणती आहे? याचे गमक आपण ज्याला 'एकत्रित समय' म्हणतो त्यामध्ये आहे. अर्थात हा एकत्रित समय म्हणजे आपल्या प्रभुच्या समवेत खर्च करावयाचा समय.

'एकत्रित समय' म्हणजे हा आपल्या जिवंत प्रभुशी असलेला सुसंवाद आहे. देवाचे वचन म्हणजे पवित्र शास्त्रातून देव त्याच्या लेकरांशी बोलतो. जर देव काय बोलत आहे याला आपण योग्य प्रतिसाद देणार असलो तर आपण योग्य प्रकारे प्रार्थना कशी केली पाहिजे हे आपल्याला कळेल व त्याबद्दल आपण निश्चित आशावादी असू शकतो.

'योग्य प्रकारे' प्रार्थना म्हणजे आपली प्रार्थना देवाच्या वचनावर आधारित असावी. आपल्या अंतःकरणातील विचारांची वचनाशी सांगड घातली पाहिजे. अशी प्रार्थना ही साचेबंद नसते. परंतु जेव्हा आपण वचनाधारीत प्रार्थना करतो तेव्हा प्रभुबरोबर असलेली आमची सहभागिता खूप आनंददायक असते. त्यामुळे आपण जीवनात त्याचा काय हेतू आहे याचीही आपल्याला जाण येऊ लागते.

देवाची इच्छा माझ्या इच्छेप्रमाणे वळविणे ही खरी प्रार्थना नाही. उलट माझी इच्छा म्हणजे देवाची इच्छा असणे हीच खरी प्रार्थना होय. इस्त्राएल लोकांना यार्देन नदी पार करून यहोशवाने पलीकडे नेले. नदीला पूर आला होता पण चमत्कार घडला आणि ते सर्व नदीपार झाले. तेव्हा यहोशवाला एक 'अज्ञात' मनुष्य भेटला. कनान

देश जिंकावयाचा हा यहोशवाचा मुख्य हेतू होता व देवाच्या इच्छेप्रमाणे तो देश मुर्तीपासून मुक्त करावयाचा होता. त्या अज्ञात मनुष्याच्या हाती उपसलेली तरवार होती. त्याला यहोशवाने सवाल केला, 'तूं आमच्या बाजूचा आहेस की शत्रूच्या बाजूस आहेस?' त्या अज्ञात मनुष्याने 'नाही' असे उत्तर दिले. म्हणजे हे ही नाही आणि तेही नाही. यावरून यहोशवाने ताडले की तो कोणाच्याही पक्षाचा नाही. मग त्या मनुष्याने जे उत्तर दिले त्यावरून यहोशवाला बोध झाला - "देवाच्या सैन्याचा सेनापती म्हणून मी इथे आलो आहे".

या क्षणी यहोशवाला समजून चुकले की तो अज्ञान मनुष्य कोणाची बाजू घेण्यासाठी नव्हे तर परिस्थिती काबूत ठेवण्यासाठी आला आहे. यहोशवा पालथा पडला आणि त्याला समजले की तो देवाच्या सैन्याच्या सेनापतीच्या समवेत आहे. "ज्या जागी तू उभा आहेस ती पवित्र आहे" (यहोशवा ५:१३-१५).

असेच आपल्या रोजच्या प्रार्थनेच्या समयी आपण आपल्या वैयक्तिक गोष्टी प्रभुसमोर मांडू नयेत. उलट आपण नम्रपणे त्याला आपल्याकडून नेमके काय हवे आहे, त्याची अपेक्षा, त्याचा हेतू आणि त्याचे सामर्थ्य याचा आपण विचार करावा.

वचनानुसार प्रार्थना करणे म्हणजे देवाची योजना, व त्याची इच्छा काय आहे हे जाणून त्यानुसार प्रार्थना करणे होय. जेव्हा आपण वचनानुसार प्रार्थना करतो तेव्हा आमची इच्छा ही देवाची इच्छा बनते.

जेव्हा तुम्ही देवाची इच्छा काय हे जाणून कळकळीने प्रार्थना करता तेव्हा तुमची आध्यात्मिक वाढ होते. "आपला प्रभु व तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या कृपेत व ज्ञानात वाढत जा" (२ पेत्र ३:१८).

आपण या अगोदर पाहिलेच आहे की यशया म्हणतो तसे आपण आपले कान देव काय म्हणतो याकडे लावले तर तो काय म्हणतो हे ऐकून आपण आनंदित होऊ.

## आध्यात्मिक तपासणी

१. मी किती दिवसांपासून नवा जन्म पावलेला ख्रिस्ती आहे?

२. देवाची सहभागिता आज मला जेवढी आनंददायक वाटते तेवढी यापूर्वी कधी वाटली होती कां?

३. माझे आजचे जीवन व पांच वर्षापूर्वीचे जीवन या तुलनेत देवाच्या सानिध्यात मी जास्त वेळ घालवतो काय ?
माझी इच्छा आणि देवाचे मार्गदर्शन यातील भेद मला समजतो काय?

*हे प्रभू, मला ऐकण्यास शिकव. सभोवार खूप गोंधळ आहे. माझ्या कानावर सतत आदळणाऱ्या आवाजामुळे माझे कान बधीर झाले आहेत. त्या शमुवेल बाळाप्रमाणे मलाही असा आत्मा दे की तो तुला म्हणाला, 'बोल, तुझा सेवक ऐकत आहे,' तुझी वाणी माझ्या हृदयात निनादू दे. तुझ्या वाणीचा मला सराव होऊ दे. या जगातील सर्व आवाज नष्ट होऊन केवळ तुझाच आवाज मला ऐकू येऊ दे. तो तर मला मंजूळ ध्वनीसारखा आहे. आमेन*

ए.डब्ल्यू. टोझर

प्रकरण २

# मस्तक आणि हृदय

काही वर्षांपूर्वी केनीया येथे मला व माझी पत्नी डॉरथीला, पाळकांच्या एका मोठ्या गटाला व त्यांच्या बायकांना देवाचे वचन सांगण्याची सुसंधी लाभली. ती सभा संध्याकाळी ७:०० वाजताच सुरू होणार होती. म्हणून बरेच पाळक दुपारी ४:०० वाजताच त्यांच्या घरातून बाहेर पडले. पवित्रशास्त्रातून नवीन काही शिकावयास मिळेल या भावनेने ते प्रखर उन्हात पायीपायीच रस्ता तुडवत दूरवर निघाले होते. ऊन इतके तापदायक होते की तेथील शेतीसुद्धा पूर्ण करपली होती.

तेथे आलेल्या राष्ट्रीय पातळीवरील पाळकांपैकी ६० ते ७० टक्के पाळकांजवळ पवित्र शास्त्र नाही हे आम्हाला समजल्यावर धक्काच बसला. त्यामधील बऱ्याच जणांचे परिवर्तन दोन-तीन वर्षांपूर्वी झाले होते. त्यांच्या ज्वलंत साक्षीमुळे आफ्रिकेच्या छोट्या मंडळ्यांमध्ये संजीवन निर्माण झाले होते.

सभा सुरू होण्यापूर्वी आम्ही प्रत्येक पाळकाच्या हातात एकेक पवित्र शास्त्र दिले. त्यानंतर बरेच दिवस मी त्यांना शिक्षण देत होतो. मी त्यांना म्हटले, ‘‘आता तुमच्या हातामध्ये पवित्र शास्त्र दिले आहे. परंतु ते तुमच्या हाताकडून तुमच्या मस्तकापर्यंत गेले तरच त्याचा उपयोग होईल! परंतु तेवढे करूनही भागणार नाही. तुम्हाला अधिक आशीर्वाद मिळण्यासाठी अधिक काही केले पाहिजे. ते म्हणजे देवाचे वचन तुमच्या हृदयात शिरले पाहिजे. तरच ह्या सभेमुळे तुम्हाला मोठा लाभ होणार आहे. म्हणून पवित्र शास्त्र तुमच्या हाताकडून मस्तकापर्यंत व मस्तकाकडून हृदयाकडे पोहंचणे हे अत्यावश्यक आहे.’’

मी कुमार वयाचा असतांना ख्रिस्ताकडे ज्या घरात वळलो ते इंग्लंडमधील घर मी नुकतेच पाहिले. आमच्या त्या घरापासून थोड्या अंतरावर दिव्याचा एक खांब होता. त्याच खांबाखाली चौदा वर्षांचा बॉब फ्लिंट ख्रिस्ताकडे वळला होता. त्याच्या परिवर्तनामुळे त्याचे सगळे जीवनच बदलले. त्याने शाळा सोडली होती आणि बांधकामावर मजूर म्हणून तो काम करीत होता. तो तरुण होता तेव्हा तो फार हुशार नव्हता!

तरीही जेव्हा बॉब ख्रिस्ती झाला तेव्हा मी त्याला सांगितले की कामाला जाण्यापूर्वी त्याने राज प्रार्थना करूनच घराबाहेर पडावे. त्याला कोणत्याही मंडळीचा त्यापूर्वी कसलाच अनुभव नव्हता, तरीही देवाच्या वचनाद्वारे त्याने आपले आत्मिक पोषण केले. रोज तो देवाबरोबर एकत्रित समय घालवीत होता.

नंतर सतराव्या वर्षी त्याने पवित्र शास्त्राभ्यासाकरिता पत्राद्वारे शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी आपले नाव नोंदविले. दानिएलच्या

पुस्तकाच्या अभ्यासक्रमात त्याने अत्यंत उत्तम गुण मिळविले! अठराव्या वर्षी तो सैन्यात भरती झाला हे ऐकून मला खूप आनंद वाटला. तेथे ही तो परमेश्वरासंबंधी खूप आवेशी होता. 'बूट कॅम्प' मध्ये असतांना तो त्याच्या सतरा सैनिक मित्रांसोबत मनापासून प्रार्थना करीत असे. मग त्या सर्व सतरा सैनिकांनीही ख्रिस्ताचा स्वीकार केला. सैन्यातून मुक्त झाल्यानंतर बॉबने सेवाकार्य करण्याचे ठरविले. परंतु तो जर्मनीला विमानाने जात असतांना विमान दुर्घटनेत त्याचा अंत झाला व तो ख्रिस्तात झोपी गेला.

बॉबच्या थैलीतील शुभवर्तमानाचे ट्रॅक्ट्स अपघातस्थळी इतस्तः विखरून पडले होते! बॉबच्या हातातून देवाचे वचन त्याच्या मस्तकात गेले होते आणि नंतर त्याच्या मस्तकातून ते त्याच्या हृदयात पोहंचले होते, एवढेच नव्हे तर देवाचे वचन आता त्याच्या हृदयापासून इतरांच्या हृदयापर्यंत पोहंचले होते. बॉब मरण पावला. त्याचे जगिक सेवाकार्य संपले पण तो जिवंत देवाच्या सानिध्यात गेला!

बॉबप्रमाणेच अनेक ख्रिस्ती लोक पवित्रशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण करून ख्रिस्तासाठी कार्य करीत असतात. त्या आफ्रिकन पाळकांप्रमाणे, रणरणत्या उन्हात पंधरा तास चालण्याची आपल्यावर पाळी येत नाही. देवाचे वचन स्वीकारण्यास आणि शिकण्यास त्यांनी ते दिव्य केले होते. परिस्थिती कशीही असली तरी देवाचे ज्ञान हे आपल्या हृदयाचा सुखद अनुभव ठरावा यासाठी बदलाव होणे अगदी गरजेचे आहे.

माझ्या सुरुवातीच्या ख्रिस्ती जीवनात देवाने मला शास्त्राभ्यास करणे आणि देवासंगती अस३३णे यामधील फरक ओळखण्याची बुद्धी

दिली त्यामुळे मी देवाचे आभार मानतो. देवाचे वचन आकलन होण्याकरिता मस्तक आणि हृदय या दोहोंची गरज असली तरी मस्तकाने स्वीकारलेले ईश्वरीय ज्ञान हे हृदयाच्या समर्पणाशिवाय निकामी ठरू शकते. त्यामुळे आपली आत्मिक वाढ खुंटते.

## मस्तक

### शास्त्राभ्यास : हेतू व समस्या

‘‘तू सत्याचे वचन नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी असा स्वतःला सादर करण्यास होईल तितके कर’’ (२ तीमथ्य २:१५). पवित्र शास्त्राचा अभ्यास करून त्यासंबंधी योग्य ती समज घेणे यासाठी वेळ देणे हे प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीसाठी उत्तेजनात्मक वाटते. जे देवाचे भक्त, पाळक किंवा पवित्र शास्त्राचे अध्यापक आहेत. त्यांचे शिक्षण ध्यानपूर्वक ऐका. पवित्र शास्त्रावरील टीकासंग्रह वाचा. म्हणजे मानसिकदृष्ट्या तुम्ही देवाचे वचन समजून घेण्यासाठी तयार व्हाल. जेव्हा तुम्ही एकांतात देवाबरोर तुमचा समय घालवाल तेव्हा तुम्हाला या तयारीचा उपयोग होईल.

पाळक आणि शिक्षक हे मंडळीसाठी देवाचे दानच असतात. पाळकाची प्रमुख सेवा म्हणजे विश्वासणाऱ्यांना देवाच्या वचनांचे स्पष्टीकरण करणे ही आहे. तसेच वचनांचा संदर्भ, पवित्रशास्त्रातील पुस्तकांची पार्श्वभूमी ही पाळकाने सोप्या पद्धतीने स्पष्ट करावयाची असते. यातूनच पाळकाने मंडळीने धार्मिक जीवन कसे जगावे याचा मंडळीला बोध केला पाहिजे. आत्मशांती आणि विनाशप्रत जाणाऱ्या आत्म्यांसंबंधी उपदेश केला पाहिजे.

अशाच एका पाळकाचे पाच उपदेश माझ्या संग्रंही आहेत. विल्यम स्टिल या पाळकाने अनेक वर्षांपूर्वी ते उपदेश विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या एका मेळाव्यात केले होते. स्कॉटलंडच्या एका मंडळीचे ते पाळक होते. आणि पंचेचाळीस वर्षांच्या त्यांच्या सेवेत ते अखेरपर्यंत अगदी जोशपूर्ण उपदेश करीत असत. अर्थातच त्यांच्या अशा जोशपूर्ण उपदेशांमुळे त्यांचे सेवाकार्य स्कॉटलंडच्या सीमा ओलांडून दूरवर पोहंचले. त्यांचे उपदेश ऐकलेले अनेकजण आज जगभर सुवार्ताकार्य करण्यात मग्न आहेत. विश्वविद्यालयात विद्यार्थ्यांपुढे केलेल्या त्यांच्या उपदेशांत पास्टर स्टिल म्हणाले,

‘‘पाळकांना मेंढरांना चारण्यासाठी पाचारण केलेले असते. मग मेंढरांची चरण्याची इच्छा असो अगर नसो. शेळ्यांची करमणूक करण्यासाठी ते नाहीत. शेळ्यांना शेळ्यांची करमणूक त्यांच्या कोंढवाढ्यात करू द्या. काही केले तरी शेळ्यांचे मेंढरामध्ये रुपांतर कधीच होऊ शकत नाही. सर्व आडमुठ्या मेंढरांना एकत्र ठेवणे ही पाळकाची प्रमुख जबाबदारी आहे. त्या मेंढरांची शेरडं होऊ न देणे हे पाळकाचे काम आहे.’’

जेव्हा तुमचा नवा जन्म होतो तेव्हा तुम्ही मंडळीचे घटक बनता आणि पाळकांच्या सेवेद्वारे तुम्हाला आशीर्वाद मिळतो.

कदाचित हे पुस्तक वाचणाऱ्या काही वाचकांचे दुर्दैवाने अशा पाळकाकडून योग्य भरण पोषण होत नसेल. जरी तुम्हाला चांगले पाळक पवित्र शास्त्राचे शिक्षण देणार असतील किंवा तुमच्याजवळ पवित्रशास्त्रावरील टीकासंग्रह असेल तरीही तुम्ही एक गोष्ट ध्यानात ठेवा. या ज्ञानामुळे तुमचे मस्तक भरले असले तरी देवसहवासात

तुम्ही देवासंगती जो वेळ एकत्रित येता तो या ज्ञानापेक्षा फार मोलाचा आहे.

आपल्याला अगदी चांगल्या पवित्र शास्त्र शिक्षकाकडून बरेच ज्ञान मिळाले असेल, देवाचे वचन आपण आपल्या चांगल्या अभ्यासातून छान समजून घेतले असेल. परंतु जे आत्मिक अन्न पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या हृदयात जमा होते ते केवळ जेव्हा आपण देवासंगती एकत्रित समय गुजारतो तेव्हाच ते खरे असते.

वैयक्तिकपणे एकत्रित समय देवाबरोबर देणे यासाठी कोणी चांगला पवित्रशास्त्र शिक्षक हा पर्याय होऊ शकत नाही. देवच देत असलेली ज्ञानार्जनाची संधी नाकारण्यास कसली सबब चालत नाही.

काही वर्षांपूर्वी मायल कोवरडेल यांनी या संदर्भात काही प्रश्न सुचवले. त्यांचा तुम्हाला निश्चित उपयोग होईल. त्यांनी जे लिहिले त्याचा सारांश असा.

जे लिहिले व सांगितले जाते त्यापेक्षा तुम्हाला देवाचे वचन समजण्यासाठी अधिक उपयुक्त ठरतील अशी प्रश्नावली :

सदरचा शास्त्रभाग कोणाबद्दल आहे?
हा शास्त्रभाग कोणाकडे निर्देश करतो?
लेखकाने नेमके कोणते शब्द वापरले आहेत?
कोणत्या कालखंडात सदर शास्त्रभाग लिहिला गेला?
तो शास्त्रभाग कोणत्या ठिकाणी लिहिला गेला?
तो शास्त्रभाग लिहिण्यामागे कोणता हेतू होता?
कोणत्या परिस्थितीत तो शास्त्रभाग लिहिला गेला?
हा शास्त्रभाग लिहिण्यापूर्वी व लिहिल्यानंतर काय काय घडले?

तुमच्या वैयक्तिक शास्त्राभ्यासाच्या वेळी ह्या प्रश्नांचा तुम्ही

उपयोग केला (समास असलेले पवित्रशास्त्र वापरणे योग्य) तर पवित्र शास्त्रातील अनेक मोती तुमच्या हाती लागतील व त्यामुळे तुम्हाला रोमांचित व्हावे लागेल. देवाच्या वचनातील भाकितेचा तुम्हाला उलगडा होईल. त्यातील काही भाकितांची पूर्तता झाली आहे. तर काही भाकिते अद्याप पूर्ण व्हावयाची आहेत हे तुम्हाला समजेल.

तुमचे नेत्र जेव्हा अलौकिक अशा देवाला पाहतील तेव्हा तुम्हांवर आशीर्वादाची बरसात होईल. विश्वाच्या निर्मितीमागे असलेला देवाचा हेतू, इतिहासात त्याचे स्थान, तारणासंबंधी देवाची योजना, येशू ख्रिस्ताच्या रुपात त्याचे या जगात येणे, तुमच्या माझ्या सारख्या ख्रिस्ती माणसांसाठी त्याच्या विस्तृत सूचना, आजही या सर्व गोष्टी खरोखर अगदी विस्मयकारक आहेत. अशा प्रकारचे पवित्रशास्त्राविषयक ज्ञान फारच अमोघ आहे. प्रत्येक विश्वासणाऱ्याने ते प्राप्त करण्याची आस धरलीच पाहिजे.

## हृदय

### एकत्रित समय : सुधारणूक आणि सल्ला

आपण देवाची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे (योहान ४:२४). ती आपले मस्तक व हृदय या दोहोंनी मिळून केली पाहिजे. तरच आपल्याला त्याच्याशी वैयक्तिक सहभागिता साधता येते.

तुमच्या शास्त्राभ्यासाने तुम्हाला केवळ पवित्रशास्त्राचे ज्ञान मिळत असेल तर ते तुमच्यासाठी अल्पहिताचे ठरेल. बौद्धिक ज्ञान मिळाले पण त्याचा रोजच्या जीवनात उपयोग केला जात नाही ही समस्या आज अनेक विश्वासणाऱ्यापुढे आहे.

देवाच्या वचनासंबंधी खूप ज्ञान संग्रही आहे. परंतु त्या ज्ञानप्रकाशात अनेकांना नीट चालता येत नाही ही दुःखाची गोष्ट आहे. अशा लोकांनी ते ज्ञान आपल्या मनाच्या कडी-कुलुपात बंदिस्त करून ठेवलेले असते आणि ते मूर्खाप्रमाणे जगिक गोष्टींमागे धावत सुटतात. देवाचे वचन केवळ आजच्या जीवन पद्धतीपुरते मर्यादित नाही.

जगाच्या दृष्टीकोनातून देवाच्या वचनाकडे पाहाणे आणि मग जगातील गोष्टींबरोबर कशीतरी तडजोड करून नवे तत्वज्ञान किंवा मानसशास्त्र यांशी त्याची विरुप सांगड घालणे म्हणजे प्रामाणिकपणा आणि नैतिकतेची सगळी तत्वे उधळून लावण्यासारखे आहे. आजच्या या दुष्ट जगापासून आपल्याला वाचविण्यासाठी आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताने भयंकर मोल दिले आहे. ख्रिस्ताला नाकारणाऱ्या पिढीत आणि देवाच्या वचनांमध्ये आज किती विरोधाभास दिसतो!

देवाच्या वचनाची मानवी विचारांशी कधीच सांगड घालता येत नाही. आम्ही कसे असावे हे जाणून घेण्यासाठी जेव्हा आपण अगदी कळकळीने देवाच्या वचनांचा अभ्यास करतो तेव्हा आम्हाला आमचे जीवन आमूलाग्र बदलून टाकणारा अनुभव येतो! या परिवर्तनात मस्तकाची नव्हे तर हृदयाची प्रमुख भूमिका असते आणि देवाची त्याच्या प्रत्येक लेकराकडून हीच अपेक्षा आहे.

स्तोत्रकर्ता असे म्हणाला नाही - ''तुझे वचन माझ्या मस्तकात मी जपून ठेवले आहे'' उलट तो असे म्हणाला, ''तुझे वचन मी माझ्या मनात (हृदयात) जपून ठेवले आहे'' (स्तोत्र ११९:११). ॲडल्फ हिटलरने आपल्या भाषणामध्येंपुष्कळदा पवित्र शास्त्राचे संदर्भ दिले. परंतु या वचनांचा त्याच्या नैतिक निवडीसाठी त्याला उपयोग

करता आला नाही. एवढेच नव्हे तर त्याला त्याचा उपयोग अविनाशी जीवनासाठी झाला नाही. अर्थात पवित्र शास्त्र वचनांचे ज्ञान त्याच्या मस्तकातच राहिले ते त्याच्या हृदयात कधी पोहंचलेच नाही.

'देवाचे वचन मी माझ्या हृदयात जपून ठेवले', असे दाविद म्हणाला. परंतु त्याला नेमके काय म्हणावयाचे होते असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. हृदय नावाच्या एका स्नायुमय अवयवात त्याने ती वचने साठवून टाकली असा त्याचा मुळीच अर्थ नाही. देवाचे वचन अशाप्रकारे हृदयाच्या कप्प्यात कोणीही ठेवू शकत नाही. जेव्हा दाविद हृदयाचा उल्लेख करतो तेव्हा त्याचा अर्थ त्याच्यामधील अंतःप्रेरणा जी त्याच्या जीवनाला योग्य मार्गावर नेते. देवाचे वचन हे असे आपल्या अंतःप्रेरणेसाठी अंतःकरणात सामावले गेले म्हणजे आपल्या अंतःकरणात वसणाऱ्या ख्रिस्तामुळे कोणाही विश्वासणाऱ्याला त्याचे जीवन विशुद्ध, आनंददायक आणि पोषक असे होईल.

पूर्ण पवित्रशास्त्राचा अभ्यास करणारा मी एक विद्यार्थी होतो. तेव्हा मला एक गोष्ट समजली की शास्त्रातील सत्ये गोळा करण्यापेक्षा, देवाला त्याच्या वचनातून मला काय सांगावयाचे आहे हे समजणे हे अधिक महत्वाचे आहे. देवाच्या वचनावर विसंबून राहाणे हेच हितकारक आहे याची मला जाणीव झाली.

कॉलेजमध्यें शिकत असतांना आम्ही वर्गात दिल्या जाणाऱ्या 'लेक्चरची' अगदी बालीश व्याख्या केली आणि आम्ही खूप हसलो होतो. ती व्याख्या अशी 'लेक्चर म्हणजे प्राध्यापकाच्या वहीतून विद्यार्थ्यांच्या वहीत जाणारे ज्ञान की ज्यात दोघांच्याही मस्तकाचा काही एक संबंध नसतो'!

पाळकाच्या मस्तकातून देवाचे ज्ञान विश्वासणाऱ्याच्या मस्तकात, कोंबले जाते आणि हृदय मात्र रिकामेच राहाते तेव्हा अशीच स्थिती होते. देव तर म्हणतो,

*"...ऐकलेले वचन त्यांना लाभदाय झाले नाही, कारण त्यांचा ऐकणाऱ्यांमध्ये विश्वासाबरोबर संयोग झाला नाही" (इब्री **४:२**).*

यिर्मया संदेष्ट्याची साक्ष नीट समजून घेतल्याखेरिज देवाचे वचन आपल्याकरिता आशीर्वादित ठरणार नाही. यिर्मया म्हणतो, '. ..तेव्हा माझ्या हाडात कोंडलेला अग्नी (वचन) जळत आहे असे माझ्या हृदयाला झाले...' (यिर्मया १०:९). आज अनेकांच्या हृदयामध ये असा कोंडलेला अग्नी लुप्त झाला आहे. मस्तक आणि हृदय यांचा काही संबंधच राहिला नाही - देवाची वाणी आणि विश्वासणाऱ्याचे जीवन यांची फारकत होत आहे. आपणास जे माहीत आहे आणि आपण जे करीत आहोत यामध्ये तफावत वाढत आहे.

पवित्रशास्त्राच्या शिक्षणामुळे जेव्हा तुमचे हृदय खरोखर उचंबळून येते तेव्हा निश्चितपणे तुमच्या जीवनात बदल घडून येतो ! जेव्हा असे घडते तेव्हा मानवी व्यवस्थांवर तुम्ही फारसे अवलंबून राहात नाही, उदाहरणार्थ कौटुंबिक सभोपदेशक, भरगच्च अशा सभा, देवाने त्याच्या वचनातून तुम्हाला जी अभिवचने दिली ती तुमच्यासाठीच आहेत असा विश्वास तुम्हामध्ये बळावतो. पवित्र आत्मा तुम्हामध्ये वसत असल्यामुळे, प्रभु येशू ख्रिस्ताच्या आज्ञा पाळण्याचा तुम्ही कसोशीने प्रयत्न करू लागाल.

कधी कधी माझा उपदेश संपल्यानंतर मंडळीतील एखादा चांगला सभासद मला उत्तेजन देण्यासाठी मजकडे येतो व म्हणतो, “विचारप्रवर्तक असा संदेश आज तुम्ही मला दिला!” हे ऐकल्यानंतर मात्र मला असे वाटते की ज्या उद्देशाने मी तो संदेश दिला तो अद्याप त्याच्यापर्यंत पोहंचलाच नाही. संदेशामुळे लोकांनी योग्य ती कृती करण्यासाठी सरसावले पाहिजे. केवळ त्यांनी त्यावर विचारच करणे गैर आहे.

तसेच देवाबरोबर एकत्रित समय व्यतीत केल्यावर विश्वासाला सक्रीय असा प्रतिसाद मिळाला नाही, पापांगिकार करून क्षमायाचना केली नाही, उपासनेची गोडी लागली नाही तर आपला एकत्रित येण्याचा समय व्यर्थ झाला असे समजावे.

जेव्हा देवाच्या लेकराचे मस्तक देवाच्या वचनाच्या ज्ञानाने भरले जाते आणि त्याच्या हृदयात पवित्र आत्म्याचे हळूवार स्पंदन सुरू होते तेव्हाच तारणाऱ्या ख्रिस्ताशी त्यांची संपूर्ण सहभागिता साधली जाते. आजदेखील जेव्हा मी बायबल कॉलेजमध्ये शिकविण्यासाठी जातो तेव्हा मी माझ्या विद्यार्थ्यांना सांगत असतो :

“तुम्ही या ठिकाणी पवित्रशास्त्राभ्यासाठी येता ते केवळ तुम्हाला बायबलची माहिती व्हावी, ज्ञान मिळावे यासाठी येत नाही. पवित्र शास्त्रामधील देव कोण व कसा आहे हे जाणून घेण्यासाठी तुम्ही येथे येता.”

आध्यात्मिक अपरिपक्वता असली म्हणजे तसे विश्वासणारे इकडची-तिकडची वचने वापरून मूक साक्ष देत असतात. ज्या गोष्टी तुम्हाला तुमचे पवित्रशास्त्र आणि देव यांच्यापासून दूर नेतात, त्या

गोष्टींमुळे तुमचा खरा देवसहवास कमी होत जातो, प्रसंगी तो नष्टही होतो.

जेव्हा विश्वासणारा देवाच्या समक्षतेच्या पारदर्शी प्रकाशात व पवित्रतेत येतो तेव्हाच त्याची व प्रभुची खरी सहभागिता होते. असा प्रकाश मग अनेक गोष्टी उघड करतो. त्याकरिता स्वर्गीय पित्याशी अगदी मनमोकळे आणि प्रामाणिक संभाषण करणे मात्र गरजेचे असते. देवाचे वचन वाचल्यानंतर तुमचे हृदय त्यामधील सत्याला उत्स्फुर्त प्रतिसाद देते. ते सत्य तुमच्या आत्म्यासाठी पोषक अन्न ठरते आणि मग तुम्ही देवाच्या ज्ञानात आणि सूज्ञपणात वाढत जाता. स्तोत्रकर्ता म्हणतो, ''तुझ्या प्रकाशाने आम्ही प्रकाश पाहतो'' (स्तोत्र ३६:९).

एक जुने बोधवचन आजही किती सत्य आहे :

प्रकाशाच्या आज्ञापालनाने मोठा प्रकाश मिळतो
प्रकाशाच्या आज्ञाभंगाने काळरात्र उगवते.

दुसऱ्यांना उपदेश करणे सोपे असते पण स्वतःला उपदेश करणे व त्याप्रमाणे वागणे फार अवघड असते हे जसे मला समजले तसे ते तुम्हालाही समजले आहे असे मला वाटते. यशया संदेष्ट्याने येशू ख्रिस्ताला 'अद्‌भुत मंत्री' म्हटले आहे (यशया ९:६) ते अगदी अप्रूप आहे कारण तो केवळ उपदेश करीत नाही तर त्याच्या उपदेशाप्रमाणे वागण्यास तो आम्हाला सहाय्यही करतो.

रोज सकाळी जेव्हा तुम्ही देवाबरोबर एकत्रित समय व्यतीत करता तेव्हा दिवसभराच्या तुमच्या सर्व कामकाजासाठी तुम्ही स्वतःला सज्ज करता. देवाचे वचन वाचत असतांना देव तुम्हाला उपदेश करीत

असतो. दिवसभर जे काही घडणार आहे त्याकरिता तुम्हामध्ये वसती करणारा प्रभु येशू ख्रिस्त तुमचे सहाय्य व मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे.

## आध्यात्मिक तपासणी

१. पवित्रशास्त्र वाचतांना माझे हृदय आणि माझे मस्तक योग्य प्रतिसाद देतात कां?

२. मी प्रार्थना करतो तेव्हा देवाबरोबर माझे दुहेरी संभाषण होते काय?

३. माझ्या आध्यात्मिक जीवनात मी मनुष्यांचा सल्ला घेतो का की देवाचा घेतो?
(ताकीद ‘‘त्याच्या योजनेसंबंधी त्यांनी धीर धरला नाही’’ (स्तोत्र १०६:१३)

४. मी इतरांना सल्ला देतो तेव्हा ते देवाच्या प्रितीने भरलेल्या अशा माझ्या हृदयातून देतो कां? त्यावेळी माझे मन त्याच्या वचनाने भरलेले असते कां
(ताकीद : ‘‘तरी ते आपला हेका न सोडिता बंडखोरच राहिले’’ स्तोत्र १०६:४३)

# अशी पातके

अनेक पापांची देतो मी कबूली
अत्यंत घातकी अशी पातके -

उपासनासमयी जगाच्या चिंता
चांगल्या कामामागे स्वार्थ सदा
देवाच्या सानिध्यातही गर्वाचा ध्यास
अंधारात मरणाऱ्या जिवाची नाही पर्वा

प्रभुच्या प्रितीची चाखून ती गोडी
हव्यास असे मनी विषारी अन्नाचा
स्वर्गाच्या पुरवठ्याचा झरा असूनही
झुरतो मनी कीटकासम कशासाठी

हृदय माझे फसवे घडवते अशी पातके
तुलाच ठाऊक किती दुःख देतात ती !

निष्काळजीपणे कसा मी रोज झोपी जातो
रोजची अशी पातके कधी न पुसता
जागा होतो सत्कर्मे करण्यास मी
तरी पातकाचा डाग असतो हृदयांवर

प्रभु तुझी कृपा तरी मज पामरावर
उद्धाराचा स्पर्श होतो तव कृपेस्तव
प्रभु कृपा कर, पाहा माझे हे दुःख
दया कर प्रभु हेच मी मागतो

तुझ्या पुत्राद्वारे पित्या क्षमा कर मला
केली अशी पातके आत्म्याविरुद्ध तुझ्या.

विल्यम मॅक्लार्डी बंटींग
(१८०५-१८६६) आर.ए.बी. स्वीकृत

*प्रकरण ३*

# प्रार्थनापूर्वक तयारी

माझे परिवर्तन झाले त्यावेळी मला पवित्रशास्त्राविषयी फारच थोडी माहिती होती. परंतु पवित्रशास्त्राची पाने वाचतांना मला उमगले की मी देवाचे वचन वाचत आहे. देवाचे वचन वाचत असतांना आजदेखील मला वाटते की प्रभु मजशी बोलत आहे.

मी नव्यानेच ख्रिस्ताचा स्वीकार केला त्यावेळी मला सांगण्यात आले होते की जेव्हा पवित्रशास्त्र वाचतो तेव्हा पवित्र आत्मा ती वचने माझ्या हृदयात संजिवीत करीत असतो. तेव्हा मी देवबापाबरोबर एकत्रित समय मिळावा म्हणून प्रार्थना करीत असे. ती या प्रकारे :

देवाच्या आत्म्या तू माझा शिक्षक हो
ख्रिस्ताविषयीचे ज्ञान मला प्रगट कर
माझ्या हाती ती अलौकिक किल्ली दे
ती मला माझ्या बंधातून मुक्त करील.

प्रभु येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांना सोडून पित्याकडे जातांना तो

शिष्यांना म्हणाला, ‘‘सत्य आत्मा येईल तेव्हा तो तुम्हाला मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल...’’ (योहान १६:१३).

आपल्या जीवनात जर पवित्र आत्मा कार्य करण्यासाठी मोकळा नसेल तर आपले शास्त्रवाचन हे पोकळ आणि व्यर्थच ठरते.

जॉन वेस्ली (देवाने त्यांचा उपयोग अठराव्या शतकामध्ये ब्रिटीश समाजसुधारणेकरिता केला व इंग्लंडचा क्रांतीपासून बचाव केला). त्यांनाही एकत्रित समयाचे महत्व समजले होते. स्पर्धा करण्याचा एक महत्वाचा धडा ते शिकले होते. रात्री लवकर झोपणे आणि पहाटेच उठणे ही त्यांची शिस्त होती. वेस्ली पहाटे ४ वाजता ज्या खोलीमध्ये गुडघे टेकून प्रार्थना करीत होते त्याच खोलीत मलाही गुडघे टेकून प्रार्थना करण्याची संधी लाभली होती. त्यांच्या रोजनिशीमध्ये एक अवतरण मला वाचावयास मिळाले. ‘‘मी एकटा बसतो.....फक्त देवच तेथे असतो. त्याच्या उपस्थितीत मी त्याचे पुस्तक उघडतो आणि वाचतो. जे मी वाचतो तेच शिकवितो.’’ ते वाचून माझे अंतःकरण हेलावले.

नवा जन्म पावलेल्या विश्वासणाऱ्यांकरिता योहान पवित्र आत्मा देवाच्या वचनाद्वारे कार्य करण्यास समर्थ आहे असे आश्वासन देतो व त्यांना उत्तेजनही देतो. जरी काही लोक अशांच्या मार्गदर्शनासाठी उपलब्ध नसले तरी पवित्र आत्मा त्यांना सहाय्य करीलच. त्यांना योहान लिहितो, ‘‘तुम्हाविषयी म्हणायाचे तर त्याच्याकडून तुमचा जो अभिषेक झाला तो तुम्हामध्ये राहतो तेव्हा तुम्हाला कोणी शिकविण्याची गरज नाही. त्याचा अभिषेक – तो सत्य आहे खोटा नाही – तुम्हाला सर्व गोष्टींविषयी शिकवितो त्याप्रमाणे व त्याने तुम्हाला शिकविल्याप्रमाणे

तुम्ही त्याच्यामध्ये राहा" (१ योहान २:२७). जेव्हा तुम्ही सजगपणे पवित्र आत्म्यावर अवलंबून राहून पवित्रशास्त्र वाचता तेव्हा तो तुमचे हृदय ज्ञानाच्या प्रकाशाने उजळून टाकतो.

जर तुम्ही तुमचा एकत्रित समय सफल व नियमीत व्हावा अशी इच्छा करीत असाल तर एकांताची जागा निवडा आणि विशिष्ट वेळ ठरवून आपले पवित्रशास्त्र देवाच्या समागमात वाचा. अशा एकांत समयी जरी तुमचे हृदय देवसहवासात उल्लासित होत असले तरी तुमचे कुटुंब, व्यवसाय किंवा इतर काही कारणांमुळे काही वेळा तुम्हाला अडथळा निर्माण होऊ शकतो. अशावेळी तुम्ही नियमित असणे आवश्यक आहे. त्यामुळे तुमची ख्रिस्ताच्या प्रितीत व ज्ञानात वाढ होते. पवित्र शास्त्राकडे दुर्लक्ष करणे म्हणजे जणू काय ते तुमच्याजवळ नाहीच हे लक्षात ठेवा.

इस्त्राएल लोक वचनदत्तभूमीकडे जात असतांना देवाने त्यांच्या उपजिविकेसाठी स्वर्गीय मान्ना त्यांना रोज पुरविला त्याचप्रमाणे आपण रोज पवित्रशास्त्रातून आपले आत्मिक अन्न ग्रहण करण्यास तयार राहिले पाहिजे.

पहिले : जेव्हा तुम्ही देवाच्या सहवासात येऊन पवित्रशास्त्र वाचता तेव्हा तुम्ही गुडघे टेकूनच ते वाचा.

दुसरे : जो सार्वकालिक प्रकाश आहे त्याच्या समीप जेव्हा तुम्ही येता तेव्हा तुमचे हृदय त्याच्या पवित्र उपस्थितीने भरले पाहिजे. त्याच्यापासून तुम्ही काहीही लपवू शकत नाही मग लपवाछपवी कशासाठी करावयाची?

देवासमोर येण्याचे तुम्ही एकदां ठरविले की मग शास्त्रवचनांचा

प्रकाश तुम्हाला मिळेल आणि मग देवाचे वचन तुमच्या मस्तकातून हृदयाकडे वाहात आहे याचा सुंदर अनुभव तुम्हाला येईल.

# गुडघे टेका

*गर्विष्ठ मन जिवंत सहभागिता घडवू शकत नाही.*

पवित्रशास्त्रामध्ये आपण पुष्कळ लोकांसंबंधी वाचतो की देवाप्रत आदर आणि समर्पित भावना ठेवण्यासाठी ते गुडघे टेकत असत. काही ख्रिस्ती पंथ आणि मुस्लीम लोक प्रार्थनेच्या वेळी गुडघे टेकतात. परंतु ही प्रथा खरोखरच देवासंगती सहभागिता साधतेच असे नाही. तरीही जेव्हा आपण आपला निर्माणकर्ता आणि सदाजिवी परमेश्वर याजसमोर येतो तेव्हा गुडघे टेकल्यामुळे आपले मन व हृदय यांची वृत्ती सुधारते.

गेथशेमाने बागेत, येशू ख्रिस्ताची वधस्तंभावर खिळले जाण्याची भयंकर वेळ जवळ आली होती तेव्हा येशूचे शिष्य झोपी गेल्याचे त्याने पाहिले. मग तो थोड्या अंतरावर गेला आणि त्याने गुडघे टेकून पित्याची प्रार्थना केली (लूक २२:४१). येशू पित्यासोबत एकटाच होता. जेव्हा आपण आपल्या मित्रपरिवारांपासून देवाच्या समागमात एकटे येतो तेव्हा आपण देखील गुडघे टेकून प्रार्थना केली पाहिजे. त्यामधून देवाबद्दल असलेला आपला आदर आणि समर्पण हेच प्रतीत होते.

संत पौलाने आपले सेवाकार्य पूर्ण केल्यावर लोकांचा निरोप घेतांना तो विशिष्ट प्रकारे वागत असे. इफिसकरांना निरोप देतांना, ‘‘त्याने गुडघे टेकून त्या सर्वांबरोबर प्रार्थना केली’’ (प्रेषित २०:३६). एकदा समुद्रतीरी त्याने त्याचे शिष्य व बायका-मुलांचा असा निरोप

घेतला : “तेव्हा स्त्रिया व मुले यांच्यासह सर्वांनी आम्हाला नगराबाहेर पोहंचविले. तेथे समुद्राच्या किनाऱ्यावर आम्ही गुडघे टेकून प्रार्थना केली” (प्रे.कृ. २१:५). स्त्रिया व मुले अशा सार्वजनिक ठिकाणी गुडघे टेकतात हे दृश्य आज पाहणारे कदाचित भलताच अर्थ काढतील. आपण देखील कधी प्रार्थनेच्या ठिकाणी गेलो तर गुडघे टेकणे हे आपल्याला एक फॅड आहे असे वाटते. आपण जास्तीत जास्त आरामशीर बसण्याचा प्रयत्न करतो. परंतु संत पौलाच्या काळात लोकांना, स्त्रियांना व मुलांना गुडघे टेकण्यामध्ये कसलीही अडचण वाटत नव्हती. म्हणून आपण देखील सार्वजनिक ठिकाणी किंवा एकांतात प्रार्थना करतांना गुडघे टेकण्यास लाजू नये.

तरीपण एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की आपण बसून अथवा उभे राहून, चालत असतांना जरी प्रार्थना केली तरी आपले मन व हृदय देवाच्या सहवासात येतांना योग्य वृत्ती धारण केलेले असले पाहिजे. पवित्रशास्त्र स्पष्टपणे इशारा देते की प्रार्थना करते समयी आपली मनोवृत्ती योग्य असली पाहिजे. “देव गर्विष्ठांना विरोध करतो आणि लीनांवर कृपा करितो. म्हणून देवाच्या अधीन व्हा आणि सैतानाला अडवा म्हणजे तो तुम्हापासून पळून जाईल. देवाजवळ या म्हणजे तो तुम्हाजवळ येईल” (याकोब ४:६-८).

काही लोकांना शारीरिक व्याधींमुळे प्रार्थनासमयी बराच वेळ गुडघे टेकणे शक्य नसते. तरी काळजी करण्याचे कारण नाही. कारण देव हृदय पारखीत असतो. प्रार्थनेच्या आपल्या स्थितीपेक्षा देवाला आपल्या हृदयाची सुस्थिती अधिक महत्वाची आहे. ज्यांना शक्य आहे त्यांनी गुडघे टेकून प्रार्थना करणे अधिक चांगले. त्यामुळे आपली

बुध्दी तिक्ष्ण होते आणि भयावह अशा देवासंगती आपण गुडघे टेकून बोलणे ही एक उत्तम संधीच असते. मग जसा मित्र मित्राशी बोलतो तसे आपण निर्माणकर्त्याशी बोलू शकतो! आपणा सर्वांसाठी पवित्र शास्त्रातील एक हुकूम फार महत्वाचा आहे. ''प्रभुसमोर नम्र व्हा'' आणि जर आपण त्याप्रमाणे वागलो तर देव आपल्याला अभिवचन देतो, ''म्हणजे तो तुम्हास उच्च करील'' (याकोब ४:१०).

## हृदय उघडा

*देवाच्या कृपेच्या आसनापासून जिवंत सहभागितेची सुरुवात होते. नव्या करारात या कृपेच्या आसनाला 'येशूचा क्रूस' असे संबोधले आहे.*

येशू ख्रिस्त वधस्तंभावर मरण पावण्याअगोदर देवाने त्याच्या अनंत प्रीतीस्तव आमच्या पापाबद्दल त्याच्या निर्दोष पुत्राला मरणदंड दिला यासाठी की बहकलेल्या मानवजातीला देवाबरोबर पुन्हा सहभागिता साधता यावी. आपल्या तारणकर्त्याला वधस्तंभी देण्याअगोदरच देवाने जाहीर केले की तो कृपेच्या आसनापाशी त्याच्या लेकरांची भेट घेईल. ''तेथे मी तुला भेटत जाईन....मी दयासनावरून तुझ्याशी बोलत जाईन'' (निर्गम २५:२२).

आपल्या पापाबद्दल झालेला यज्ञ हा आज इतिहासजमा झाला आहे. येशू ख्रिस्ताचे मोलवान रक्त सांडण्यात आले. येशूच्या मृत्युद्वारे अगम्य प्रीतीस्तव आम्ही आनंदाने म्हणतो : ''तर मग आपल्यावर दया व्हावी आणि ऐनवेळी सहाय्यासाठी कृपा मिळावी म्हणून आपण धैर्याने कृपेच्या राजासनाजवळ जाऊ'' (इब्री ४:१६).

दया म्हणजे जे मिळविण्यास आपण पात्र असतो ते देव देत नाही, कृपा म्हणजे जे मिळविण्यास आपण अपात्र असतो ते देव देतो. आपला देव तो आपणास दया व कृपा देतो. त्याच्या सहभागितेत चालणे किती सुंदर आहे.

वाहणाऱ्या प्रत्येक वादळी वाऱ्यात,
भीतीच्या प्रत्येक भयावह लाटेत,
एक असीम शांती, यशस्वी माघार असते,
ती केवळ दयासनाखालीच असते.
एक जागा असते जेथे येशू,
आनंदाच्या तेलाने मस्तक भिजवतो,
अशी जागा मला फार गोड वाटते,
ती रक्ताच्या मोलाने घेतलेली दयासन आहे.
एक जागा अशी जेथे जीव एकमेकांत मिसळतात,
मित्र मित्राशी सहभागिता साधतात,
दूर असले तरी विश्वासाने समीप असतात,
ती जागा म्हणजे एक समान दयासन आहे.
अहा, मदतीसाठी आपण कितीदा धावतो,
मोहात, दुःखात, भयकारक स्थितीत,
नरकाची सत्ता कितीदा कब्जा करते,
काय संतासाठी दयासन कुठे नाही काय?
गरुडपंखावर आम्ही भरारी मारतो,
काळ आणि संवेदना लुप्त होतात,

तेव्हा जिवा भेटण्या स्वर्गच येतो खाली,
आणि दयासन वैभवी मुगुट धारण करते.

एच.स्टॉवेल

अशुद्धता आणि जिवंत सहभागिता एकत्र राहूच शकत नाही.

एखाद्या कुटुंबात जन्मलेला मुलगा हा त्या कुटुंबातील आई-वडिलांचाच मुलगा असतो. तो जन्मला नाही असे कधीच होत नाही. परंतु तो मुलगा नाठाळ निघाला तर त्याच्या आई-वडिलांशी तो सुसंवाद साधू शकत नाही. नाते राहते पण सहभागिता संपते! आणि हे फार शोकजनक आहे.

आपला नवा जन्म झाला तेव्हा आपल्या स्वर्गीय पित्याबरोबर आपले सार्वकालिक नाते जुळते हे जाणणे फार सुंदर आहे. आपल्या हृदयात आपण खरेपणाने ख्रिस्ताला स्वीकारले असेल तर आपण देवाची लेकरे झालेले असतो. हे नाते अनंतकाळ टिकणारे असे आहे. परंतु जेव्हा आपण पाप करतो तेव्हा हे नाते तुटते.

आपल्या आज्ञाभंगामुळे देवाचे आपल्या जीवनातील आपण पूर्वी आनंदाने मिळविलेले आशीर्वाद आपण गमावतो. पारदर्शी सहभागितेला गेलेला हा तडा देवाकडून निश्चित पडलेला नसतो. ती सहभागिता अल्पकाळ किंवा दीर्घकाळी तुटलेली असली तरी त्यास देव कारणीभूत नसतो. आमच्या भ्रष्ट मनामुळेच मोठी दरी आपण निर्माण करतो. देवाबरोरच असलेली सुंदर सहभागिता नष्ट करण्यास आपणच जबाबदार असतो.

अशुद्ध मन : जॉन बनीयन म्हणाले होते : ''पाप मला पवित्र

शास्त्रापासून दूर करते तर पवित्र शास्त्र मला पापापासून दूर ठेविते. पवित्र आत्म्याला खिन्न करून जर कोणी समजून उमजून पाप केले तर देवाच्या वचनाची त्याची भूक मरून जाते. म्हणून ख्रिस्ती मनुष्यासाठी विवेकपूर्ण मन अत्यावशक आहे. देवाच्या वचनासंबंधी त्याला जोशपूर्ण आणि गाढ विश्वास हवा. पवित्र शास्त्र म्हणते, ''विश्वासाशिवाय त्याला संतोषविणे अशक्य आहे. कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पाहिजे की तो आहे आणि त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे'' (इब्री ११:६).

परंतु आपण आपल्या पापाकडे सतत दुर्लक्ष करू लागलो तर पवित्र शास्त्र वाचतांना आपला विश्वास मृत झालेला असेल कारण आपला विवेक पवित्र आत्मा काय सांगतो आहे या संबंधी विसंगत झालेला असतो.

जागृत मन : पाप केल्यानंतर देवाबरोबर आपली सहभागिता नव्याने प्रस्थापित करावयाची असेल तर आपला भ्रष्ट विवेक पुन्हा ताळ्यावर आणला पाहिजे, त्यांचे शुद्धिकरण केले पाहिजे. अशा दोषापासून मुक्त होण्यासाठी अशा दोषपात्र ख्रिस्ती व्यक्तीने आपले पाप देवापुढे कबूल केले पाहिजे आणि आपले हृदय देवासमोर उघडे केले पाहिजे. संत योहान म्हणतो :

> *''जर आपण आपली पापे पदरी घेतली तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील'' (१ योहान १:९)*

या शास्त्राभागा शेजारीच मी माझ्या पवित्र शास्त्रात एक प्रार्थना

लिहिली आहे. ती एफ.डब्ल्यू.क्रूमचर यांची आहे. जेव्हा मी माझ्या चुकीबद्दल जागृत होतो तेव्हा देवाच्या दयासनासमोर मी माझी पातके मांडतो. मग मी क्रूमचर यांची ती प्रार्थना म्हणतो त्या प्रार्थनेवरच माझी पाप कबूली आधारित असते.

"हे प्रभु, माझ्या देवा, तुजविरुद्ध मी पाप केले आहे. त्यामुळे मी खिन्न आहे. मी स्वतःला त्याबद्दल दोष देतो. तुझी दया अगाध आहे असा माझा विश्वास आहे. प्रायश्चित्ताचे रक्त माझ्या विवेकबुद्धीवर शिंपड. माझ्यासाठी जे दुःख तू सहन केले त्याची स्पष्ट जाणीव मला होऊ दे, माझा विश्वास वाढव."

आपण जी जी पातके करतो ती एकाच वेळेस करीत नाही. मग आपण आपल्या सर्व पातकांची एकाच बैठकीत कबूली कां द्यावी बरे? 'आमच्या सर्व पातकांची क्षमा कर' असे देवाला म्हणणे म्हणजे एका वेळेस सर्व पापांच्या क्षमेची मागणी करणे होय. यामागे आपले गर्विष्ठ हृदयच असते. आपण प्रामाणिकपणे एकेक पातकाची क्षमा मागून पुन्हा देवाच्या इच्छेप्रमाणे सर्वकाही करण्यास तयार राहिले पाहिजे. आपल्या दोषाचे निराकरण आपल्या एकवट अशा पापक्षमेच्या विनंतीमुळे अगदी अल्प प्रमाणात होते. पवित्र आत्म्याने आपल्या निदर्शनास आणलेले कोणतेही पाप असो त्याला पवित्र शास्त्रात जे नांव दिले आहे त्याचे वर्णन केले पाहिजे. अशी पापे-म्हणजे सफेद लबाडीच आहे, भरकटणारे मन ते व्यभिचारी मनच आहे, बेसावधपणे वापरलेले शब्द म्हणजे हत्येच्या सूडाने भरलेले तिरस्काराचे शब्दच आहेत.

दोषी असण्याची केवळ भावना असणे आणि प्रत्यक्ष दोषी असण्याची कबूली देणे हीच आपली खरी समस्या आहे. देवाच्या

सानिध्यात आल्यानंतर आपण दुटप्पी स्वभाव दाखवू नये. देवापुढे प्रत्येक पाप त्याच्या नावासह आपण मांडले तर देव त्याच्या दयेनुसार प्रत्येक पापाची क्षमा करील. देवाची कृपा अशी अत्यंत आश्चर्यकारक आहे.

दाविदाने त्याचे शोकजनक पाप देवापुढे कबूल केले तेव्हा तो आनंदाने उद्गारला, ‘‘हे देवा तूं आपल्या विपुल करुणेला अनुसरून माझे अपराध पुसून टाक’’ (स्तोत्र ५१:१). याच स्तोत्रात आपण पाहातो की दाविद केवळ भग्नहृदय घेऊन देवाकडे पश्चाताप करीत नाही तर अत्यंत मनापासून व कळवळून त्याने पश्चाताप केला. जेव्हा तुम्हीही पश्चाताप करता तेव्हा मनापासून आणि अत्यंत कळकळीने तो केला तरच तुम्हाला देवाच्या विपुल करुणेचा अनुभव येईल. त्यामुळे तुमचा विवेक स्वच्छ होईल आणि देवाची पवित्र सहभागिता पुन्हा एकदा तुम्हाला अनुभवता येईल.

प्रेमळ देवबापाच्या विपुल करुणेमुळे तुमचा सदसद्विवेक स्वच्छ झाला म्हणजे तुम्ही धैर्याने प्रार्थना करण्यास पुन्हा तयार व्हाल.

> *‘‘म्हणून बंधुजनहो,....परमपवित्र स्थानात येशूच्या रक्ताद्वारे प्रवेश करण्याचे आपल्याला धैर्य आले आहे.. ..म्हणून खऱ्या अंतःकरणाने व विश्वासाच्या पूर्ण खातरीने आपण जवळ येऊ’’ (इब्री. **१०:१९, २२**).*

शुद्ध विवेकामुळे आपण देवापुढे धैर्याने येऊ शकतो. देवासंगती आनंददायक सहभागिता साधावयाची असेल तर पारदर्शी हृदय हवे. त्यातूनच आपल्याला धैर्य व विश्वास प्राप्त होतो.

तुमचे हृदय शुद्ध असेल तर गतपातकांमुळे तुम्ही शांत व्हाल

आणि तुमची विवेकबुद्धी स्थिर राहील. अर्थात सैतान तुम्हाला दोष देत राहील. त्याला उत्तर देण्यासाठी देवच तुमचे सहाय्य करील आणि येशू ख्रिस्ताचे मालवान रक्त हेच ते उत्तर आहे. प्रकटीकरणाच्या पुस्तकात ज्या संतांच्या पातकांची देवाने क्षमा केली त्यांच्यावर सैतान सतत दोषारोप करीत होता, तेव्हा त्या संतांना येशूच्या अमोल रक्ताची आठवण होत होती. त्या संतासंबंधी म्हटले आहे, ‘‘त्याला (सैतानाला) त्यांनी कोकऱ्याच्या रक्तामुळे व आपल्या साक्षीच्या वचनामुळे जिंकले’’ (प्रकटी १२:११). आपला विवेक शुद्ध राखल्यामुळे त्यांना आनंद झाला एवढेच नव्हे तर आपला विवेक कसा स्थिर राखावा हे ही त्यांना शिकावयास मिळाले. हालेलुया!

*चुकीच्या मनोवृत्तीने जिवंत सहभागिता मिळत नाही.*

देवाच्या वचनाची निऱ्या दुधाप्रमाणे इच्छा लोक कां करीत नाही यामागे एक छुपे कारण आहे. तुमच्या बाबतीत तसे कधी घडले आहे काय? तुमची भूक कधी मेली होती कां? जेवण कितीही चविष्ट असले तरी तुम्हाला ते खावेसे वाटले नाही. तुम्ही जेव्हा आजारी पडता तेव्हा जेवणावरची तुमची इच्छा नाहीशी होते. तसेच जेव्हा तुमची मनोवृत्ती बिघडलेली असते तेव्हा आत्मिक अन्नावरची तुमची इच्छा नाहीशी होते.

पेत्र म्हणतो की तुम्ही आत्मिक निऱ्या दुधाची इच्छा बाळगा (१ पेत्र २:२). देवाच्या या पोषक अन्नावरची इच्छा कशी नाहीशी होती या संबंधी पेत्र स्पष्टीकरण देतो. देवाबरोबर आपण एकत्रित समय गुजारतो तेव्हा जे अडथळे निर्माण होतात त्याविषयी तो सांगतो.

आत्मिक भूकेला मारक असणारा प्रत्येक अडथळा आपण दूर केला पाहिजे. जर आपल्याला आत्मिक अन्नाची कडकडून भूक लागावी असे वाटत असेल तर आपली बिघडलेली मनोवृत्ती आपण समूळ बदलली पाहिजे – म्हणजेच 'पश्चाताप' केला पाहिजे!

'म्हणून सर्व दुष्टपणा, सर्व कपट, ढोंग, हेवा व सर्व दुर्भाषण सोडून... नूतन जन्मलेल्या बालकासारखे निऱ्या दुधाची इच्छा धरा'' (१ पेत्र २:१-२).

आपणामधील आत्मिक रोग, जे आपली आत्मिक भूक मारून टाकतात, आपल्याला आत्मिक निऱ्या दुधापासून दूर ठेवतात, अशा रोगांचा आपण प्रथम उपचार केला पाहिजे. अशा एकेका रोगासंबध ी आपण थोडक्यात विचार करू या.

**द्वेष** : दुसऱ्यांनी आपल्याला योग्य तऱ्हेने वागविले नाही तर आपण त्यांच्यावर रागावतो. त्यांच्याविरुद्ध वागतो. यामागे आपली क्षमाशील वृत्ती नसते.

नाझी लोकांच्या छावणीत कोरीटेन बूमने अनन्वित छळ भोगला. तिची मैत्रिण, तिला खूप प्रिय होती. नाझींनी तिच्या देखत त्या संतासमान मैत्रिणीचे हाल हाल करून तिला मारून टाकले. अशा भयंकर क्रूर शिपायांना देखील तिने क्षमा केली. तेव्हा ती म्हणाली,

"क्षमा करण्याची कृति इच्छेनुसार घडते. हृदयाच्या अवस्थेवर इच्छाशक्ती अवलंबून नसते."

तुमच्या मनात एखाद्याला क्षमा न करण्याची भावना असेल – मग त्या व्यक्तीने तुमचा किती छळ केला असेल – तुम्ही त्याला क्षमा केली नाही तर त्याला फार त्रास होणार नाही. परंतु तुमचे आत्मिक

जीवन मात्र घुसमटून जाईल ! त्या व्यक्तीची क्षमा करीपर्यंत तुम्ही मात्र तिच्या बंधनात राहाल. त्याचवेळी प्रभुने शिकविलेली प्रार्थना तुम्ही करू शकाल "आम्हाला आमच्या पापांची क्षमा कर, कारण आम्हीही आपल्या प्रत्येक ऋण्याला क्षमा करतो" (लूक ११:४). जर तुम्ही तुमच्या अंतःकरणातील द्वेष समजत असाल तर त्या व्यक्तीची क्षमा करा. देवाबरोबर तुम्ही जेव्हा एकत्रित समयात येता तेव्हा तुम्हाला याची जाणीव होईल. मग ज्याने तुमच्या विरुद्ध काही केले असेल अशा व्यक्तीप्रत देवाची प्रिती तुम्ही प्रमाणिकपणे दाखवू शकता!

लबाडी : आपले पाप कबूल न करता त्यावर पांघरूण घालणे किंवा त्याचे उदारीकरण करणे. प्रामाणिकपणाऐवजी ढोंगीपणाने जगणे.

ढोंगीपणा : आपल्यासंबंधी अवाजवी, चुकीचे व गर्विष्ठपणाचे चित्र इतरांपुढे उभे करणे. आपण कोणी नसतांना कोणीतरी विशेष आहोत असे भासविणे. लोकांनी म्हणजे पालक, मित्र, सहकारी आपल्याला मानावे या भावनेच्या मुळाशी ढोंगीपणा असतो.

मत्सर : दुसऱ्याच्या आनंदात भाग न घेता संशयाने त्याकडे पाहाणे. दुसऱ्यांना जे प्राप्त झाले आहे ते आपल्यालाही मिळावे अशी हावरेपणाची भावना.

दुर्भाषण : आपल्या जिभेने दुसऱ्यांविषयी वाईट बोलणे किंवा दुसऱ्यांचे चारित्र्य हनन होईल असे ऐकणे. आपल्या स्वतःच्या पापांची तीव्रता कमी व्हावी म्हणून दुसऱ्यांच्या जीवनातील पापासंबंधी चवीने बोलणे किंवा ऐकणे.

देवाच्या वचनाने आपले आत्मिक जीवन सुदृढ होण्यासाठी

अशा गोष्टी आपण दूर सारल्या पाहिजेत. नवजात बालकाला भूक लागते तेव्हा त्याला दूध पिण्यासाठी आग्रह करावा लागत नाही. तसेच तुम्हाला जेव्हा आत्मिक भूक लागते तेव्हा पवित्र शास्त्र वाचण्यासाठी तुम्हाला आग्रह करण्याची गरज नसते. तुमची आध्यात्मिक वृद्धि व्हावी म्हणून निऱ्या दुधाची (वचनाची) इच्छा धरा (१ पेत्र २:२). जिवंत सहभागिता आणि स्वकेंद्रित जीवन एकत्र राहू शकत नाही.

एका जपानी महिलेकडून तिच्या वतीने काम करण्यासंबंधी मला एक पत्र आले. ज्या ठिकाणी पोहचून कोणी सेवाकार्य करू शकत नाही अशा ठिकाणी ती कार्य करीत होती - सरकारी आणि राजकीय वर्तुळात आणि उच्चभ्रु लोकात तिचे कार्य चालू होते. तिने लिहिले होते:

"स्वनकार करून स्वतःचा वधस्तंभ उचलून चालणे यासंबंधी काय झाले आहे? ख्रिस्ती जीवनासंबधी काही पुस्तके मी चाळली तेव्हा माझ्या लक्षात काही गोष्टी आल्या. जी अनेक पुस्तके मी गेल्या वीसपंचवीस वर्षात वाचली त्यामधून एकच मुद्दा निष्पन्न होत होता - 'ते तूं स्वतः कर', जेणे करून ख्रिस्ती लोकांचे जीवन सुधारेल, तुझेही जीवन अर्थपूर्ण होईल. मी सुरुवातीला जी पुस्तके वाचली त्यामध्ये स्वनाकारावर भर दिलेला होता, रोज वधस्तंभ वाहावयाचा होता, पवित्र जीवन जगावयाचे होते, ख्रिस्तात राहून त्याला माझ्या जीवनात कार्य करू द्यावयाचे होते. ही शिकवण हळूहळू अदृश्य होत होती काय? किंवा मी त्यासंबंधी केवळ कल्पनाच करीत होते काय?"

"एका चिनी लेखकाने अशाच आशयाचे विचार मांडले आहेत.

तो लिहितो, ‘‘पश्चिमेकडील राष्ट्रात किंवा मुक्त जगामध्ये येशूच्या विजयी पुनरुत्थानापेक्षा लोक वेगळा विचार करीत आहेत असे दिसते. तसेच नाते त्यांना ख्रिस्ताशी हवे आहे. पुनरुत्थित येशूचा विजय, भरभराट आणि सर्व काही अबाधीआबाद असे त्यांना पाहिजे. अगदी थोडे लोक ख्रिस्ताच्या दुःखसहनात सहभागी होतात. याउलट आशीयामधील मंडळ्यांची स्थिती आहे, विशेषतः जेथे परिस्थिती अधिक बंधनकारक आहे अशा देशात वेगळीच स्थिती आहे. तेथील विश्वासणारे खिस्ताच्या दुःखाशी मनापासून समरस होतात. त्यांच्यामते ख्रिस्ताकरिता दुःख भोगणे हे त्यांच्याकरिता उत्तम पारितोषिक आहे.’’

## ख्रिस्ताच्या मृत्यूशी अनुरुप होणे

प्रेषित पौलाने स्वतः प्रार्थना केली :

‘‘तो (प्रभु येशू ख्रिस्त) व त्याच्या दुःखाची सहभागिता व त्याच्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य ह्यांची त्यांच्या मरणाला अनुरुप होऊन मी ओळख करून द्यावी’’ (फिलिप्पै ३:१०).

आमोसने अशाच प्रकारे प्रभु येशूबरोबर सहभागिता साधण्याची उच्च महत्वाकांक्षा बाळगली होती. त्यासंबंधी पौलाने विचारले आहे. ‘पूर्वसंकेत केल्याशिवाय दोघेजण एकमेकांबरोबर चालतील काय?’ (आमोस ३:३). जर येशूच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्यात चालण्याची आपण इच्छा केली असेल तर अर्थातच आपण त्याच्या दुःखाचे वाटेकरी होणे आवश्यक आहे. अर्धवट स्वीकार म्हणजे स्वीकार नव्हेच.

पौलाचा प्रेषितीय अधिकार झुगारणाऱ्या त्याच्या नवीन शिष्यांसंबंधी बिनशर्त प्रीति करण्यासंबंधी पौलाने नेमक्या शब्दात म्हटले, ‘‘मी तुमच्या जिवांसाठी फार आनंदाने खर्च करीन व मी

स्वतः सर्वस्वी खर्ची पडेन. मी तुम्हावर अतिशयच प्रीति करतो म्हणून तुम्ही माझ्यावर कमी प्रीति करता काय?" (२ करिंथ १२:१५). आणखी त्याने खऱ्या प्रितीची व्याख्या करून जोरदार समर्थन केले : प्रीति सहनशील आहे, परोपकारी आहे....स्वार्थ पाहात नाही..... " (१ करिंथ १३:४-५).

येशू ख्रिस्ताद्धारे अशा प्रकारची कठीण दुःखसहन करणारी, निस्वार्थी प्रीति दाखविण्यात आली. प्रीतिशून्य जगामध्ये येशू आला तेव्हा मानवी देहातून त्याने देवाची परिपूर्ण प्रीति कशी आहे हे स्वतः दाखवून दिले. त्याचे शब्द, त्याचे विचार, त्याची कृती, पित्याच्या इच्छेला संपूर्ण मान देऊन त्याप्रमाणे करणे यामधून त्याची निस्समी, निस्वार्थी प्रीतिच दिसून येते. त्याच्या सेवेच्या प्रारंभापासून ते थेट त्याच्या वधस्तंभावरील प्राणार्पणापर्यंत येशूने एक पूर्ण मानव म्हणून त्याला जे अधिकार होते त्यांचा त्याने कधीच वापर केला नाही आणि स्वहीत साधण्याचा प्रयत्नही कधी केला नाही.

पृथ्वीतलावरील त्याच्या तेहतीस वर्षांच्या आयुष्यात त्याने स्वतःचे जीवन समर्पित केले (१ योहान ३:१६) व त्याद्वारे इतरांचे हीत जपले. जेव्हा क्रूसाचे भयंकर दुःख त्याला सोसावयाचे होते त्याबद्दल आपण वाचतो : "'येशूने आता ह्या जगातून पित्याकडे जाण्याची आपली वेळ आली आहे हे जाणून जगातील स्वकीयांवर त्याचे जे प्रेम होते ते त्याने शेवटपर्यंत केले' (योहान १३:१).

त्याने खरोखर शेवटपर्यंत प्रीति केली. म्हणून आपल्या तारणाऱ्याशी आपल्याला खरी सहभागिता साधावयाची असेल तर स्वपरीक्षणासाठी एक प्रश्न आपण स्वतःला विचारा.

***देवाने ज्या सुसंधी व सुविधा मला दिल्या त्या मी स्वहीतासाठी वापरतो का किंवा त्या सुविधांचा उपयोग मी दुसऱ्यांच्या कल्याणाकरिता करतो आणि त्याबदल्यात दुःख सहन करण्यासाठी मी तयार आहे काय?***

'मी-मी' करणाऱ्या आजच्या स्वार्थी पिढीत देवाची प्रीति हा विरोधाभास आहे. आजची पिढी असे मानते की स्वप्रेम हा सद्‌गुण आहे. दुसऱ्यांच्या कल्याणापेक्षा स्वतःचे कल्याण हे महत्वाचे आहे. अशा प्रकारची स्वार्थीवृत्ती बळावत जाणे हे शेवटल्या दिवसांचे लक्षण आहे असे शास्त्रवचन सांगते : माणसे स्वार्थी, धनलोभी... देवावर प्रेम करण्याऐवजी सुखविलासाची आवड धरणारी होतील'' (२ तीमथ्य ३:२,४).

म्हणूनच अलेक्झांडर मॅकलॅटेन म्हणतो, ''अत्युच्च आत्मिक आनंदाप्रत नेणारा मार्ग हा स्वप्रेमाला विव्हळ करून रक्ताने माखलेला असतो.''

कोणतेही पाप, मग ते विचाराने किंवा आचाराने घडले असेल, त्याद्वारे आपल्या अनुवंशीक पापी स्वभावाचा तो ज्वलंत पुरावाच असतो. चेंबर यासंबंधी म्हणतात, ''माझा हक्क हा केवळ माझ्यासाठीच आहे'' असे पापी लोक समजतात. मग असे लोक नैतिकता-अनैतिकता याचा विचार करीत नाहीत. स्वार्थीपणा आणि निर्दयपणे केलेली चोरी यातील भेद समजणे सोपे आहे. परंतु माणसातील स्वार्थ हा अनेक गूढ मार्गांनी पुढे येत असतो हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे.

कुटुंबात, समाजात किंवा मंडळीमध्ये जे ताणतणाव निर्माण

होतात त्यासाठी 'मी व माझा हक्क' ही विचारसरणीच कारणीभूत असते. माझा पैसा, माझा वेळ, माझी पद्धत, माझी इच्छा, माझी गरज यांचे स्तोत्र माजते. ज्यामधून देवाची प्रीति परावर्तित होत नाही. अशा सर्व गोष्टी म्हणजे मनुष्याच्या हृदयातील स्वार्थीपणाच होय.

## माझा स्वर्गीय दृष्टीकोन

आपली स्वकेंद्रित वृत्ती न्याहाळण्याचा एकमेव चांगला मार्ग म्हणजे आपण देवाच्या दृष्टिकोनातून स्वतःकडे पाहिले पाहिजे. पौलाच्या कलस्सैकरास लिहिलेल्या पत्राप्रमाणेच जे.बी. फिलिप्स त्यांच्या 'तरुण मंडळ्यास लिहिलेल्या पत्रांत म्हणतात,

''आम्हीही तुम्हासाठी खंड पडू न देता प्रार्थना करून मागतो की, सर्व आध्यात्मिक ज्ञान व बुद्धि ह्याच्याद्वारे तुम्ही त्याच्या इच्छेसंबंधीच्या पूर्ण ज्ञानाने भरले जावे'' (कलस्सै १:९).

पौलाचे अनुकरण करून जेव्हा आपण आपले आध्यात्मिक चक्षू उघडावेत म्हणून देवाला प्रार्थना करतो तेव्हाच आपल्या वैयक्तिक जीवनातील खरी स्थिती आपल्याला दिसते. आपल्या स्वकेंद्रित वृत्तीच्या नजरेतून नव्हे तर देवाच्या स्वर्गीय दृष्टीने आपण पाहिले पाहिजे. देवाच्या आध्यात्मिक लोकांतूनच आपल्याला आपल्या जीवनतील खरे काय ते दिसू शकते.

माझी आणि डॉरथीची मैत्रिण मिसेस सायलेन्स हीने एका रात्री प्रार्थनापूर्वक तिच्या कुटुंबातील तणावाकडे स्वर्गीय दृष्टीने पाहिले तेव्हा तिला खूप हलके वाटले. रात्री २:०० वाजता टेलिफोनची घंटा वाजली आणि ती जागी झाली. ''आज रात्री तुझी मोटार कोण चालवित होते

तुला ठाऊक आहे काय? असे एका पोलिस अधिकाऱ्याने तिला विचारले. तिने उत्तर दिले ‘‘होय माझी दोन मुले बायबल कॉन्फरंस संपवून घरी मोटारीने परत येत होती.’’ तो अधिकारी म्हणाला, ‘‘तुझ्यासाठी वाईट बातमी आहे. ड्रायव्हर गाडी चालतांना झोपला आणि रस्त्याच्या कडेला असणाऱ्या झाडावर गाडी आदळली. तो जागीच मरण पावला व दुसरा मृत्यूशी झुंज देत आहे. तो जगेल असे वाटत नाही. ‘‘ही भयंकर बातमी ऐकून ती माता अतिशय गांगरली. तिचे दोन्ही मुलांवर फार प्रेम होते.

टेलिफोन तिने खाली ठेवला आणि स्वर्गीय पित्याचा धावा केला, ‘‘हे बापा, अशा भयंकर परिस्थितीत एका आईने आता काय करावे’’? योग्य दिशेने विचार करणे आणि प्रार्थना करणे हे ती शिकली होती. नंतर तिने मला सांगितले, ‘‘सर्व स्थितीत उपकारस्तुती करा’’ या वचनाचा तिने आधार घेतला (**१** थेस्सल **५:१८**). त्या पुढे प्रार्थना करीत राहिल्या, ‘‘परंतु हे पित्या आता माझे हृदय उपकारस्तुती करू शकत नाही. ते थंड आणि अगदी रिकामे झाले आहे, त्याला प्रचंड हादरा बसला आहे. परंतु या भयाण रात्री मी तुझ्या वचनाचे पालन करीन. ते करीत असतांना तू माझ्या हृदयात चमत्कार घडव. मी तुझी आज्ञा पाळून म्हणजे प्रभू मी तुझे आभार मानते तेव्हा तू ते खरे कर कारण प्रभू या दुर्धर प्रसंगी मी खरेच तुझे आभार कसे बरे मानू? अशा रीतीने मिसेस सायलंसने आपला विश्वास दाखवून प्रार्थना केली.

या मृदू हृदयाच्या स्त्रीने मला सांगितले की जेव्हा तिने प्रथम म्हटले, ‘‘प्रभु तूं कोण आहेस त्याबद्दल मी आभार मानते’’. तेव्हा

तिचे हृदय थंड व रिकामे झाले होते. परंतु जेव्हा तिने प्रभुचे आभार वारंवार मानले तेव्हा पवित्र आत्म्याद्वारे चमत्कार घडला. पवित्र आत्म्याने तिच्या दुःखी हृदयात शांती भरली आणि मनापासून ती प्रभुचे आभार मानूं लागली. त्या भयाण रात्रीच्या वेळी देवाचा कैवारी पवित्र आत्मा तिच्या आज्ञापालनाला योग्य प्रतिसाद देत होता. देवाच्या अगाध प्रीतीचा अनुभव तिला येत होता. सकाळ होईपर्यंत तिच्या डोळ्यातील अश्रू वाहतच होते. परंतु देवाच्या अनन्य शांतीचाही तिला अनुभव येत होता.

देवाच्या अलौकिक कृपेची ही साक्ष आहे. देवानेच त्या भयंकर दुःखी मातेला त्याच्या प्रीतीच्या वेष्टनाने लपेटले. मिसेस सायलंस अगदी ठाम विश्वासाने म्हणाल्या की त्या भयाण रात्री सर्व बुद्धिसामर्थ्या पलीकडे असलेली देवाची शांती त्यांच्या हृदयात ओतःप्रोत भरली होती. जेव्हा एखादे संकट कोसळते तेव्हा देवाबरोबर चालणे त्यात मानवी दृष्टिकोन आणि स्वर्गीय दृष्टिकोन किती भिन्न असतात हे मिसेस सायलंसनी सिद्ध केले आहे.

जेव्हा देवाबरोबर तुमची घनिष्ट सहभागिता असते तेव्हा तुम्हाला देखील समजेल की उपकारस्तुती आणि विश्वास ही दोन्ही एकमेकांशी निगडीत असतात. उपकारस्तुतीमुळे तुमचे हृदय विश्वासाने भरून वाहते. तुमच्या परिस्थितीची जाणीव व बदल देव दाखवून देतो - परिस्थिती चांगली असो किंवा वाईट - तो त्याच्या दृष्टीने आपल्याला पाहावयास लावतो. अशा स्वर्गीय दृष्टिने आपण पाहिले तर देव आपल्याला खात्री पटवून देतो व आपल्या दुःखी हृदयावर फुंकर घालतो. ‘‘देवावर प्रीति करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे

बोलाविलेल्यास देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात" (रोम ८:२८). यावचनातील सत्य हे कधीच थंड वा रिक्त राहत नाही. देवाने हे अद्‌भुत सत्य आपल्याला दिले आहे आणि ते आपल्या हृदयात सतत निनादत राहिले पाहिजे. जेव्हा तुम्हाला असा अनुभव येतो तेव्हा देवाची स्तुती करा! जेव्हा तुम्ही निराश होता तेव्हा देवाची स्तुती करा. तुम्हाला देवाच्या प्रीतिचा अनुभव येईपर्यंत स्तुती करा. आपल्या जीवनात असा एकही प्रसंग नसतो की जेव्हा आपण देवाची स्तुती करू शकत नाही.

मध्य पूर्वेत अगदी तणावपूर्ण वातावरणात सेवा करणाऱ्या काही मिशनऱ्यांचे मला व डॉरथीला नुकतेच एक पत्र आले. स्टॅन आपल्या पत्रात लिहितो, "माझा कैवारी म्हणून नव्हे तर देवाच्या गुणामुळे मी त्याची स्तुती केलीच पाहिजे". क्षमाशीलते संबंधी कोरी टेन बूम म्हणते तसेच आपण म्हटले पाहिजे की देवाची स्तुती करणे ही इच्छेची कृती आहे. हृदय कसे आहे यावर देवाची स्तुती करणे यासंबंधीची इच्छा करणे अवलंबून नसते. जेव्हा आपण त्याची स्तुती करण्याची निवडतो तेव्हा तो आपले अंतःकरण तेजस्वी बनवितो, शांतीने भरतो. त्याची अक्षय शांती हृदयात वसते - मग आपली परिस्थिती कशीही असो.

प्रत्येक गोष्टीसंबंधी आपण आभार मानवयाचे नाही तर प्रत्येक गोष्टीत आपण आभार मानावयाचे आहेत हे ध्यानात घ्या.

***आपल्या स्वर्गीय दृष्टीने आपण मनापासून आभार मानीत असतो. तो विश्वासाचा भाग असतो. त्यामुळे दुःखापसून स्वतःची कीव करणे दूर होते.***

आपण मंदिरात असूं किंवा दवाखान्यात परंतु हे सत्य आहे.

जीवनात वादळे उठतात अशावेळी सर्वत्र आढळणारी 'स्वतःची कीव' करण्याची वृत्ती उचंबळून येते. परंतु ख्रिस्त केंद्रित हृदय कोणत्याही परिस्थितीत प्रभुची स्तुतीच करील.

"दुःखाच्या पहिल्याच आघाताने आपण कोलमडून जातो. दैवी योजना म्हणून आपणावर कोसळलेल्या आपत्तीबद्दल स्वतःचीच कीव करीत बसतो. तथाकथित ख्रिस्ती सहानुभूतिमुळे तर उलटच परिणाम होतो. परंतु देव त्याच्या अगाध प्रीतिस्तव असे कधीच करीत नाही. आपल्या प्रिय पुत्राचा जखमी हात धरून तो आपल्याकडे येतो आणि म्हणतो, "माझ्या सहभागितेत ये, ऊठ, प्रकाशमान हो'. जर देव जखमी हृदयातून त्याचा हेतू पूर्ण करतो; तर त्याने तुमच्या हृदयाला जखम केली म्हणून तुम्ही त्याची स्तुती करा." (ओझवाल्ड चेंबर्स - माय अटमोस्ट फॉर हीज हायेस्ट)'

आपल्या जीवनामधील 'सर्व गोष्टीत' त्याच्या प्रेमाची दखल घ्या. पुढील वचनात तो हेतू स्पष्ट केला आहे - 'त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे' (रोम ८:२९).

देवाने आपल्याला किती गौरवी स्वातंत्र्य दिले आहे हे आपण जाणले पाहिजे. ते आपण स्वर्गीय दृष्टिकोनातून अजमावले पाहिजे.

स्वकेंद्रित जीवनासंबंधी देवाचे उत्तर म्हणजे प्रगती अथवा शिक्षण नाही तर मृत्यू हेच आहे! या पृथ्वीतलावर जगत असतांना आपण केवळ स्वकेंद्रित जीवनाच्या आकर्षणाप्रत आलो तर अमोघ विश्वासच आपले जीवन देवाबरोबर आनंदमय करतो. "कारण तुम्ही मृत झाला आहे आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे" (कलस्सै ३:३)

आपले जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे,

“मरण, पुरले जाणे आणि पुनरुत्थान याद्वारे” (रोम ६:२-४). त्यामुळे आमचे ज्या जगाशी बंधन नष्ट झाले, आमचे स्वकेंद्रित जीवनही संपले. आता आपण वधस्तंभाची दुसरी तेजस्वी बाजू म्हणजे पुनरुत्थानाकडे पाहणे किती आनंदमय आहे!

खिस्तात मी मेलो, खिस्ता उठलो,
शत्रुवर विजय मी खिस्तात मिळविला,
खिस्तात मला स्थान मिळे स्वर्गात,
नरकाच्या पराजयाने स्वर्ग आनंदला,

जुने मनुष्यपण मारून खरा खिस्ती नवीन मनुष्य बनतो. आपले तारण यातच सामावलेले आहे.

जेव्हा आपण खिस्ताबरोबर वधस्तंभाला खिळले गेलो आहोत हे आपल्या ध्यानात येते तेव्हा आपल्या स्वकेंद्रित जीवनात परिवर्तन घडून येते व आपण खिस्तकेंद्रित जीवन जगू लागतो. अशी घनिष्ट व सातत्याची सहभागिता आपण अनुभवतो तेव्हा आपले जीवन म्हणजेच जगिक समस्यांना आपण कसे तोंड द्यावे हे आपल्याला समजते.

## माझी जगिक समस्या

हृदयाचा ठाव घेणारा एक प्रश्न आता आपण विचारला पहिजे ‘माझे जीवन आता खिस्तकेंद्रित आहे किंवा ते अद्याप स्वकेंद्रितच आहे?’

स्वकेंद्रित जीवन कोणाही व्यक्तीविरुद्ध शत्रुत्व उभे करू शकते. तेव्हा अशा व्यक्तीची सुरक्षितता, स्वत्व, स्वास्थ किंवा आनंद धोक्यात

येतो तेव्हा ती चिडते. जी. कॅम्पबेल मोर्गनने असे म्हटले आहे, 'पापाचा अर्क म्हणजे स्वकेंद्रित वृत्ती, शत्रुत्वाचा गाभा आणि नरकाची निर्मिती करणारे तत्व म्हणजे स्वकेंद्रित वृत्ति (होसिया : द हार्ड अँड होलीनेस ऑफ गॉड).

एका सायंकाळी एक स्त्री प्रार्थना सभेत अगदी मनापासून प्रार्थना करीत होती. तिच्या जीवनात परिवर्तन झाले होते. ती प्रार्थनेत म्हणाली, ''प्रभु येशू, तुझे प्रेमाचे हात लांब कर. वधस्तंभाशी मला जखडून टाक आणि मला मृत्यु देऊन मजवर प्रीति कर. असे कर की आता हे जीवन माझे नसून ख्रिस्ता तुझेच होऊ दे!'' तिच्या प्रार्थनेमुळे मी भारावून गेलो.

मरण आणि पुनरुत्थानाच्या प्रक्रीयेमुळे त्या स्त्रीची मुक्तता झाली हे तिला समजले होते. तरीही ख्रिस्ताबरोबर स्वर्गात राहण्यासाठी तिला हे जड देहातील जीवन जगावे लागत आहे याची तिला नेहमी खंत वाटे. म्हणून ती प्रार्थना करीत होती तेव्हा स्वार्थी कृत्ये आणि तिचे जगिक विचार यासाठी ती देवापाशी कळकळीने उत्तर मागत होती. अशी प्रार्थना म्हणजे तिची कळकळीची आर्त विनंती होती. देवाच्या निकट सहवासाची तिला भूक होती. या तिच्या प्रार्थनेवर मी बराच विचार केला; तेव्हा पौलाने सुद्धा अशा हृदय भग्न करणाऱ्या विनंतीसंबंधी बोध केला हे मला दिसून आले. पौल म्हणतो, ''जर तुम्ही देहस्वभावाप्रमाणे जगलात तर तुम्ही मरणार आहा, परंतु जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे ठार मारलीत तर जगाल'' (रोम ८:१३).

माझ्या काही वाचकांना वरील वचनांवर माझे विचार उपयोगाचे

वाटतील. तर काही वाचकांना पुढील परिच्छेदाचे उदाहरण उपयोगाचे व व्यवहारिक वाटेल. या वचनाचा अर्थ ग्रीक भाषा जाणणाऱ्यांना अधिक स्पष्टपणे कळतो.

*''जर तुम्ही देहस्वभावाप्रमाणे जगलात तर तुम्ही मरणार आहा, परंतु जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे ठार मारलीत तर जगाल'' (रोम ८:१३).*

प्रथम : मूळ ग्रीक भाषेत 'तुम्ही' हा कर्ता आहे 'ठार मारली' ह्या क्रियापदाचा. हे वाक्य कर्मणी प्रयोगातील आहे.

पवित्र शास्त्राप्रमाणे – माझ्या शरीराच्या कर्मापासून मला सुटका हवी असेल म्हणजेच माझ्या स्वकेंद्रित वृत्तीपासून मला मुक्ती हवी असेल तर देवाबरोबर मी सक्रीय सहकार्य केले पाहिजे.

दुसरे : या वचनात म्हटले आहे की 'आत्म्याने' (देवाचा मदतनीस) ही कर्मे ठार मारावयाची आहेत. मगच देव सर्व गोष्टींची तरतूद करतो व आपल्या जगिक गोष्टींपासून तो आपल्याला मुक्त करून विजयी करतो.

पवित्र शास्त्राप्रमाणे : मी या प्रक्रियेत प्रार्थनापूर्वक सहभागी झालो तरी केवळ माझ्याच प्रयत्नाने मी माझी स्वार्थी कृत्ये ठार मारू शकत नाही. मी या जगात राहात असतांना फक्त पवित्र आत्माच मला माझ्या स्वकेंद्रित वृत्तीतून पूर्ण दूर करू शकतो.

तिसरे : हे वचन वर्तमान काळात लिहिले आहे. याचाच अर्थ असा की मी माझी प्रार्थना व देवाबरोबर असलेली माझी सक्रीय सहभागिता सातत्याने केली पाहिजे.

पवित्र शास्त्राप्रमाणे : जेव्हा एखादी ख्रिस्ती व्यक्ती प्रथमच

पवित्र आत्म्याला विनंती करते की स्वकेंद्रित जीवन मृत होऊ दे तेव्हा तिला जीवन परिवर्तनाचा अनुभव आलेला असतो. परंतु ही एकदाच अनुभवण्याची गोष्ट नाही. जेव्हा जेव्हा स्वकेंद्रित वृत्ती डोके वर काढते तेव्हा तेव्हा आपण पवित्र आत्म्याच्या मुक्ती कार्यासाठी प्रार्थना केली पाहिजे. जेव्हा आपण पवित्र आत्म्यासारख्या मुक्तीदात्यावर विसंबून राहतो व प्रार्थना करतो तेव्हा स्वार्थी कृत्यांना आपण ठार मारतो.

देवाची आपणासंबंधी अशी इच्छा आहे की आपली विश्वासू वृत्ती ही सतत चालू असलेली व जिवंत अनुभव देणारी अशी असावी.

याच्या स्पष्टीकरणासाठी म्हणून आपण अशी कल्पना करू की आपण एका न्यायालयात आहोत. तेथे एका मनुष्यावर खुनाचा आरोप केला आहे. त्याच्या विरुद्ध पुरावा सादर करण्यात आला आहे आणि गुन्हा शाबीत झाला आहे. आता न्यायाधीश त्याला शिक्षा सुनावणार आहेत. कोर्टात शांतता पसरली आहे. न्यायाधीश म्हणतात, ‘‘या आरोपीवरील खुनाचा आरोप सिद्ध झाला आहे व त्याला मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावण्यात येत आहे.’’

या जळजळीत वाक्याबरोबर न्यायाधीशाचे काम संपते; परंतु न्यायधीशाने जर गोळी झाडून त्या आरोपीला मारून टाकले तर खुद्द तो न्यायधीशच मृत्युदंडास पात्र ठरेल!

आरोपीला मृत्युदंड ठरविल्यावर न्यायाधीशाचे एकच काम असते की त्याने त्या आरोपीला पोलीसांच्या ताब्यात पुढील कारवाईसाठी सोपविणे.

अशाच प्रकारे, आपले स्वार्थी आयुष्य स्वतः होऊन काहीच करू शकत नाही. फक्त आपण आपला स्वार्थीपणा ओळखून तो कबूल करणे एवढेच बाकी राहते. त्या न्यायाधीशाप्रमाणे आपल्या स्वार्थी प्रवृत्तीला ठार करण्याची शिक्षा आपण ठोठावू शकतो. न्यायाध ीश जसे आरोपीला स्वतः ठार करू शकत नाही तसेच आपण स्वतःच आपल्यामधील स्वार्थी प्रवृत्तीला ठार करू शकत नाही. देवाने असा पवित्र आत्मा त्या प्रवृत्तीला ठार करण्यासाठी आपल्याला दिला हे आपले सुदैवच आहे. तो पवित्र आत्मा आपल्यामधील स्वार्थी प्रवृत्ती नामशेष करू शकतो.

देवाच्या कृपेने आत्म्याद्वारे आपण शरीराची कर्मे ठार मारू शकतो. आपण ही कृती अखंडपणे आणि जाणीवर्पूक करीत राहिलो तर आपल्याला ख्रिस्त केंद्रित जीवन जगण्याचा आनंद निश्चित प्राप्त होईल.

वचनाच्या या सुस्पष्ट शिकवणीने आणि त्या स्त्रीच्या मुखातून निघालेली ती प्रेरणादायक प्रार्थना ऐकून अनेकवेळा मी देखील उत्स्फूर्तपणे अशी प्रार्थना करतो.

***हे प्रभु, तुझ्या पवित्र आत्म्याने मला वधस्तंभाशी जखडून टाक आणि माझ्यातील स्वार्थ मारून टाकणारी प्रीति मजवर कर. आता हे प्रभु मी जगत नाही तर ख्रिस्तच माझ्यामध्ये जगत आहे!***

देवाच्या वचनाद्वारे आपले पोषण व्हावे व त्यामुळे आपले जीवन तृप्त व्हावे हाच अंतीम उद्देश आहे असा विचार करणे सोपे वाटते;

पण ते तसे नाही! जुन्या करारातील याजकांनी त्यांच्या लोकांना उत्तम अन्न का दिले? उत्कृष्ठ प्रतीचे लोक जगासमोर यावेत म्हणून? विल्यम स्टील म्हणतात की या मेंढराचे पालन-पोषण केले ते त्यांच्या वध ासाठी. त्यांच्या जन्मापासूनच ते वधाकडे प्रवास करीत होते.

काही वेळा ख्रिस्ती लोक असा गैरसमय करून घेतात की संगीत किंवा वक्तृत्वात ते निपुण झाले म्हणजे ते ख्रिस्ताला खूष करू शकतील. अनेक लोकांनी त्यांच्यातील कलागुणांना वाव द्यावा व त्यांची वाहवा करावी म्हणजे ख्रिस्त संतुष्ट होईल असा त्यांचा समज असतो. देव पवित्र आत्म्याद्वारे आपले पोषण प्रेमाने करतो तेव्हा आपण लोकांसमोर कौतुकाने स्वतःला सादर करावे असा त्याचा हेतू नसतो. उलट वेदीवर आपण स्वतःला यज्ञ म्हणून सादर करावे अशी त्याची इच्छा असते. जिवंत असेपर्यंत आपल्यातील सर्वस्वास आपण ठार मारले पाहिजे - स्वतःची कीव, स्वसामर्थ्य, स्वकेंद्रित वृत्ती, स्वतःला खूष ठेवणे, स्वसमर्थन अशा सगळ्या स्वतःचेच टुमणे वाजविणाऱ्या गोष्टी आपण आपल्या जीवनातून नष्ट केल्या पाहिजेत*

---

* पवित्र शास्त्रात मृत्यू म्हणजे नष्ट होणे नसून विलग होणे होय. शारीरिक मृत्यु म्हणजे आत्म्याचे शरीरापासून विलग होणे हाये. सार्वकालिक मृत्यु म्हणजे आत्म्याचे देवापासून कायमचे विलग होणे होय. तसेच स्वार्थी जीवन मारून टाकणे म्हणजे स्वार्थी कृतीपासून सतत विलग राहणे होय. आणि आपण अगोदर पहिल्या प्रमाणे, हे कार्य पवित्र आत्म्याशिवाय कधीच पूर्ण होऊ शकत नाही.

अतिशय दुःखी अंतःकरणाने पौलाने म्हटले की कलस्सैकरांच्या मंडळीची काळजी वाहण्यासाठी तीमथ्याशिवाय दुसरा कोणीही त्याला सापडला नाही. कारण त्या शहरामध्ये राहणाऱ्या ख्रिस्ती लोकांना 'प्रीति स्वार्थ पाहात नाही' याचा अनुभव आला नव्हता. पौल दुःखाने म्हणतो, ''सर्व जण स्वतःच्याच गोष्टी पाहात असतात. ख्रिस्त येशूच्या पाहत नसतात'' (फिलिप्पै २:२१).

जगामध्ये अनेक ठिकाणी मंडळ्यामधील लोक अनेक यातना सहन करीत आहेत. मग त्यांची काळजी घेणारे लोक आज कोठे आहेत? आपण आपल्याच मतलबी जीवनात एवढे मग्न आहोत काय की आपल्याला इतर गरजवंताचे सहाय्य करण्याचे भानच उरले नाही? आपण लक्षात घेतले पाहिजे की देवाची प्रीति स्वार्थ पाहात नाही आणि सर्व काही सहन करीत असते. जर आपल्याला गोड मोसंबीचा रस, आंबट रसाने भरलेल्या पेल्यात भरावयाचा असेल, तर प्रथम तो आंबट रस फेकून दिला पाहिजे. देवाच्या प्रीतीने आपले जीवन भरावयाचे असेल तर प्रथम आपल्या जीवनातील स्वार्थीपणा आपण काढून टाकला पाहिजे. ही दोन्ही कार्ये पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यानेच आपल्या जीवनात होत असतात ह्याबद्दल देवाची स्तुती असो. आपल्या जीवनातील स्वार्थी वृत्ती नष्ट व्हावी आणि त्याऐवजी आपल्या जीवनातून देवाची प्रीति भरून वाहावी यासाठी आपण पवित्र आत्म्याच्या सहाय्यासाठी सतत विनंती करणे किती गरजेचे आहे. ''आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे'' (रोम ५:५).

एकत्रित समयी येतांना हे सत्य तुमच्या हृदयात उचंबळून आले

तर देवाच्या वचनातील इतर सत्ये तुम्हासाठी पवित्र आत्मा उलगडून दाखवील.

'प्रत्येक विश्वासणाऱ्याने देवाबरोबर बचत खाते उघडावे' असे म्हटले जाते ते खरेच आहे. आपल्या जीवनात देवसहवासाला बाधा येणार नाही याची आपण सतत काळजी घेतली पाहिजे.

## आत्मिक तपासणी

१. देवाच्या उपस्थितीत असतांना मी ज्याबद्दल कधी पश्चाताप करून कबूल केले नाही असे कोणते पाप आहे काय?

२. मला पुढील समस्या आहे का
माफी न करणारा स्वभाव?
माझ्याबद्दल लोकांचा भ्रम होईल असे फसवेपण?
मी सारखी कुरकुर व टीका करतो कां?

३. माझा विवेक शुद्ध झाला म्हणून मी विश्वासाची आशा करावी?

४. माझे जीवन ख्रिस्त केंद्रित आहे कां स्वकेंद्रित आहे? (आता आधी दिलेली विल्यम बंटींगची अशी पातके ही प्रार्थना म्हणा)

*प्रभुसंगे चालतो जेव्हा आम्ही*
*त्याच्या वचनाच्या प्रकाशात,*
*मार्ग आमचा तो तेजाळतो!*
*त्याच्या इच्छेनुसार चालतो आम्ही*
*तेव्हा तोच असतो अंतर्यामी*
*माझ्या अन् विश्वासू सद्‌भक्तांच्या*
*कसली छाया मग भिववणार नाही*
*आकाशात काळे ढग झाकाळणार नाही*
*त्याच्या स्मीताने सारेच सरून जाईल*
*शंका नको की कसले भय नको*
*अश्रू नको की दु:खाचे उसासे नको*
*विश्वासू सद्‌भक्त त्याच्यात विसावतो*
*त्याच्या प्रितीचा गोडवा अवीट असा*
*कसा वर्णावा मज शब्द थिटे*
*फक्त वेदीवर आमचे व्हावे अर्पण,*
*किती त्याची कृपा आम्हा पामरांवर*
*आनंदाचा वर्षाव करतो तो सदा*
*विश्वासू सद्‌भक्तांवर त्याचीच कृपा*
*त्याच्या मधुर सहभागितेसह*
*आम्ही येतो त्याच्या चरणापाशी*
*कधी त्याच्यासह चालतो आनंदे*
*तो सांगेल तेच आम्ही करू*
*तो धाडेल तेथे आम्ही जाऊ*
*भीति नसे विश्वासू सद्‌भक्ताला !*
*जॉन एच.सामीज*

# एकत्रित समय

यासंबंधी आपण जेव्हा विचार करतो तेव्हा आपल्यामध्ये थोडी गर्विष्ठपणाची भावना असते. दिवसभराची आव्हाने पेलण्यासाठी आपण सक्षम राहावे यासाठी पवित्र शास्त्र वाचणे आणि प्रभु येशूच्या सामर्थ्यदायी सहवासात येणे हे अगत्याचे आहे.

दावीदाला समजले होते की बी पेरल्यावर झाड उगवते तद्वत आत्मिक जीवनही सफल होत असते. त्याने म्हटले की जो कोणी देवाच्या वचनाचे मनन करतो तो यथासमयी फळ देणाऱ्या झाडासारखा आहे. तो जे काही हाती घेतो ते सिद्धीस जाते (स्तोत्र १:३).

कोणत्या प्रकारच्या मनुष्याची भरभराट होईल असे देव म्हणतो? जो पुरुष परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो, त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करतो अशाची भरभराट होईल असे अभिवचन देव देतो. (स्तोत्र १:२)

ज्या लोकांनी ख्रिस्ताचा स्वीकार केला व त्याला आपल्या हृदयात

वसवले आहे अशांना मी नेहमी सांगतो. रोज एक अध्याय वाचा, आणि सैतानापासून जीव वाचवा. तुमचा शास्त्रभाग एकदा वाचा आणि मग पुन्हा त्याकडे वळा. मग तुम्हाला एकेक वचनावर चिंतन-मनन करता येईल. रानात गाय कडबा खातांना तुम्ही पाहिले कां? ती प्रथम तो कडबा किंवा गवत चावून गिळून टाकते. नंतर ते पुन्हा तिच्या तोंडात येते व मग ती बारीक चावून पुन्हा गिळते म्हणजे ती रवंथ करते व मग त्यातून तिला पोषक द्रव्ये मिळातात. देवाचे वचन ग्रहण करतांना असेच घडते.

सत्तराव्या वाढदिवसाला एक मनुष्य ख्रिस्ताकडे वळला. त्यावेळी त्याला पवित्र शास्त्रासंबंधी थोडी कल्पना होती. ख्रिस्तात त्याचा नवा जन्म झाला त्यापूर्वी तो उपासना मंदिरातही जात नव्हता. त्याला पुरेसे शिक्षणही घेता आले नव्हते. परंतु त्याचा नवा जन्म झाला आणि देवाच्या कृपेत त्याची वाढ व्हावी अशी त्याची इच्छा हेती. त्र्यांऐशी वर्षे तो जगला परंतु मरण्यापूर्वी त्याने पवित्रशास्त्र तेरा वेळा वाचले. तुमचे वय, शिक्षण कितीही असो, तुम्ही पवित्र शास्त्र रोज वाचू शकता.

शास्त्रवाचन, उघडे अंतःकरण, लीनता आणि दावीदाप्रमाणे प्रार्थनाः ‘‘हे देवा तू माझे नेत्र उघड म्हणजे तुझ्या शास्त्रातील अद्‌भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील’’ (स्तोत्र ११९:१८). यांच्या मदतीने आपले देवसहवासात येणे फलदायक होईल.

काही लोकांना ‘एकत्रित समय’ हा दुहेरी वाहतुकीचा समय आहे हे समजत नाही. आपण शास्त्रवचनांवर मनन करतो तेव्हा देव आपणाशी बोलत असतो. देव वचनांच्याद्वारे आपणाशी बोलतो पण दुर्दैवाने अनेक लोक देवाच्या म्हणण्याला, प्रतिसाद देत नसतात.

आपण प्रार्थनेत तरी प्रतिसाद देतो का याची देव वाट पाहात असतो. जेव्हा आपण देवाच्या वचनाला प्रतिसाद देतो तेव्हा आपली विचार प्रक्रिया सुरू झालेली असते. देवाच्या वचनाप्रमाणे आपण जेव्हा प्रार्थनापूर्वक वागतो तेव्हा ती आपल्या जगण्याची रीत बनते.

आता तुम्ही विचाराल : ‘मी पवित्र शास्त्र वाचतांना देव मजशी कसा बोलतो?’’ मी जेव्हा प्रत्येक वचन वाचतो तेव्हा त्यावर मनन करतो व माझ्या मनात येणारे प्रश्न मी वचनात उभे करतो. काही प्रश्न माझ्या मनात अनेक वर्षांपासून उभे राहिले होते. मी जेव्हा प्रभुशी बोलतो तेव्हा ह्या प्रश्नांवर माझे मार्गदर्शन व्हावे अशी मी प्रार्थना करतो. तुम्ही सुद्धा तुमच्या विचारांना अशी दिशा द्या. आणि प्रश्नांसहीत मनन करा. मी या प्रश्नांवर अवलंबून राहिलो त्यामुळे देवाबरोबर बोलतांना ते म्हणजे एक स्वभावच बनले आहेत.

तुमच्या लक्षात येईल की पुढील काही प्रश्नांकरिता आज्ञाधारकपणा हवा आहे. तर काहींना विश्वासाची गरज आहे. तुम्ही देवाच्या उपकारस्तुतीत असतांना काही प्रश्न पुढे येतील, काही प्रश्न सैतानाच्या कुयुक्तीला तोंड देण्यासाठी तुम्हाला शक्ती देतील. येशूने जसा सैतानावर जय मिळविला तसा तुम्हालाही मिळेल.

## आज्ञाधारकपणाची कृती

आपण अगोदर पाहिले आहे की आपण देवाबरोबर आपले खाते उघडले पाहिजे. म्हणजे पवित्र शास्त्र वाचतांना आपण पवित्र आत्म्याच्या सुरात ते समजू शकतो. पवित्र आत्मा आपल्या हृदयाशी सतत बोलत असतो व तो काय म्हणतो ते आपण पाळले पाहिजे.

तुम्ही देवाबरोबर एकत्र आले असता, पवित्र शास्त्र वाचतांना असे प्रश्न विचारा :

या वचनात :

आज्ञापालनासाठी आज्ञा आहे का?

कोणते पाप करू नये?

कोणता चांगला कित्ता गिरवता येईल?

कोणती वाईट गोष्ट टाळावी ?

अशा प्रश्नांमुळे तुम्हाला देवाबरोबर वैयक्तिक - दुहेरी संबंध जोडता येईल का? तुम्ही वाचलेल्या सत्यासंबंधी तुम्ही केवळ विचारच करीत राहणार नाही. देवाच्या समवेत तुम्ही या प्रश्नांची उत्तरे दिली तर तुम्ही देवाच्या म्हणण्याला दुजोरा द्याल.

पवित्र आत्मा तुम्हाबरोबर आहे हे सतत लक्षात ठेवा. शास्त्रवचन वाचतांना तुम्ही पवित्र आत्म्यावर विसंबून राहा म्हणजे तो ते वचन तुमच्या मस्तकातून नऊ इंच खाली म्हणजे तुमच्या हृदयापर्यंत पोहचवील!

जगामध्ये भयंकर उग्र परिस्थितीत आपण जगत आहोत. लोक देवाची आज्ञा पाळत नाहीत. ख्रिस्ताला नाकारणाऱ्या पिढीत आपण, आज्ञाधारक राहून त्यांच्यावर ख्रिस्ती जीवनाचा प्रभाव टाकला पाहिजे. जे सत्य देव आपल्याला दाखवतो त्याचे पालन करून आपण जगासाठी आपल्यामधून वाहणारी शक्ती मिळवू शकतो.

मी व माझ्या पत्नीने नुकतेच ओसवाल्ड यांचे ''माय अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट'' हे पुस्तक वाचले. आम्ही वाचले त्याचा सार असाः

“देव जे दाखवतो त्याचे पालन करा. म्हणजे आपोआप दुसरी गोष्ट तुमच्यापुढे उघडी केली जाईल. “मला वाटते कधी तरी मला ती समजेल” असे तुम्ही म्हणाल पण थोडे थांबा तुम्हाला ती आत्ताच समजेल! अभ्यासामुळेच तुम्हाला दृष्टी प्राप्त होईल असे नाही, आज्ञापालन दृष्टी देते. अगदी कणभर आज्ञापालन केलेत तरी स्वर्गाच्या खिडक्या उघडतील आणि देवाचे संपूर्ण सत्य तुमच्यापुढे येईल. जोवर तुम्ही देवाची आज्ञा पाळणार नाही तोवर देव दुसरे काही प्रगट करणार नाही.”

एक रात्री दोन प्रख्यात मिशनरी, सी.टी.स्टड आणि हडसन टेलर हे एका पोटमाळ्यावरील खोलीत एकत्र होते. पहाटेच टेलर यांनी पाहिले की त्यांचा जोडीदार मेणबत्तीच्या मिणमिणत्या प्रकाशात शास्त्र वाचण्यात गढून गेला होता. तो किती वेळ शास्त्र वाचत होता हे त्यांनी त्याला विचारले. उत्तरादाखल स्टड म्हणाले, ‘येशू ख्रिस्ताच्या शब्दाने मी मध्यरात्री जागा झालो. ते शब्द होते –“माझ्यावर तुमची प्रीति असेल तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल”(योहान १४:१५).

मग मी स्वतःलाच विचारले की मी प्रभुवरील प्रीति सिद्ध करण्यासाठी त्याच्या आज्ञा पाळतो कां? मग उरलेली रात्र मी शास्त्रवाचनात घालवली. शास्त्रवचनात कोणकोणत्या आज्ञा दिल्या आहेत याचा मी शोध केला. ज्या आज्ञा मी देवाच्या कृपेने पाळल्या त्यावर मी माझ्या बायबलमध्ये खूणा केल्या. आणि तेथे ‘हालेलुया’ हा शब्द लिहिला ! जेथे मी आज्ञा पाळण्यात चुकलो, तेथे मी माझे पाप कबूल केले आणि त्याच्याच कृपेने मी त्या आज्ञा पाळण्याचे ठरविले आणि मी ख्रिस्तावर प्रीति करतो हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला”.

प्रिय वाचक, जेव्हा तुम्ही देवाच्या वचनाच्या प्रकाशात त्याच्यासोबत चालता, तेव्हा त्या गीतकर्त्याप्रमाणे तुम्हालाही उमजेल की 'विश्वासूपणा आणि सद्भक्त' होणे किती छान असते!

## विश्वासाचा प्रतिसाद

पवित्र शास्त्र म्हणजे विश्वास वाढविणारे देवाचे वरदान आहे! जसजसे आपण विश्वासात वाढत जातो म्हणजे प्रभु येशूवर आपण विसंबतो व त्याच्या आज्ञा पाळतो – तेव्हा आपली खात्री पटते की 'मी नाही' पण तो करू शकतो.'

म्हणून तुम्ही प्रभुसमवेत एकत्र येता तेव्हा विचारा :
या वचनामध्ये :
मजसाठी कोणते अभिवचन आहे ?
कोणता इशारा मला दिला आहे ?

पवित्र शास्त्र अभिवचनांनी भरलेले आहे. जेव्हा आपण देवाच्या वचनावर मनन करतो तेव्हा देवाच्या त्या अभिवचनाची आपण अपेक्षा केली पाहिजे. अर्थात त्याबरोबरच आपण तो देत असलेल्या इशाऱ्याकडे लक्ष दिले पाहिजे. देवाचे अभिवचन अपेक्षित असतांना तो देत असलेले इशारे झुगारणे म्हणजे विश्वासात जगणे नव्हे, उलट ते म्हणजे मरण आहे.

तुम्ही प्रतिदिवशी पवित्र शास्त्र वाचता तेव्हा देवाच्या अभिवचनांची नोंद घ्या आणि ती तुम्ही देवाजवळ मागा. जेव्हा देवाचे अभिवचन तुम्ही आपलेसे करता तेव्हा येशू ख्रिस्ताचे शक्तीदायक सामर्थ्य तुम्हाला प्रत्येक वेळी आज्ञापालनासाठी मदत करील व ती अभिवचने सत्य झाल्याचे तुमच्या अनुभवास येईल.

तुम्ही जिवंत ‘सत्य’ व्हावे म्हणून ही अभिवचने देण्यात आली आहेत. त्यामुळे तुम्ही देवासोबत चालले पाहिजे. जेव्हा ही अभिवचने तुमच्यापाशी असतात तेव्हा तुमचा विश्वास वाढत जातो. कारण असे म्हटले आहे – “विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाद्वारे होते” (रोम १०:१७).

विश्वासाच्या नेमके उलट काय आहे याबद्दल तुम्ही कधी विचार केला आहे ? त्याचे उत्तर नाही. विश्वास, आधार अणि लीनता ही तीन भावंडे आहेत अशी कल्पना करा. याउलट आता तीन विनाशी भावंडाची म्हणजे अविश्वास, स्वाधार, आणि गर्व ह्यांची कल्पना करा.

जो मनुष्य विश्वास ठेवतो तो ख्रिस्तावर विसंबतो कारण त्याला स्वतःला जे साध्य नसते ते ख्रिस्ताला शक्य असते. ज्या मनुष्याचा विश्वास दृढ आहे त्याला पवित्र शास्त्र वाचतांना लक्षात येईल की देवाची अतूट सहभागिता ही त्याच्यासाठी आहे.

प्रभु येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांना म्हणाला, ‘माझ्यावाचून वेगळे असल्यास तुम्हाला काही करता येत नाही” (योहान १५:५). कोणाही ख्रिस्ती मनुष्याला हे समजले पाहिजे की त्याला स्वतः होऊन सार्वकालिक आत्मिक गोष्टी करणे कदापि शक्य नाही. त्या गोष्टी त्याला येशू ख्रिस्तापासून मिळणाऱ्या सामर्थ्यानेच शक्य होतात. अशा तऱ्हेचा ख्रिस्तावर विसंबून राहण्याचा विश्वास फक्त लीन हृदयातच निर्माण होतो. असा मनुष्य मग संत पौलाप्रमाणे म्हणू शकतो, “मला जो सामर्थ्य देतो त्याच्याकडून मी सर्व काही करावयास शक्तीमान आहे” (फिलिप्पै ४:१३).

अविश्वासू मनुष्य – हा स्वतःवरच सतत निर्भर असतो. त्याला देवाच्या सहाय्याची गरज वाटत नाही. दुदैवाने आज लक्षावधी लोक तारणासाठी प्रभु येशू ख्रिस्ताच्या मदतीची अपेक्षा करीत नाहीत. तसेच अनेक ख्रिस्ती लोक खरे ख्रिस्ती जीवन जगण्यासाठी हृदयात वसणाऱ्या

ख्रिस्ताचे सामर्थ्य झुगारून लावतात. अशा प्रकारे स्वतःवरच अवलंबून राहण्याची प्रवृत्ती गर्विष्ठ आणि कठीण हृदयातून निर्माण होते.

म्हणून विश्वासाच्या विरुद्ध गर्व, आणि अविश्वासाच्या विरुद्ध लीनता आहे असे आपण म्हणू शकतो. विचारांनी आपल्याला समजेल की आत्मविश्वास आणि स्वनिर्भरता ही विश्वासाविरुद्ध आपल्या हृदयात वाईट बीजे पेरतात.

जगातील कोणतीही गोष्ट आपल्या मी पणाला पोषक असेल तर त्यामुळे देवावरील व पुनरुत्थित ख्रिस्ताच्या सामर्थ्यावरील विश्वासाला ती मारक ठरते. देवाच्या प्रत्येक अभिवचनामागे त्याच्या सामर्थ्याचे स्तोत्र उभे असतात. जीवन जगत असतांना देवाने आपल्याला आपल्याच युक्ती प्रवृत्तीवर सोडून दिलेले नसते.

आपल्याच गर्वाकडे जी. के. चेस्टरटन (१८४७-१९३६) बोट दाखवून म्हणतात,

“आज आपण जे दुःख भोगतो ते आपण अयोग्य ठिकाणी दाखवत असलेल्या लीनतेमुळे भोगतो. खात्रीच्या बळावर लीनता अधिष्ठीत असते. वास्तविक ती तशी असता कामा नये. मनुष्य स्वतःविषयी साशंक असावयास हवा. सत्याविषयी तो कधीच साशंक असू नये. परंतु घडते ते नेमके उलटच.

जो मनुष्य मानवी सल्लामसलतीवर अवलंबून राहतो किंवा प्रभुवर विश्वास ठेवण्याऐवजी स्वतःवरच विश्वास ठेवतो त्याला देवाच्या आशीर्वादांचा अनुभव येत नाही. जसे पाणी नेहमी खाली वाहत जाते. तसेच पवित्र आत्मा ज्याला येशूने जीवनी पाणी म्हटले, तो गर्विष्ठ व ताठ मानेने वर जगणाऱ्यांकडे कधीच येत नाही” (हबक्कूक २:४-५).

जो मनुष्य नम्र अंतःकरणाने ख्रिस्ताच्या सामर्थ्याची आस धरतो त्याच्या हृदयात मात्र पवित्र आत्मा भरून वाहतो.

“मग सणाच्या शेवटल्या म्हणजे महत्वाच्या दिवशी येशू उभा राहून मोठ्याने म्हणाला कोणी तान्हेला असल्यास त्याने माझ्याकडे यावे व प्यावे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याच्यातून शास्त्रात सांगितल्याप्रमाणे जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील” (योहान ७:३७-३८).

प्रतिदिवशी तुम्ही ख्रिस्ताच्या चरणाशी लीन होऊन ते जीवनी पाणी प्याले पाहिजे. मग तुम्हाला तुमची विद्वता अथवा शिक्षण यांच्या सहाय्याने जीवन समजण्याची गरज नसते. उलट देवाच्या पवित्र आत्म्याच्याद्वारे तुमच्या जीवनाचे तुम्हाला सुंदर दर्शन घडेल.

नवा जन्म झालेल्या देवाच्या प्रत्येक लेकराने, पवित्र आत्म्याने येशू ख्रिस्ताला परिधान केले पाहिजे. आजच्या दुष्ट जगात प्रत्येक विश्वासणारा येशू ख्रिस्ताचा प्रतिनिधी आहे. अशा ख्रिस्ती लोकांद्वारे पवित्र आत्मा, इतर लोकांना जीवन योग्यप्रकारे जगण्यास सहाय्य करतो.

“आपण तर जिवंत देवाचे मंदिर आहोत. देवाने असे म्हटले आहे की मी त्यांच्यामध्ये वास करून राहीन, मी त्यांचा देव होईन व ते माझे लोक होतील” (२ करिंथ ६:१६).

होय, आपण देवाचे पवित्र मंदिर आहोत आणि आपल्याद्वारे त्याला जगाला त्याच्या गौरवी पावित्र्याचे दर्शन घडवावयाचे आहे.

ही महत्वाची गोष्ट ध्यानात धरून पौल पुढे बोध करतो, “तेव्हा प्रियजनहो, आपणास ही अभिवचने मिळाली आहेत म्हणून देहाच्या

व आत्म्याच्या सर्व अशुद्धतेपासून स्वतःला शुद्ध करू आणि देवाचे भय बाळगून पावित्र्याला पूर्णता आणू'' (२ करिंथ ७:१).

## उपासनेतील खरेपणा

पियानोला योग्य सूर देण्यासाठी तो दुरुस्त करणारा कारागीर ध्वनीचिमटा वापरतो. त्या चिमट्याची ध्वनीकंपने जुळवून बिघडलेला पियानो दुरुस्त केला जातो.

त्याप्रमाणे पवित्र शास्त्राद्वारे मनुष्याचे ग्लान हृदय देव आनंदित करतो व स्वर्गीय आनंद व संगीत त्याच्या जीवनात फुलवतो. देवाच्या वचनाद्वारे जीवनात नवे गौरव, पावित्र्य आणि देवाची प्रीति नव्याने फुलू लागते व तुमची उपासना व स्तुती अर्थपूर्ण होते.

''स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक प्रबंध ही एकमेकांना म्हणून दाखवा, आपल्या अंतःकरणात प्रभुला गायनवादन करा'' (इफिस ५:१९).

तुम्ही प्रभुबरोबर एकत्र समयात येता, तेव्हा या वचनाविषयी विचारा :
या वचनात देव जो पिता, याबद्दल नवा विचार आहे कां?
देव जो पुत्र, याबद्दल नवा विचार आहे कां?
देव जो पवित्र आत्मा, याबद्दल नवा विचार आहे कां?

आज देवाच्या लोकांमध्ये त्याची उपासना खरेपणाने करण्याची नवी तळमळ दिसून येत आहे ही फार उत्तेजनात्मक गोष्ट आहे. अशा उपासनेचे कौतुक येशू ख्रिस्तानेही केले. तो म्हणाला, ''देव

आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे'' (योहान ४:२४). खरेतर, खरी उपासना ही पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने होते आणि देवाच्या वचनाचे सत्य उपासना खरी करते. अशा उपासनेमुळेच पित्याला संताष होतो.

पवित्र आत्मा देवाच्या विशेष गुणांकडे म्हणजे त्याची प्रीति, सामर्थ्य, पावित्र्य, वैभव, कृपा, चांगुलपणा यांकडे जेव्हा आपले लक्ष वेधतो तेव्हा आपल्या हृदयात नवे गीत उमलेल व आपण प्रभुची उपासना अगदी मनापासून करू लागतो. अशावेळी जर आपण गुडघे टेकले तर आपल्या मनाची योग्य वृत्तीही तयार होते. परंतु आपल्या जीवनात असे काही प्रसंग येतात की जेव्हा गुडघे टेकणे ही क्रियादेखील फारच तोडकी वाटते.

जेव्हा योहान ख्रिस्ताच्या गौरवी उपस्थितीत आला तेव्हा पात्म बेटावर त्याने केवळ गुडघेच टेकले नाही तर तो ख्रिस्तासमोर उपडा पडला, ''मी त्याला पाहिले तेव्हा मी मेल्यासारखा त्याच्या पायाजवळ पडलो'' (प्रकटी १:१७).

विश्वासणाऱ्यांसाठी जेव्हा काही तरी फार मोलवान असते तेव्हा त्याच्या आसपास काहीतरी नकली वावरत असते. प्रभु येशूने आपल्याला खऱ्या उपासनेसंबंधी सूचना दिल्या आहेत तरी ज्याला काही लोक उपासना समजतात त्यांना कडक इशारा त्याने दिला आहे. अशी उपासना ही नकली स्वरुपाची असते. शोमरोनी स्त्रीला त्याने उपासना ही आत्म्याने व खरेपणाने करण्यास सांगितले. त्याने म्हटले, ''तुम्हाला ठाऊक नाही अशाची उपासना तुम्ही करता'' (योहान ४:२२).

भावनेपेक्षा उपासना श्रेष्ठ असते. प्रभु येशू ख्रिस्तच उपासनेचा केंद्रबिंदू असावयास हवा. जर उपासनेमुळे लोक ख्रिस्ताकडे वळत असतील तर ती खरी उपासना होय आणि जर ते उपासनेभावेतीच घुटमळत असतील तर ती मिथ्या उपासना होय. देवाच्या स्तुतीने आपली अंतःकरणे भरून वाहण्याची गरज आहे केवळ आत्मिक उद्दिपन नसावे.

खरी उपासना म्हणजे पूर्ण मनाने व पूर्ण अंत:करणाने देवाच्या पवित्र वचनातून प्रगट केलेल्या आपल्या सार्वभौम जिवंत प्रभु येशू ख्रिस्तावर नम्रपणे आपले ध्यान केंद्रित करणे होय. जेव्हा असे होते तेव्हा आपण उन्मळून पडतो व त्याला शरण जाऊन त्याची स्तुती करतो.

## विरोधकापासून सावधान

देव तुमचा एकत्रित समय आशीर्वादित करीत आहे. तुमची विवेकबुध्दी आता जागृत आहे. येशू खिस्ताने वधस्तंभावर तुमच्यासाठी जे केले त्याची जाणीव ठेवून तुम्ही तुमच्या स्वत्वावर पाणी सोडले, तुमची लोकप्रियता, तुमची महत्वाकांक्षा आणि तुमची मालमत्ता ही सारी सोडली आहे. आता नव्या परिमाणाने तुम्ही देवाची उपासना व उपकार स्तुती करीत आहात. देवाबरोबर असलेल्या तुमच्या सहभागितेच्या शिखरावर तुम्ही आहात काय? कदाचित नसालही!

तुमच्या आसपास तो शत्रू वावरत आहे. तो अतिशय संतापला आहे. कारण देवाने तुमच्या पातकांच्या क्षमेचा मार्ग सिद्ध केला आहे.

परंतु सैतानासाठी मात्र अग्नीचे सरोवर राखून ठेवले आहे. त्यामध्ये कधीच बदल होणार नाही. त्यामुळे तुमच्या स्वर्गाच्या वाटेवर तुम्ही चालता तेव्हा तो सर्व प्रकारे अडथळे निर्माण करतो. प्रभु येशू पासून तुमची नजर तो सतत दुसरीकडे वळवून तुमच्या नाशासाठी टपलेला आहे.

> तुमच्या देवाबरोबरच्या एकत्रित समयामध्ये तुम्ही या वचनासंबंधी विचारा :
>
> या वचनात सैतानाची नवी माहिती मिळत आहे का?
>
> सैतानाच्या दुष्ट हेतूसंबंधी नवी माहिती मिळते का?
>
> सैतानाच्या कुयुक्तीसंबंधी नवी माहिती मिळते का?

संडेस्कूल संपवून एक मुलगा त्याच्या घरी निघाला होता. त्या रात्री तो आपल्या बिछान्या शेजारी गुडघे टेकून प्रार्थना करीत आहे हे त्याच्या आईने पाहिले. आईने त्यास विचारले, ''तू हे काय करीत आहेस?'' तो म्हणाला, ''मी सैतानाला घाबरे करून टाकत आहे. आजच आम्ही संडेस्कूलमध्ये एक गाणे म्हटले. जेव्हा आपण गुडघे टेकून प्रार्थना करतो तेव्हा सैतान घाबरतो. म्हणून सैतानाला घाबरून टाकण्यासाठी मी गुडघे टेकून प्रार्थना करीत आहे!''

परंतु केवळ गुडघे टेकल्यामुळे सैतान घाबरतो हे दुर्दैवाने तितके खरे नाही! परंतु येशूच्या नावाने जेव्हा तुमच्या हृदयात सैतानाला जागा नसते व पवित्र आत्म्याच्या सहाय्याने येशूच्या नावात जेव्हा सैतानाच्या कचाड्यातून अनेक जीव वाचले जातात तेव्हा तो घाबरतो.

काही ख्रिस्ती लोकांचा असा समज आहे की सैतानाच्या वाटेला

आपण गेलो नाही तर तो आपल्या वाटेला येत नाही. परंतु तो त्यांचा गैरसमज आहे. जेव्हा प्रार्थना करतांना तुम्ही देवासमीप येता तेव्हा मागील काही अपयशाबद्दल तुमच्या मनात विचार येतो. त्याबद्दल तुम्ही कबुलात देऊन पश्चाताप केलेला असतो. तरी त्या चुकीची खंत तुम्हाला वाटत असते नां? त्या चुकीबद्दल सैतान तुम्हाला सतत टोचत असतो. तुम्ही क्रूसाजवळ तुमच्या पापाची क्षमा मागितलेली असते; तरी सैतान तुम्हावर दोष लादतच असतो. जेव्हा सैतान तुम्हाला तुमच्या भूतकाळासंबंधी छळतो तेव्हा तुम्ही त्याला त्याच्या भविष्यकाळाची आठवण करून द्या. देवाने तुमच्या पातकाची क्षमा केली असली तरी सैतान तुमची दृष्टी त्या पापावरच खिळून टाकत असतो. त्यामुळे तो तुमच्या मनात देवाच्या प्रेमळ पापक्षमेबद्दल शंका उत्पन्न करीत असतो.

चुकीचे निर्णय, भय, संभ्रम आणि निराशा ही लक्षणे दर्शवितात की सैतान तुमच्या जीवनात लुडबुड करीत आहे.

होय, तुमची शांती आणि आनंद हिरावण्याचा सैतान सतत प्रयत्न करीत असतो. परंतु तुम्ही पवित्र शास्त्र वाचता तेव्हा देव तुम्हाला दाखवून देत असतो की सैतानाने तुमच्या जीवनात कशी जागा व्यापली आहे. मग प्रभुने जी शास्त्रसामुग्री आपल्याला दिली आहे तिचा वापर करून सैतानाचा शिरकाव होईल अशी सर्व दारे आपण बंद केली पाहिजेत!

मानवी व्यवहारात कधी चढाईचे तर कधी नरमाईचे धोरण ठेवावे लागते. केवळ चढाई करूनच प्रत्येक लढाई जिंकता येत नाही. आत्मिक युद्धातसुद्धा कधी चढाई तर कधी नरमाईचे धोरण ठेवावे लागते. या दोहोंसाठी मात्र देवाच्या वचनाच्या शास्त्रसामुग्रीचा वापर

करावा लागतो. आपल्या देवसहवासात एकत्र येण्याचे एक फलित म्हणजे सैतानाशी मुकाबला करतांना तुम्हाला देवाच्या वचनाचा योग्य संदर्भ योग्य वेळी देता येतो आणि वचनानुसार प्रार्थना करता येते.

देवाच्या वचनानुसार प्रार्थना करणे म्हणजे त्याच्या इच्छेनुसार प्रार्थना करणे हे किती छान आहे! देवाची तर अशी इच्छा असते कीं तुम्ही सैतानावर विजय मिळवावा आणि तुमचे आध्यात्मिक जीवन त्याच्यामुळे भरकटू नये.

**आत्मिक युद्धात प्रतिकार** : अरण्यात सैतानाने येशूची परीक्षा पाहिली हे तुम्हाला आठवते ना? त्यावेळी येशू अनुवादाचे पुस्तक एकत्रित समयात वाचत होता असा विचार करणे मला आवडते. सैतानाला प्रतिकार करतांना येशूने याच पुस्तकातील वचनांचा उपयोग केला. आपल्या प्रभुने तीन वेळा शास्त्रवचने वापरली.... 'असे लिहिले आहे.... असे लिहिले आहे..... असे लिहिले आहे' (मत्तय ४:४,७,१०). येशूच्या या परीक्षेतून आपल्याला स्तोत्रकर्ता काय म्हणतो त्याची समज येते....''तू आपल्या संपूर्ण नावाहून आपल्या वचनाची थोरवी वाढविली आहे'' (स्तोत्र १३८:२). या प्रचंड ताकदीच्या वचनाच्या शस्त्राने येशूने सैतानाला दूर पळवून लावले!

असाच तुम्हाला सैतानावर जय मिळवायचा असेल तर शास्त्रवचनाचा उपयोग प्रतिकारासाठी कसा करावा हे तुम्ही शिकले पाहिजे. जेव्हा सैतान तुमच्या मनात चुकीचे विचार घालतो तेव्हा तुम्ही शास्त्रवचन काय सांगते याचा आढावा घेतला पाहिजे. जेव्हा तुम्ही देवासमवेत सतत एकत्रित येता तेव्हा अशा प्रसंगासाठी देवाचे वचन तुमच्या हृदयात असते.

'सैतानाची युक्ती' या अनामिक कवीच्या कवीतेत, इफिसकरांच्या पत्रामधील ६ व्या अध्यायातील सत्य सामावलेले आहे -

## सैतानाची युक्ती

आज मला तुंबळ युद्ध करावे लागले
युद्धभूमी होती माझे प्रार्थनेचे ठिकाण.
देवाशी बोलण्यास मी त्याच्या समीप आलो,
पण तेथे मला भेटला तो सैतान.
तो कानात म्हणाला, "तू प्रार्थना करू शकत नाही,
तुझा अंत तर पूर्वीच झालाय.
गुडघ्यावर येऊन शब्दच तू उच्चारशील,
पण तुला आता प्रार्थना करताच येत नाही."
मी माझे शिरस्त्राण ओढले खाली,
झाकून घेतले माझे दोन्ही कान.
त्यामुळे त्याचे शब्द गोठूनच गेले,
माझी भीति क्षणार्धात लोप पावली,
माझ्या इतर शस्त्रांचा मी वेध घेतला,
शांतीच्या पादुका होत्या माझ्या पायी,
सत्याने माझी कंबर होती कसलेली,
देवाचे वचन होती माझी तलवार.
धार्मिकतेचे चिलखत होती छातीवर,
हृदयतील प्रीति माझी संरक्षक.
विश्वासाची ढाल होती मजबूत,

त्याचे जळते बाण गेले सारे माघारी.
येशूच्या नावे, देवाशी मी बोललो,
त्याच्या रक्ताचा मी केला धावा,
सैतान शरमला, दूर पळून गेला,
देव मला भेटला, मी केली मग प्रार्थना!

**आत्मिक युद्धातील चढाई** : केवळ प्रतिकार करून भागत नाही तर संपूर्ण विजयासाठी अनेकदा चढाईचे धोरण स्वीकारावे लागते! आपल्या भोवतीचे जग क्लेशदायक आहे. ज्या मोलवान लाखो लोकांसाठी येशूने आपला प्राण दिला त्यांचे घर म्हणजे हे जग. अनेक स्त्री पुरुष क्लेशाने त्रस्त आहेत. अनेकांना सैतानी बंधनाने आंधळे करून जखडले आहे. सैतानाला माहीत आहे की आता त्यांच्याकडे अगदी थोडा वेळ शिल्लक आहे. म्हणूनच तो देवाच्या लोकांना छिनावून अनंतकाळच्या अंधकारात टाकण्यासाठी सरसावत आहे.

आपण वाचतो की देवाने सैतानासाठी आणि त्याच्या हस्तकांसाठी ‘अग्नीचे सरोवर’ तयार केले आहे; परंतु आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ते अग्नीचे सरोवर देवाने मनुष्यांसाठी तयार केले नाही. नव्हेच कधीच नाही! हरवलेल्या लाखो-करोडो लोकांसाठीच ख्रिस्त मरण पावला. सैतान जे काही पवित्र आणि चांगले आहे त्याचा राग व द्वेष करतो. म्हणूनच त्याला अनेक आत्मे सार्वकालिक दुःख भोगण्यासाठी ओरबाडावयाचे आहेत. या युद्धामध्ये हरवलेल्या आत्म्याचा शोध येशू करीत आहे व त्यांना त्याला तारावयाचे आहे (लूक १९:१०). हे कार्य त्याला प्राप्त झालेल्या ख्रिस्ती लोकांच्याद्वारेच करावयाचे.

कधी कधी बुद्धिमान लोकांना शास्त्रवचनांचा अर्थ समजत नाही याचे तुम्हाला आश्चर्य वाटले ना? पवित्रशास्त्रात हे स्पष्ट केले आहे की असा विभ्रम लोकांच्या मनात कोण उत्पन्न करतो आणि काही अविश्वासणाऱ्यांनी विश्वासणारे बनणे हे एवढे अवघड का असते?

"परंतु आमची सुवार्ता अच्छादलेली असल्यास ज्यांचा नाश होत आहे त्यांच्या ठायी ती आच्छादिलेली आहे. त्यांची म्हणजे विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने ह्या युगाच्या दैवताने आंधळी केली आहेत, अशा हेतूने की देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या तेजाच्या सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये" (२ करिंथ ४:३-४).

अविश्वासणाऱ्याच्या मनामध्ये देवाच्या प्रितीचा आणि सत्याचा प्रकाश प्रवेश करण्यास कोण विरोध करतो? अर्थात सैतान! आपल्या बंधु-भगिनींचे तारण व्हावे म्हणून जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा ही गोष्ट तुम्ही लक्षात घेता कां? आपण प्रार्थना करतो तेव्हा ज्याच्या मनाचे अद्याप परिवर्तन झाले नाही व सैतानामुळे ते संभ्रमीत झाले अशांकरिता येशूच्या सामर्थ्यशाली नावात प्रार्थना केली पाहिजे. ते नाव अत्यंत अलौकिक, सामर्थ्यवान आणि विजयी नाव आहे. चार्लस वेस्ली त्या नावाबद्दल लिहितात.

येशू! सर्व नामाहून अत्युच्च नाम,
मग स्वर्ग असो, नरक असो वा पृथ्वी,
देवदूत आणि मनुष्ये जमतात त्या नामाला,
भूते भितात अन् पळतात त्या नामाने.

कालवरीच्या क्रूसावर, सैतान आणि त्याच्या सर्व हस्तकांवर

ख्रिस्ताने कायमचा विजय मिळविला आहे. ''पाप करणारा सैतानाचा आहे; कारण सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे. सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रगट झाला'' (१ योहान ३:८). हालेलुया! आपण हारलेले असे युद्ध आता करीत नाही, मुळीच नाही! जो विजय कधीही नाहीसा होत नाही तो आपला आहे. तो आपल्याला दोन हजार वर्षापूर्वी मिळाला आहे.

बुद्धिबळाच्या खेळात तुमची खेळी ही परत न करता येण्यासारखी असते तशी खेळी करून तुम्ही तुमच्या प्रतिस्पर्ध्याला विजयापासून रोखू शकता. परंतु तो जर फार चिवट असेल तर त्याला विजयाची खातरी नसतांना देखील तो वेळकाढूपणा करील व शेवटी हरेल.

सैतानाबाबत असेच असते. त्याला युद्ध जिंकण्याची मुळीच खात्री नाही. तरीही देव त्याचा विनाश करील या भीतीपोटी तो ती वेळ लांबणीवर टाकण्याच्या प्रयत्नात असतो. सैतानाला साखळदंडानी जेर करण्यात येणार आहे. तो केवळ पराभूत शत्रू नाही तर तो हातात सापडलेला शत्रू आहे. पवित्र शास्त्र म्हणते, ''आपल्यावर सैतानाचे वर्चस्व होऊ नये, त्याचे विचार आपल्याला कळत नाहीत असे नाही'' (२ करिंथ २:११). आपल्या शत्रूची व्यूहरचना कशी आहे हे आपल्याला समजले म्हणजे आपला विजय सहज होतो.

ज्या संतानी सैतानावर विजय मिळविला त्यांच्यासंबंधी प्रेषित योहान म्हणतो, ''त्याला (सैतानाला) त्यांनी कोकऱ्याच्या रक्तामुळे व आपल्या वचनाच्या साक्षीमुळे जिंकले आणि त्यांच्यावर मरावयाची पाळी आली तरी त्यांनी आपल्या जिवावर प्रीति केली नाही'' (प्रकटी १२:११). आपण आपल्या जीवावर मरावयाची पाळी आली तरी प्रीति

करू नये कारण ‘‘आपला जुना मनुष्य त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळला गेला’’ (रोम ६:६).

रक्ताद्वारे शुद्धिकरण, ओठांनी केलेली पापकबूली आणि ख्रिस्ताबरोबर आपले वधस्तंभाला खिळणे यामुळेच आपला नरकावर येशूमुळे विजय होतो. हालेलुया!

प्रभु येशूने आपल्याला परिपक्व होण्यासाठी सर्व काही पुरविले. त्याच्या मुळेच आपण विजयी ठरत असतो म्हणून तुम्ही व मी मिळून आनंद करु या. परंतु जर आपण आत्मिकदृष्ट्या बालवाडीतच राहण्याचा हट्ट केला तर देव आपल्याला परिपक्व होण्यासाठी कधीच बळजबरी करीत नाही याबद्दल आपण दक्ष राहिले पाहिजे. आपण या जगात असतांना आपली आत्मिक परिपक्वता कालसाक्षेप असते. आपल्याला येथे लाभलेल्या आत्मिक परिक्वतेवर आपण स्वर्गामध्ये ख्रिस्ताशी घनिष्ट सहभागिता मिळवू शकतो.

## आत्मिक तपासणी

१. मी झोपी जाण्यापूर्वी कसला विचार करतो?

२. पवित्र शास्त्र वाचतांना मी देवाची वाणी ऐकण्याची अपेक्षा करतो का?

३. पवित्र शास्त्र वाचतांना देव म्हणतो तसे करण्याची माझी तयारी असते कां?

४. माझे जीवन हे ‘मी’ वर अवलंबून आहे किंवा ख्रिस्तावर? (गलती २:२०)

५. मी स्वावलंबी आहे काय? आहे तर माझ्यामधील गर्व घालवून मी देवावर अवलंबून राहतो काय?

६. देवाचे गौरव करून त्याला गौरव देणे हे मी माझे आद्यकर्तव्य समजतो का?

७. सैतानाने माझ्या जीवनात घर केले आहे काय?

८. ख्रिस्ताचा सैतानावरील विजय हा माझा वैयक्तिक विजयही आहे असे मला वाटते का?

माझ्या विश्वासाला मिळाले विश्रांतीस्थळ
कुठल्या मतांगिकारात ते नाही की सुविधेत,
सदाजिवी देवावर आहे माझा विश्वास
त्याच्या जखमाच बोलतात माझ्या वतीने

वचनावर आहे हृदय स्थिरावलेले
देवाने स्वतः दिलेले ते वचन
तारणाऱ्याच्या नावे मिळते तारण
रक्ताने त्याच्या सिद्ध केले उद्धरण

मला आता नको कसला वाद
युक्ति-प्रयुक्तीची नाही गरज
येशूचे तारण हेच आहे मज पुरे
माझ्यासाठी त्याने प्राण अर्पिला

लिनडी एडमंड्स

*प्रकरण ९*

# विश्वासाचा मुद्दा

अशी कल्पना करा की एका मनुष्याला त्याच्या मित्राला भेटावयास जावयाचे आहे; पण मध्ये नदी दुथडी भरून वाहात आहे आणि त्याला ती पार करून पलीकडच्या तिरावर राहत असलेल्या त्या मित्राकडे जावयाचे आहे. त्याच्याजवळ नाव नाही; मात्र पतंग आणि दोर आहे. तो पण तुकडे जोडून केलेला आहे आणि त्यांचा अखेर एक मजबूत दोरच तयार झाला आहे. अगदी पातळ दोऱ्या वापरून तो पतंग हवेत उडवत आहे आणि नदीच्या पलीकडे असलेल्या मित्राच्या हाती तो पतंग येतो. मग त्या पतंगाच्या पातळ दोरीला तो जाड दोरी बांधतो. हळू हळू पतंगाच्या सहाय्याने तो मजबूत दोर तो नदीपार सोडतो. मग तो मजबूत दोर दोन्ही तिरावर झाडाला पक्का बांधतो. मग त्या दोराच्या सहाय्याने नदी पार करून तो सुरक्षितपणे आपल्या मित्राकडे जातो.

तुमच्या पापाच्या बदल्यात तुम्हाऐवजी देवाने स्वपुत्राला मरण

दिले यावर तुम्ही नवा जन्म पावलेले ख्रिस्ती म्हणून विश्वास ठेवता. परंतु पवित्र शास्त्र वाचत असतांना तुमचा विश्वास पतंगाच्या त्या पातळ दोरीसारखा प्रथम असतो. परंतु तो कमजोर दोरही नदीपार करून तो पतंग पलीकडच्या तीरापर्यंत नेऊ शकतो! ''विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारे होते'' (रोम १०:१७). तुम्ही देवाचे वचन वाचत जाता आणि त्याने दिलेल्या अभिवचनांची आस धरता तेव्हा तुमचा विश्वास बळकट होत जातो. देवाचा असा हेतू आहे की त्याच्या लेकरांनी विश्वासात खंबीर असावे. त्यासाठी निकट सहवासाची गरज आहे. देव व त्याचे लेकरू यांच्यामध्ये निकट संबंध हवेत.

यहूदाने त्याच्या पत्रात म्हटले की विश्वासाच्या तारणदायी पायावरच आपण आपले जीवन रचले पाहिजे. 'प्रियजनहो, तुम्ही तर आपल्या परमपवित्र विश्वासावर स्वतःची रचना करा'' (यहूदा २०).

ॲम्प्लीफाईड बायबलच्या आवृत्तीत ही संकल्पना अशी मांडली आहे -

प्रियजनहो तुम्ही स्वतःची रचना अत्यंत पवित्र अशा विश्वासाच्या पायावर करा. (म्हणजे तुमची वाढ अधिक उंच व्हावी), पवित्र आत्म्याने प्रार्थना करा. देवाच्या प्रीतीमध्ये स्वतःला सुरक्षित ठेवा. येशू ख्रिस्ताच्या दयेवर निष्ठा ठेवून धीराने वाट पाहा. तो तुम्हाला सार्वकालिक जीवनात नेईल. जे कुरकूर करतात, शंका बाळगतात त्यांच्यावर दया करा. इतरांच्या तारणासाठी प्रयत्न करा. त्यांना अग्नीपासून सोडवा, इतरांवर भीत भीत करुणा करा. त्यांची वस्त्रे डागाळलेली असतील आणि त्यांना देहाच्या कर्मांनी दुषित केले असेल' (यहूदा २०-२३).

या वचनावर असा भर दिलेला आहे की विश्वासाच्या भक्कम पायावर आपण आपल्या आत्मिक जीवनाची उभारणी केली पाहिजे. (आपला विश्वास अधिक परिपक्व व्हावा). त्यामुळे आपले प्रार्थनामय जीवन उंचवावे, आपली आशा जिवंत असावी, आत्मे जिंकण्यासाठी आपण तत्पर असावे.

विश्वासाच्याद्वारे तुम्हाला तारण ही देणगी मोफत मिळाली आहे. विश्वासानेच तुम्ही पुनरुत्थित ख्रिस्ताचा स्वीकार करता तेव्हा तुम्हामध्ये वसणारा ख्रिस्तच सर्व गोष्टीचे नियंत्रण करतो. होय ‘‘नीतिमान विश्वासाने जगेल’’ (रोम १:१७, गलती ३:११, इब्री १०:३८). तुम्ही स्वर्गात असा किंवा अद्याप पृथ्वीवर असा, तुम्ही केवळ विश्वासाने जगले पाहिजे. देवावर विसंबून राहिले पाहिजे. तुमच्या द्वारे त्याचे कार्य तुम्ही केले पाहिजे. तुम्ही जरी स्वर्गात गेला तरी देवाच्या प्रीतीमुळे तुम्ही आनंदाने व कृतज्ञपणे देवाबरोबर त्याच्या अनंत कृपेचा आनंद उपभोगत राहाल. तुमची उद्धारलेली मने त्या आनंदाची कल्पना करूच शकत नाहीत.

तुम्ही पृथ्वीवर असला तर तुमच्या दृढ विश्वासाने तुम्ही प्रभु येशूवर अवलंबून राहून त्याला तुमच्याद्वारे कार्य करू दिले पाहिजे. ते कार्य तुमच्याच प्रयत्नाने पूर्ण होत नसते? देवाची लेकरे म्हणून आम्हा प्रत्येकाने विश्वासात वाढलेच पाहिजे याचे अगत्य आहे. जीवनदात्या व जीवन घडविणाऱ्या देवावर आपण विसंबून राहिले पाहिजे. तोच आम्हाला रोज रोज चालवित असतो.

अनेक वेळा आम्ही मानवी बुद्धीप्रमाणे वागतो. त्यामुळे अस्सल विश्वासाची जागा इतर अनेक गोष्टींना दिली जाते. कधी कधी आपण

विश्वासाच्या जागी आपली स्वार्थत्यागी सेवा आपला उत्साह यांना ठेवतो. तरी खरा विश्वास खिस्ती माणसाच्या कोणत्या तरी कार्यक्रमात अगदी निष्ठेने सहभागी झाले म्हणजेच दिसून येतो, किंवा पाळकांबरोबर एकनिष्ठ राहिल्यानेच दिसून येतो किंवा पवित्र शास्त्राचा खूप अभ्यास केल्यानेच दिसून येतो असे मुळीच नाही. अशा गोष्टी केल्याने विश्वास कधी कधी दिसून येईलही पण या गोष्टी स्वतःच केलेल्या असल्यामुळे घातकही ठरू शकतात. त्याऐवजी तुमचा वैयक्तिक विश्वास हाच खरा व सामर्थ्यदायी विश्वास असतो.

खरा विश्वास हा आपल्या पुनरुत्थित प्रभु येशूवर पूर्णपणे अवलंबून राहण्यात असतो. दुर्दैवाने अनेक ख्रिस्ती लोकांचा असा समज आहे की त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचे फसवे व्यक्तिमत्व, बॅंकेमध्ये असलेली त्यांची पुंजी यामुळे ते जीवनात यशस्वी होऊ शकतात. परंतु पवित्र शास्त्र स्पष्टपणे सांगते की जे नवा जन्म पावलेले आहेत त्यांनी आपल्या यशासाठी केवळ पवित्र आत्म्यावरच अवलंबून राहिले पाहिजे. देवावर विश्वास ठेवण्याचा जर आपण प्रयत्न केला नाही तर शास्त्रवचन आपल्याला स्पष्ट सांगते की त्याच्या सामर्थ्यदायी शक्तीशिवाय आपण जे काही मूर्खपणे करतो ते सर्व वाया जाते. आपण किती उत्साही आहोत यावर आपल्या ख्रिस्तीपणाचा प्रभाव अवलंबून नसतो. खरे तर आपला ज्वलंत विश्वासच आपल्या सर्व कृतीला पोषक ठरत असतो.

देवाच्या प्रितीशिवाय तुम्ही जीवनात जे काही मिळविता व स्वतःला सुरक्षित आहोत असे मानता – मग तो पैसा असेल, शिक्षण असेल, मित्रमंडळी असतील, तुमची नोकरी वा सत्ता असेल, तुमचे व्यक्तिमत्व असेल – तर तुम्ही विश्वासाद्वारे जगत नाही असेच दिसून येईल. तुमची खरी सुरक्षितता आणि महत्व हे देव आणि

उद्धारकर्ता यांवरच आधारित आहे. या जगातील प्रवासाला तुम्ही विश्वासावर जगत नसाल तर देवाच्या सतत लाभणाऱ्या असीम आनंदाला तुम्ही मुकाल. तुमच्याद्वारे त्याचे प्रीतीचे कार्य व सेवा तुम्हाला करता येणार नाही. कारण 'जे काही विश्वासाने नाही ते पाप आहे' (रोम १४:२३).

देवाच्या वचनावर आपले पोषण व्हावे ही जाण जी. कीथ यांना होती व त्यामुळे विश्वास वाढतो अशी त्यांची धारणा होती. त्यांनी लिहिले आहे :

किती भक्कम आहे हा पाया
अहो देवाच्या संतजनांनो,
तुमच्या विश्वासासाठी तो आहे
देवाच्या वचनांवर सुंदरसा उभा.

आत्मिक वृद्धीसाठी देवाची वाणी ऐकल्याशिवाय पायाच उभारू शकत नाही. आपण देवासमीप येऊन त्यांच्याबरोबर एकत्रित समय गुजरला म्हणजे त्या पायाला जणु काय सिमेंटने भक्कम केले जाते.

विश्वासामुळे देवाबरोबर असलेली जिवंत सहभागिता प्रबळ होते.

इंग्लंडमध्ये मी काही वर्षापूर्वी सुमारे शंभर पाळकांना संजीवन या विषयावर बोध केला होता. देव समर्थपणे आम्हामध्ये कार्य करीत होता. आमची हृदये भरून आली होती. मध्यस्थीची प्रार्थना करण्यासाठी एक पाळक उभे राहिले. अत्यंत तळमळीने व भग्न हृदयी होऊन त्यांनी प्रार्थना केली. ''हे देवा यापूर्वी जेव्हा मी या बंधुसमोर प्रार्थना केली त्यावेळी मी त्यांच्यासंबंधी आणि धर्मतत्वांसंबंधीच अधिक जागृत होतो,

तुझ्या पवित्र उपस्थितीबद्दल मात्र मी गाफील होतो हे मी दुःखाने कबूल करतो.''

आपले हृदय एवढे फसवे असते की जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा आपण आपल्या शब्दाआड लपत असतो. आपल्या स्वर्गीय पित्यासमोर आपण आपल्या हृदयातील गरजा प्रामाणिकपणे मांडण्यास आपण कमी पडतो. केवळ आपली प्रार्थना पाठ करून म्हणणे, किंवा ती उच्चारणे म्हणजे खरी प्रार्थना नाही. जेव्हा आपले हृदय स्वर्गीय पित्याबरोबर एकजीव होते व त्याच्या अनंत प्रकाशात ते पारदर्शी बनते तेव्हा आपला स्वर्गीय पिता संतुष्ट होतो व आपली त्याच्याबरोबर असलेली सहभागिता आशीर्वादित होते.

एखाद्या गरजू पातक्याने पवित्र देवाला संतोषवावे हा विचार थोडा धाडसाचा वाटेल. परंतु शास्त्रवचन सांगते की मनुष्याची निर्मिती देवाने त्याच उद्देशाने केली आहे, देवाला गौरव, मान, महिमा दिला जावा. आपल्याला आवडो वा न आवडो आमचे अस्तित्वच देवाला गौरव देण्यासाठी आहे!

''तुम्ही सर्व प्रकारे प्रभुला संतोषविण्याकरिता त्याला शोभेल असे वागावे'' (कलस्सै १:१०). संत पौलाची कलस्सैकरांच्या मंडळीकडून अशी प्रामाणिक इच्छा जाणून त्याप्रमाणे करणे. साधारण आपण असेच 'एखाद्याला संतोषविण्याचा' अर्थ करीत असतो. आपली इच्छा नव्हे तर दुसऱ्याची काय इच्छा आहे हे पाहून आपण त्याला संतोषवित असतो.

देवाला संतोषविण्याऐवजी जर आपण स्वतःलाच संतोषवित राहिलो तर आपल्या मार्गात आपण आपले अंगठे दगडावर ठेचून घेतो. भिंतीवर डोके आपटून घेतो आणि आपणच आपले अडथळे

निर्माण करून त्यात अडकून पडतो. परंतु जेव्हा विश्वासणारा ख्रिस्ती देवाच्या वैभवी पारदर्शी प्रकाशात येतो आणि त्याच्या बरोबर सहभागिता साधतो तेव्हा तो आनंद खरेच किती अवर्णनीय असतो!

'विश्वास' आणि 'देवाला संतोषविणे' हे निश्चित एकमेकांशी जोडलेले आहे हे पवित्र शास्त्र दाखवून देते. नकारात्मक संज्ञेने विश्वास आणि प्रभुला संतोषविणे हे अगदी समर्थपणे विषद होते आणि 'विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे' नंतर हेच वचन पुढे सकारात्मक आहे. त्यामुळे खऱ्या विश्वासणाऱ्याला उत्तेजन मिळते. देवाबरोबर असलेल्या सहभागितेमुळे फळ मिळते. ''देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास ठेवला पाहिजे की तो आहे आणि त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे'' (इब्री. ११:६).

जी व्यक्ती आपल्या तारणाऱ्याच्या घनिष्ट सहवासात राहते त्यांना देव अतिशय सुंदर व कल्पनातील असे आत्मिक प्रतिफळ देतो. त्या फळांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय त्यांची चव कळू शकत नाही. देवाबरोबर जिवंत सहभागिता साधण्याची व त्याला संतोषविण्याची आणि देवाच्या लेकरांना अवर्णनीय असा आनंद देणारी गुरुकिल्ली म्हणजे विश्वास.

होय, विश्वास हेच एक असे साधन आहे की ज्यामुळे पवित्र आत्मा देवाच्या लेकराला पुनरुत्थित ख्रिस्ताचे सामर्थ्य पुरवित असतो.

एखाद्या उपदेशकाचा उपदेश ऐकून किंवा देवाचे वचन वाचून आपल्याला देवाच्या अभिवचनाची जाणीव होते; तरीही दुर्दैवाने त्याचा आपल्याला आत्मिक लाभ घडत नाही असे दुःखाने म्हणावे लागते. ''परंतु ऐकलेले वचन त्यांना लाभदायक झाले नाही कारण त्यांचा ऐकणाऱ्यांमध्ये विश्वासाबरोबर संयोग झाला नाही'' (इब्री ४:२).

जेव्हा देवाचे वचन मस्तकाकडून हृदयात घुसते व त्यामध्ये विश्वास मिसळतो तेव्हाच देवाचे वचन वाचणे लाभदायक ठरते. त्याचक्षणी पवित्र आत्मा, प्रभु येशूची कृपा आपल्या जीवनात ओततो. त्यामुळे प्रभु येशूची सेवा करण्याची प्रत्येक सधी आपण साधतो. जीवनातील प्रत्येक समस्येला तोंड देण्यासाठी त्याचे समार्थ्य कसे कार्य करते हे आपण दाखवून देऊ शकतो.

प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या जीवनात कठीण प्रसंग व मोहाचे क्षण येतात हे सत्य आहे. प्रभुसंगती असलेली आपली सहभागिता मोडण्यासाठी सैतान 'जगाचा' म्हणजे त्यातील मोहमय गोष्टींचा उपयोग करीत असतो. देवाचे लेकरू सतत देवाच्या सहभागितेमध्ये रममाण झालेले असते. हे सैतानाला अजिबात रूचत नाही. म्हणून नवा जन्म पावलेल्यांचा देवाशी संबंध सोडण्यासाठी सैतान काहीही करू शकतो. एकत्रित समयात जेव्हा विश्वासाची बांधणी होते तेव्हा ते पाहून सैतान सगळेच उध्वस्त करण्यासाठी टपलेला असतो.

आत्मिकदृष्ट्या बालसदृश असणाऱ्यांना जगिक गोष्टीच सत्य आहेत असे वाटत असते. परंतु ते उलट असते. आत्मिक गोष्टी ह्याच सत्य असतात. ''कारण जगात जे सर्व आहे ते म्हणजे देहाची वासना, डोळ्याची वासना व संसारविषयीची फुशारकी ही पित्यापासून नाहीत तर जगापासून आहेत'' (१ योहान २:१६). लोकांना फसविणे हे इतके सोपे आहे म्हणूनच सैतान लोकांना मार्गभ्रष्ट करण्यासाठी जळते बाण त्यांच्यावर सोडत असतो.

पवित्रशास्त्र आपल्याला सांगते की देहाची वासना आपल्याला मोहात पाडते. डोळ्याची वासना आणि गर्विष्ठपणा किंवा फुशारकी यामुळे आपण पापास प्रवृत्त होतो. देवाची आमच्यासाठी जी चांगली योजना आहे त्यामध्ये सैतान नेहमी लुडबूड करीत असतो. देवाबरोबर

आपण कधी एकत्र येऊ नये यासाठी सैतानाची सतत धडपड चालू असते. या दुष्टाला माहीत आहे की जेव्हा आपण देवाच्या निकट सहवासात येतो तेव्हा आपण आत्मिक दृष्ट्या वाढत जातो आणि त्यामुळे देवाला संतोष होतो.

**देहाची वासना** : आजच्या अनैतिक जगात देहाची वासना फोफावत आहे. लैंगिक प्रदुषणाने जग भरले आहे. त्यामुळे सैतान देहाची वासना पूर्ण करण्यासाठी लोकांना चेतवित आहे. जे लोक असे वासनामय जीवन जगतात त्यांच्या जीवनात सैतानाने सहज प्रवेश केलेला असतो. त्यांचे शरीर आणि संपत्ती सैतानाच्या हाती आलेली असते. सैतानाच्या दुष्टतेमुळे ज्या लोकांची फसवणूक झालेली असते त्यांना नंतर कळून चुकते की पापाचा क्षणिक बुडबुडा फुटला आहे आणि मग त्यांच्या जीवनात पोकळी निर्माण होते व ती शेवटी शरमेने भरून जाते!

**डोळ्याची वासना** : आजच्या जगातील जाहीरातबाजीने आपणास आकर्षित करून आणि दुसऱ्यांकडे असलेल्या गोष्टींचा हेवा करून सैतान आपल्यावर कुरघोडी करतो. तो दुष्ट फसवणारा आपल्या कानात कुजबुजतो, ''जर तुझ्याकडे एक सुंदर घड्याळ असले, एक एकर जमीन असली, चांगले मोठे घर असले म्हणजे तूं सुखी होशील'' परंतु ''मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर देवाच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल'' (मत्तय ४:४). यामुळे आपल्याला समजून चुकेल की आम्ही आमच्या सनकीमुळे जे मिळविले त्यातून आम्हाला कायमस्वरुपी समाधान कधीच मिळत नाही.

**संसाराची फुशारकी** : आमच्या ताठ्यामुळे, गर्विष्ठपणामुळे आणि चुकीच्या आत्मनिर्भरतेच्या कल्पनेमुळे सैतानासाठी आम्ही आमच्या जीवनाचे दार सताड उघडे ठेवत असतो. कोणत्याही स्वरुपातील सर्वांचा देवाला भयंकर तिटकारा वाटतो!

आम्ही आमच्याच ताकदीने आमचे भविष्य घडवू शकतो असा आत्मविश्वास हा खऱ्या विश्वासाच्या विरुद्ध आहे. कारण विश्वास म्हणजे प्रभु येशूवर भरवंसा ठेवणे होय. आणि आपण अगोदरच पाहिले आहे की संसाराच्या फुशारकीवर एकच उत्तर आहे, ''देवासमोर स्वतःला लीन करा'' (याकोब ४:१०). सैतानासाठी दरवाजा बंद करण्यासाठी तुम्ही देवावर पूर्ण भरवंसा टाकला आहे याची तुम्ही खात्री दिली पाहिजे. तुम्ही देवावर विसंबता हा तुमचा विश्वास आहे. त्यामुळेच तुम्ही सैतानावर विजय मिळवू शकता. ''कारण जे काही देवापासून जन्मलेले आहे ते जगावर जय मिळविते आणि ज्याने जगावर जय मिळविला तो म्हणजे आपला विश्वास'' (१ योहान ५:४)

जगातील अनेक मोहावर मात करणाऱ्या विश्वासाच्या जोरावर जेव्हा तुम्ही पूर्ण विजयात प्रवेश करता तेव्हा येशूने त्याच्या शिष्यांना जो धडा शिकवला त्याची तुम्ही आठवण ठेवणे गरजेचे आहे. अस्सल विश्वासाकरिता एक अडखळण असते याबद्दल शिष्यांना ताकीद दिली आहे, ''जे तुम्ही एकमेकांकडून प्रशंसा करून घेता आणि जो एकच देव त्याच्याकडून प्रशंसा करून घेण्याची खटपट करीत नाही त्या तुम्हाला विश्वास ठेवता येणे कसे शक्य आहे?'' (योहान ५:४४). या शब्दांद्वारे येशूने शिष्यांना स्पष्टपणे दाखवून दिले आहे की तुम्ही

लोकांकडून मानपानाची अपेक्षा करीत राहिलात तर तेथे विश्वास कधीच राहात नाही. अशा प्रकारची लालसा बाहकणे ही अनेक ख्रिस्ती लोकांसंबंधीची समस्या आहे. अर्थात ख्रिस्ताला नाकारणाऱ्या समाजाला मान्यता देणे खऱ्या ख्रिस्ती शिष्यत्वाचे लक्षण नव्हेच.

तुम्ही जेव्हा तुमच्या एकत्रित समयाचा आनंद घेत असता तेव्हा तुमचा विश्वास वाढीस लागतो. मग तुमच्या जीवनातील परीक्षा प्रसंगी त्या बळकट विश्वासाचा उपयोग कसा करावा हे तुम्हाला समजते.

## आत्मिक तपासणी

१) माझ्या दैनंदिन कामात मी सक्रीय विश्वासाचा आनंद घेतो का?

२) प्रत्येक संधीमध्ये मला काही समस्या दिसते काय किंवा ख्रिस्तावर निर्भर राहण्याची संधी मी साधतो काय?

३) मी देवाच्या इच्छेप्रमाणे करतो का किंवा माझी इच्छा मी त्याच्यावर लादतो?

४) मी प्रभुवर सतत अवलंबून राहिल्यामुळे माझे जीवन भयमुक्त आहे काय?

*हे प्रभु मजशी बोल म्हणजे मीही*
*तुझाच आवाज प्रतिध्वनीत करीत बोलेन,*
*जसे तूं शोधलेस तसेच मला शोधू दे,*
*तुझी चुकलेली, हरवलेली लेकरे*

*प्रभु मला शिकव मग मीही शिकवीन*
*मूल्यवान गोष्टी तू नेहमीच देतोस*
*माझ्या शब्दांना पंख दे आणि पोहंचू दे*
*ते शब्द अंधकारात दडलेल्या हृदयात*

*तुझ्या पूर्णतेने प्रभु मला पूर्ण कर*
*भरुन वाहू दे माझे हृदय तुझ्याच*
*दिव्य विचारांनी अन् तेजाळ शब्दांनी*
*प्रीति तुझी वर्णू दे, स्तुती तुझी करू दे.*

*फ्रांसेस रिडले हॅवर्गल*

# सांगण्याचा समय

एका रात्री मी एका सभेमध्ये बोलल्यानंतर एक वडील माझ्याकडे आले व मी त्यांच्याकरिता प्रार्थना करावी असे ते मला म्हणाले. आम्हाबरोबर देवाचे सामर्थ्य अगदी वेगळ्या प्रकारे कार्यरत होते. त्या वडिलांनी मला सांगितले की त्यांच्या सहकार्यांना आणि मित्रांना सुवार्ता सांगण्यात काही अडचणी आहेत. लोकांना मदत करतांना जसे मी नेहमी, प्रभूला त्यांच्या अडचणीचा मला नीट पडताळा यावा म्हणून प्रार्थना करतो तशी मी शांतपणे प्रभुची प्रार्थना केली व त्या गृहस्थाच्या जीवनात नेमकी कशाची गरज आहे हे प्रभुला दाखवून देण्यास विनविले. माझ्या मनात तेव्हा विचार आला व मी म्हटले, ‘खरे तर ही समस्या खरी नसावी. मजबरोबर तुम्ही गुडघे टेका व प्रभुला विचारा की सुवार्ता सांगण्यामध्ये कोणती अडचण तुम्हाला वाटते.” लगचे त्या वडिलांनी गुडघे टेकून प्रार्थना केली.

तेव्हा मला असे जाणवले की आहे त्यापेक्षा काही तरी वेगळीच समस्या तेथे आहे आणि प्रभु ती उघड करील. भग्न हृदयाने माझा

तो मित्र देवाला सांगत होता की घरामध्ये तो किती निर्दयपणे वागत होता आणि त्याच्या मुलांवर कशी हुकुमशाही गाजवत होता. त्याने अगदी मनापासून पश्चात्ताप केला आणि देवाजवळ क्षमा मागितली.

त्या रात्री आम्ही त्याच्या सुवार्ता सांगण्यातील अडचणीसंबंधी काहीच चर्चा केली नाही, कारण येशूनेच त्या वडिलांना अगदी नव्या मार्गाने स्वतःस प्रगट केले होते. दुसऱ्या दिवशी रात्री ते गृहस्थ अगदी आनंदित चेहऱ्याने मजकडे आले आणि उत्साहाने मला म्हणाले, "आज दिवसभर इतरांना येशूबद्दल सांगण्यास गप्प बसणे मला शक्यच नव्हते!"

पवित्र शास्त्रात आपल्याला असे कधीच सांगितले नाही की तुम्ही ज्यांचे परिवर्तन अद्याप झाले नाही त्यांना तारणसंबंधीची योजना युक्तिबाज पद्धतीने सांगा. उलट आपल्याला असे सांगितले आहे की आम्ही सतत येशू बरोबर चालले पाहिजे. त्यामुळे आपण जेव्हा शुभवर्तमानाचा संदेश त्यांना सांगतो तेव्हा, प्रभुची प्रीति आम्हांमधून ओसंडून वाहू लागते आणि मग त्या लोकांना देवाच्या वचनामधील सत्य ऐकावेसे वाटते.

कधी कधी देवाबरोबर आमचा सूर नीट जमलेला नसतो, आमची सहभागिता नीट जुळलेली नसते त्यावेळी आपल्याला जाणवते की आपली साक्ष परिणामकारक व विश्वासार्ह अशी होत नाही. अशा समयी आपण देवाचे वचन लोकांना सांगण्यासाठी आपले ओठ मिटून टाकलेले असतात. आपल्या सभोवती ख्रिस्ताला न स्वीकारणाऱ्या लोकांना मग आपण ख्रिस्तासंबंधी काहीच सांगू शकत नाही.

जेव्हा तुम्हाला परिवर्तन न झालेल्या लोकांना येशू ख्रिस्तासंबंधी काही सांगावयाचे असेल तर त्यासाठी पहिली पायरी म्हणजे देवाबरोबर तुमचा एकत्रित समय अत्यंत प्रभावी असला पाहिजे. आजच्या देवहीन जगात आत्मिक फळ देण्याचा अनुभव घेणे आणि केवळ शुभवर्तमान विक्रेता' असणे या दोहोत फार फरक आहे! विश्वासणाऱ्याने

उठून जगासमोर ख्रिस्तासंबंधी काहीतरी साक्ष द्यावी यासाठी त्याची योजना करण्यात आली नाही. उलट जो नव्याने जन्मलेला आहे त्याच्यामध्ये ख्रिस्त वसत असतो आणि मग तो आनंदाने ख्रिस्तासंबंधी बोलू शकतो.

प्रभु येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला, ''जो माझ्यामध्ये राहतो आणि मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो कारण माझ्यावाचून वेगळे असल्यास तुम्हाला काही करता येत नाही'' (योहान १५:५). त्याच्यामध्ये राहणे आणि त्याच्याबद्दल सांगणे या तुमच्या जबाबदाऱ्या आहे. त्याचे फळ देण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे.

पन्नासाव्या दिवसानंतर शिष्यांचा आनंद आणि उत्साह भरभरून वाहू लागला. पुनरुत्थित प्रभुबरोबर अगोदरच ते चालले बोलले होते. ते जेथे जेथे गेले, ज्यांनी ख्रिस्ताला नाकारले अशांनाही त्यांनी ख्रिस्ताबद्दल व देवाच्या आश्चर्यकारक कृतीबद्दल सांगितले (प्रे.कृ. २:१). लोकांना हे ऐकून अधिकच उत्सुकता वाटू लागली आणि हजारो लोक पेत्राचे भाषण ऐकण्यासाठी जमा झाले. तो उपदेश करू लागला तेव्हा त्या समुदायाला स्वतःच्या पातकांची प्रकर्षाने जाणीव झाली. अगदी थोड्या वेळापूर्वी ज्यांनी ख्रिस्ताला वधस्तंभी खिळण्यासाठी आवाज उठविला होता ते आर्तपणे म्हणाले, ''बंधुजनहो, आम्ही काय करावे? (प्रे.कृ. २:३७). त्याच दिवशी शिष्यांची वैयक्तिक साक्ष आणि पेत्राचे जाहीर भाषण यामुळे आत्म्याचा फार मोठा हंगाम वेचण्यात आला!

पुढे शिष्यांना अधिक कठीण प्रसंगाला तोंड द्यावे लागले; तेव्हा शिष्यांनी देवाची अगदी कळकळीने प्रार्थना केली. जे धर्मपुढारी होते ते शिष्य आणि त्यांचा संदेश अशा दोहोंचीही हेटाळणी करीत होते. त्यांनी शिष्यांना दटावले की येशूच्या नावाने त्यांनी काही बोलू नये. या

अगोदर माडीवरच्या खोलीमध्ये येशूने शिष्यांना वैयक्तिकरित्या सुवार्ता कशी सांगावी हे शिकविले नव्हते. परंतु आता ते पवित्र आत्म्याने भरले होते त्यामुळे ते स्वतः होऊनच म्हणाले. "जे आम्ही पाहिले व ऐकले ते न बोलणे हे आम्हाला शक्य नाही" (प्रे.कृ.४:२०). पुन्हा ते देवाच्या सानिध्यात आले होते. पुनरुत्थित ख्रिस्तामुळे त्यांचे हृदय पेटले होते. शांत बसणे त्यांना शक्य नव्हते.

१९६० साल दरम्यान मी आणि डॉरथीने 'पोलादी पडद्या' आड सुवार्ता गाजवली. पाळकीय सेवेमधील अडचणीसंबंधी विचारणा केली असता एक पाळक म्हणाले, 'आम्ही सध्या थोडेच जण आहोत पण आम्ही कोण आहोत हे आम्हाला माहीत आहे. आमच्यापैकी जे वाचतील त्यांना पुनरुत्थित ख्रिस्त ठावूक आहे. याबद्दल आम्ही अगदी ठाम आहोत." (माझ्या काही वाचकांना अशा प्रसंगांचा अनुभव आहे. आज जगामध्ये जे घडत आहे ते पाहून आणि जर ख्रिस्त पुन्हा लवकर आला नाही तर आपण पूर्वी कल्पनाही केली नसेल अशा गोष्टींना आपल्याला तोंड द्यावे लागेल).

'एकत्रित समय' या तिच्या वहीमध्ये डॉरथीने लिहिले. "त्याच्या मृत्युचे मोल म्हणजे माझ्या प्रत्येक श्वासातून त्याचा आत्मा वाहतो आहे असे वाटले पाहिजे." प्रारंभीच्या शिष्यांनी त्याच्या निर्भिड साक्षीकरिता मोठे मोल दिले होते. येशूबद्दल काहीच बोलू नका अशी त्यांना धमकी दिली तेव्हा ते एकत्र जमून प्रार्थना करू लागले. आपण वाचतो, "...ते सर्व पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन देवाचे वचन ध ैर्याने बोलूं लागले" (प्रेषित ४:३१).

जेव्हा पवित्र आत्मा हा पवित्र आत्म्याने भरलेल्या विश्वासणाऱ्याच्या जीवनातून भरभरून वाहावयास लागतो तेव्हा प्रभावी सुवार्ता गाजविल्या जाते. खऱ्या

विश्वासणाऱ्याच्या जीवनातून मग त्याच्या आत वास करणारा ख्रिस्त प्रगट होऊ लागतो.

नवा करार वाचतांना आपल्याला दिसून येईल की प्रारंभीच्या मंडळीमध्ये सुवार्ता कार्य हे कोणा बडा व्यक्तिमत्वामुळे घडत नव्हते. पन्नासाव्या दिवशी पेत्राचे भाषण ऐकण्यासाठी मोठी गर्दी जमली होती. कारण त्या अगोदर शिष्यांनी देवाच्या थोर कार्याची घोषणा व्यक्तिशः लोकांकडे जाऊन केली होती (प्रे.कृ. २:११).

विश्वासणाऱ्याच्या हृदयातून ख्रिस्ताची पवित्रता, जीवन आणि प्रीती जेव्हा निराशेने ग्रासलेल्यांकडे वाहू लागते तेव्हा लोकांची अंतःकरणे मृदू बनतात व देवाचे सत्य वचन स्वीकारण्यास ते तयार होतात. म्हणून आपण रोज रोज देवाच्या वचनाच्या प्रकाशात आले पाहिजे आणि त्याच्या आत्म्याने परिपूर्ण होत गेले पाहिजे (इफिस ५:१८).

## ओतप्रोत सुवार्ता प्रसार

माझ्या ख्रिस्ती जीवनाच्या सुरुवातीच्या काळात मी तरुण मंडळाचा सभासद होतो. 'ज्ञाना' पेक्षा आमच्याकडे उत्साहच अधिक होता! त्यामुळेच कदाचित देवाने आम्हाला ज्या लोकांचे परिवर्तन झाले नाही अशांसाठी कार्य करावयास लावले. तरुण विश्वासणारे म्हणून आम्हाला काम करतांना आलेले अनुभव या संदर्भात कसे होते हे मला सांगू द्या.

**व्यावसायिक जीवन** : माझे परिवर्तन होण्याच्या समयी मी टाऊन कौंसीलमध्ये सिव्हील इंजिनियरच्या ऑफिसमध्ये काम करून शिकत होतो. तेथे काम करीत असतांना एकदा मला टाऊन क्लार्कच्या ऑफिसात बोलावणे आले. मला वरिष्ठ साहेबांद्वारे सक्त ताकीद

देण्यात आली, ‘‘तूं अनेक अवांतर कामात गुंतलेला असतोस असे मला समजले आहे.’’ तो माझ्या सुवार्ता कार्यासंबंधी मला बोलत होता. कारण आम्ही तरुण मंडळी ते कार्य करीत होतो. रात्री सर्व दुकाने बंद झाल्यानंतर आम्ही सर्वजण एका ठिकाणी जमून उघड्यावर सुवार्तासभा घेत असू. सुरुवातीला आम्ही काय सांगतो हे ऐकण्यास कोणी उत्सुक नसे. परंतु बोलणाऱ्याला पेचात टाकले म्हणजे मग इतर अनेक लोक त्याला साथ देत; तर काहीजण बोलणाऱ्याची कीव करीत. हळूहळू अनेक लोक जमा होत व आम्ही त्यांना संदेश देत असू आणि मग कधी कधी रात्री एक-दोन लोक ख्रिस्ताकडे वळत! टाऊन क्लार्कने अशा व्यावसायिक लोकांचे आम्ही टाऊन हॉलमध्ये परिवर्तन करू नये असे आम्हाला बजावले. आमच्या अशा ‘फाजील उत्साहामुळे’ टॉऊन हॉलची इभ्रत कमी होते असे त्याचे म्हणणे होते. हे सर्व बंद झालेच पाहिजे असा दम त्याने भरला. परंतु आमच्या उघड्यावरील सभांना चांगले फळ येत होते म्हणून आम्ही सर्व तरुणांनी हे कार्य चालू ठेवण्याचे ठरविले.

कालांतराने मी बायबल कॉलेजमध्ये शिकत असतांना आमच्या कॉलेजच्या प्राचार्यांनी उपदेश करतांना म्हटले, ‘‘उघड्यावरच्या सभेत जर तुम्हाला गर्दी खेचता येत नसेल तर बंदिस्त उपासना मंदिरात तुम्ही लोकांना कंटाळा येऊ देऊ नका!’’ हे ऐकल्यानंतर आम्ही उघड्यावरील आमच्या सुवार्ता सभांमध्ये कार्य केल्याबद्दल मला मनोमन बरे वाटले!

माझे परिवर्तन झाल्याबरोबर मी माझ्या ख्रिस्तावरील विश्वासासंबंधी माझ्या सहकार्यांना सांगितले. परंतु माझ्या ऑफिसमधील एका व्यक्तीला मी अद्याप काहीच सुवार्ता सांगितली नाही हे मला आठवले. ती व्यक्ती म्हणजे रोज रात्री ऑफिसची फरशी पुसण्यासाठी येणारी एक बाई होती. एका रात्री सर्व सहकारी निघून गेल्यानंतर मी

बादली आणि फरशी पुसण्याचा ब्रश कोठे आहे ते पाहिले. त्याच्या सहाय्याने मी सगळी स्वच्छता केली आणि ती बाई येण्याची वाट पाहू लागलो. ती आली तेव्हा मी आनंदाने तिला म्हणालो, ''तुझे सगळे काम मी केले आहे.'' तिला आश्चर्य वाटले. मग तिने माझ्याबरोबर चहा घेतला. आम्ही बोलत होतो. तेव्हा मी तिला येशूबद्दल सांगितले. आम्ही बोलत होतो, आणि नंतर प्रार्थना केली. तेव्हा तिच्या डोळ्यातून ओघळलेल्या अश्रूंची आठवण आजही मला होते.

**सामाजिक जीवन :** मला माझा एकविसावा वाढदिवस आठवतो. इंग्लंडमध्ये अशा समारंभाला त्यावेळी विशेष महत्व दिले जाई. अशा समारंभ प्रसंगी उत्कृष्ठ भोजन व नंतर नृत्याचा कार्यक्रम असे. मी एकवीस वर्षांचा झालो तेव्हा देवाने माझ्या पायातील नृत्य काढून टाकले व ते माझ्या हृदयात भरले होते. म्हणून माझा एकविसावा वाढदिवस आणि त्यानिमित्त माझ्या आईवडिलांनी प्रेमाने आयोजित केलेला कार्यक्रम म्हणजे माझ्या मित्रांना ख्रिस्ताकडे आणण्याची माझ्यासाठी पर्वणीच होती. त्यांकरिता मी एका सुवार्ता प्रसारकाला बोलावले होते. मी निमंत्रण पत्रिकेत उल्लेख केला की जेवणानंतर एक विशेष भाषण होईल आणि त्या निमंत्रण पत्रिका मी माझ्या सहकारी मित्रांना दिल्या. ''तुमच्या उपहाराऐवजी तुमची उपस्थिती प्रार्थनीय आहे'' असेही त्यात नमूद केले. त्याच रात्री माझ्या एका मित्राचे आश्चर्यकारकरित्या परिवर्तन झाले!

नंतर लंडनमधील बॅप्टिस्ट चर्चचा मी सहाय्यक पाळक झालो. त्यावेळी तरुणांनी आयोजित केलेली सहल, शहरातील फेरफटका, खेळाच्या शर्यती या कधीच परिवर्तन न झालेल्या तरुणांना निमंत्रण दिल्यशिवाय घडल्या नाहीत. या सर्व कार्यक्रमांचा शेवट शुभवर्तमानाने होत असे. कां होऊ नये? सर्व तरुणांना हे पटले होते की त्यांच्या

तरुण मंडळाची उभारणी हे प्रभुच्या भक्कम पायावरच होते आणि इतर अनेकांचे परिवर्तन त्यामुळे साधले जाणार होते. त्यामुळे देवाच्या कृपेत त्या तरुण मंडळीची वाढ होत गेली यात नवल नाही.

**आत्मिक जीवन** : मी एकोणीस वर्षांचा असतांना माझे परिवर्तन झाले आणि त्यापूर्वी मी पवित्र शास्त्राचा अभ्यास कधीच गांभीर्याने केला नाही. अर्थात तोपर्यंत मला देवाच्या वचनासंबंधी अगदी तोकडी माहिती होती. परंतु जेव्हा मी प्रभु येशूचा माझा तारणारा म्हणून स्वीकार केला तेव्हा आम्ही काहीजण एकत्र येऊन दर सोमवारी रात्री पवित्र शास्त्राचा अभ्यास करू लागलो. आमचे एकच ध्येय होते की देवाचे वचन आमच्या मस्तकातून हृदयाकडे पोहंचावे, तेही अगदी त्वरित! त्याही काळात आम्ही पवित्र शास्त्राचा अभ्यास अगदी प्रारंभिक स्वरुपाचा असा करीत होतो. आम्ही देवाचे वचन म्हणजे एक धार्मिक क्रमिक पुस्तक आहे असे समजत नव्हतो. उलट ते आमच्या जीवनाला दिशा दाखविणारे होकायंत्रच आहे असे मानत होतो.

त्या सोप्या शास्त्राभ्यासामुळे काही जणांचे परिवर्तन झाले आणि आम्ही सर्वांनी मिळून शुभवर्तमानाचा संदेश दूरवर नेला. आमच्यापैकी कोणाजवळही मोटार नव्हती. मग आम्ही सायकलवर जात होतो. आमच्यापैकी काहीजण हुशार होते. त्यांनी सायकलीवर कर्णे, ट्रॉली बसविली. सुट्टीच्या दिवशी आम्ही आजुबाजुच्या खेड्यात सायकलवर फेरी मारीत असूं. आमच्या सायकल मागे ‘ट्रेलर’ व पुढे कर्णे होते.

एका खेड्यात मेथडिस्ट मिशनचे एक उपासनामंदिर होते; परंतु त्याचे दार काळजीपूर्वक कुलुप लावून बंद केले होते. शुभवर्तमान प्रसाराच्या उत्साहापोटी आम्ही किल्ली मिळविली. त्या इमारतीचा उपयोग करण्याची परवानगीही मिळविली. सर्व धुळीने माखलेले बाक

स्वच्छ केले आणि आम्ही त्या खेड्यात आमच्या कर्ण्यासह गेलो. खेड्याबाहेर एका दुकानासमोर आम्ही आमचे पुलपिट उभे केले. बेवशेवा या अमेरिकन गायकाचे गीत आम्ही ग्रामोफोनवर सुरू केले. तो गायक नुकताच इंग्लंडला येऊन गेला होता. त्याच्याबरोबर एक तरुण मुलगा होता. त्याचे नाव बिली ग्रॅहम, गीताच्या दरम्यान आम्ही उभे राहून ख्रिस्तावरील विश्वास आणि ख्रिस्त हा तारणारा प्रभु आहे याबद्दल साक्ष देत होतो. नंतर आमच्यापैकी काहीजण संदेश देऊ लागले. ते ऐकण्यासाठी दुकानातून लोक बाहेर येऊ लागले. नंतर असे झाले की उपासनामंदिरात लोकांची गर्दी होऊ लागली व सर्वांना आश्चर्य वाटले. एका मुलीला व तिच्या बहीणीला ख्रिस्त सापडला व पुढे ती एक चांगली संडेस्कूल शिक्षीका झाली. आता त्या उपासनामंदिराला कुलुप लावले जात नव्हते उलट संडेस्कूलचे आता चर्च झाले होते.

पौलाने तीमथ्याला सांगितले, ‘‘वचनाची घोषणा कर, सुवेळी अवेळी तयार राहा’’ (२ तीमथ्य ४:२). जर पौल आज सेवाकार्य करीत असता तर त्याने तीमथ्याला असे म्हटले असते, ‘देवाचे वचन सांगण्याची संधी मिळाली तर ती दवडू नको. संधी मिळो वा ना मिळो वचन सांग, देवाचे वचन सांगण्यासाठी कुठल्या हंगामाची वाट बघावयाची नसते!’’ पौलाला आज देखील कुठला औपचारिक शास्त्राभ्यास रुचला नसता असे मला वाटते. कारण तसे करून मिळणारे ज्ञान पुढे वाढत नाही. त्यातून धैर्य व प्रीतिचा विकास होत नाही. तसे असते तर मग उपासनामंदिराला कुलूप लागलेच नसते.

देवाच्या वचनाचा अभ्यास करण्याचे व ते मस्तकातून हृदयाकडे नेण्याचे गुपित तुम्हाला कळले म्हणजे ते वचन यिर्मया म्हणतो तसे तुमच्या हाडात अग्नीप्रमाणे धुमसेल.

जर शास्त्रवचन केवळ तुमच्या मस्तकातच राहिले तर कदाचित

तुम्ही वचनाचा मनुष्य व्हाल, आत्म्याचा नव्हे. तुमच्या हाडात अग्नी कधी पेटणारच नाही! तुम्ही नियमीतपणे जेव्हा देवाबरोबर एकत्रित समयात येता तेव्हा तुम्हाला हळूहळू समजेल की तुम्ही आत्म्याचा मनुष्य बनविण्यासाठी तुम्हाला प्रथम वचनाचा मनुष्य बनणे फार आवश्यक आहे.

होय, जेव्हा आपण देवाचे वचन वाचतो तेव्हा तो आपल्याबरोबर बोलत असतो. आणि तो जे काही बोलतो ते आपण इतरांसोबत वाटावे अशी त्याची अपेक्षा असते. यहज्केलाला देव म्हणाला, ''तू माझ्या तोंडाचे वचन ऐकून माझ्या वतीने त्यांस सावध कर'' (यहज्केल ३३:७). परंतु आपण प्रथम ऐकल्याशिवाय इतरांना काही सांगू शकत नाही. आपणच प्रथम त्याच्या वचनाला योग्य प्रतिसाद दिला तर ते इतरांनाही सांगता येईल.

ख्रिस्ती लोकांमध्यें अनेक 'वकील' आहेत परंतु असे फारच थोडे लोक आहेत की जे त्यांचे ख्रिस्ताशी असलेल्या वैयक्तिक नातेसंबंधाविषयी उत्तम साक्ष देऊ शकतील.

नंतर योहानाने त्यांच्या ख्रिस्ताबरोबर असलेल्या जिवंत सहभागितेसंबंधी अतिशय आनंदाने साक्ष दिली. त्याने इतरांनाही आपल्या अपेक्षेप्रमाणे त्या आनंदात सहभागी होण्यासाठी बोलावले. ''जे आम्ही पाहिले व ऐकले आहे ते तुम्हासही ह्यासाठी कळवितो की तुम्हीही आमच्याशी सहभागी व्हावे'' (१ योहान १:३).

## आत्मिक तपासणी

१. मी जेथे काम करतो व ज्या मोहल्यात मी राहतो ती ठिकाणे माझी वैयक्तिक सेवाकार्याची जागा आहे काय?

२. जे लोक माझ्या भोवती आहेत त्यांचे परिवर्तन व्हावे यासाठीच मी झटतो किंवा त्यांना ख्रिस्तात नवे जीवन लाभावे म्हणून प्रीतीने मी त्यांच्याकरिता प्रार्थनापूर्वक प्रयत्न करतो?

३. ख्रिस्तासाठी साक्ष देण्यासाठी मला कधी अधिकार प्राप्त झाला व त्यासाठी मी कोणाची व्यवहार्य मार्गाने मदत केली?

४. येशूविषयी धैर्याने बोलण्यास माझे तोंड मिटले होते, कारण

मी जीवनाबरोबर तडजोड केली?

माझे काम धोक्यात आले होते?

गर्वामुळे मी अभाग्यांना मदत करण्यास इच्छूक नव्हतो व ठोकरलेल्या नासोरी येशूशी जुळते घेऊ शकत नव्हतो?

## अनंत प्रकाश

*अनंत प्रकाश, अनंत प्रकाश*
*तेथे आत्मा किती विशुद्ध असेल*
*तुझ्या शोधक दृष्टीपुढे येतांना*
*तो संकोचत नाही, पण सौम्य आनंदाने*
*तुजपाशी राहील, तुझे रुप न्याहाळत*
*तुझ्या राजासनाभोवतीचे आत्में*
*प्रखर आशीर्वाद हाती धरून*
*त्यांच्यासाठीच ते राखिले आहेत*
*त्यांनी कधीच पाहिले नाही*
*पतीत जगाच्या दुष्टाईला*
*तो, माझ्या सभोवार आहे*
*अंधार, मन आहे कोंदटलेले*
*तो वर्णातील येण्याआधी*
*माझ्या नागड्या आत्म्यावर*
*टाकील प्रकाशझोत, तेव्हा काय होईल?*
*मनुष्याच्या उद्धाराचा आहे एक मार्ग*
*त्या सुंदर सदनाकडे जाण्यासाठी*
*अर्पण आणि यज्ञ शास्त्र पूर्ण*
*पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने युक्त*
*देवापुढे आहे एक वकील सिद्ध*
*यामुळे, यामुळेच येते आपल्याला दृष्टी*
*वरील पावित्र्य न्याहाळण्याची अंधाराचे, अज्ञानाचे पुत्र*
*अनंत प्रकाशात राहू शकतील*
*अनंत प्रीतीच्या कृपेमुळे!*
*थॉमस बेनी (१७९८-१८७४)*

प्रकरण ७

# फळ अथवा अग्नी

माझा एक बेनेट नावाचा स्विडीश-अमेरिकन मित्र आहे. तो अमेरिकेत स्थलांतरीत झाला आहे. तेथे तो एक यशस्वी ख्रिस्ती व्यापारी झाला आहे. त्याच्या अनेक सेवाकार्यांपैकी एक म्हणजे मिशनऱ्यांना त्यांच्या सेवेच्या ठिकाणपर्यंत विमानसेवा पुरविणे. एकदा त्याला व त्याच्या एका मित्राला अलास्का येथे एक छोटे विमान तेथील हवाई कर्मचाऱ्यांच्या सहभागितेसाठी घेऊन जाण्यास सांगण्यात आले. बराच मोठा प्रवास केल्यानंतर त्याचा मित्र त्याला फेअरबॅंक विमानतळावर सोडून गेला व पुढे बेनेटला एकट्याने पुढचा प्रवास करावा लागला.

विमान सुटण्यापूर्वी बेनेटच्या मित्राने विमानात आयत्या वेळेसाठी म्हणून खाद्यपदार्थाचे एक पाकीट ठेवले. त्यामध्ये चॉकलेट होती. एक गरम ब्लँकेटही होते. उड्डाणानंतर एक मोठे वादळ सुरू झाले. भयानक हवेमुळे ते छोटे विमान हेलकावे खाऊ लागले. उलटे-सुलटे होऊ लागले. अलास्काच्या पर्वतरांगांमध्ये एका कड्यावर ते उलट्या

अवस्थेत घसरत स्थिरावले. पुढील तीन दिवस सारखे बर्फ पडत होते. परंतु देवाच्य कृपेने बर्फ विमानावर साचून राहत नव्हते कारण हवेच्या प्रखर झोताने ते उडविले जात होते. तरीही अखेर ते विमान बर्फाने अच्छादले गेले. हवाई दलाच्या शोधपथकाने त्या विमानाचा शोध ा घेण्याचा खूप प्रयत्न केला परंतु ते छोटे विमान कुठे सापडले नाही.

नंतर मग त्या विमानाचा शोध घेणे थांबविण्यात आले. बेनेटचा, तरुण हुशार मुलगा ब्रुस याने बेनेटचा शोध लागावा म्हणून देवाकडे त्याचे सहाय्य मागितले. इकडे बेनेट अगदी क्षीण होत गेला. जगाचा व प्रियजनांचा तो हसत निरोप घेत आहे. असा स्वतःचा फोटो त्याने स्वतःच काढला. मात्र देवाची योजना वेगळीच होती. ब्रूस आणि त्याचे मित्र विमान कोसळले त्या परिसरात आले तेव्हा सूर्याची किरणे त्या विमानाच्या चमकत्या धातूवरून परावर्तित होत होती आणि त्यांना बेनेटचा शोध लागला.

मी ही कथा तुम्हाला कशासाठीं सांगत आहे? नंतर बेनेटने मला सांगितले की तो येशू ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर ते कठीण दहा दिवस पडून होता. बर्फाने आच्छादलेल्या पर्वताच्या कड्यावर तो देवाबरोबर एकटा होता तेव्हा पवित्र आत्म्याने त्याला त्याच्या जीवनाचा आढावा घ्यावयास लावला; कारण त्याला लवकरच देवाच्या घरी जावे लागणार होते. त्याला वाटले की न्यायासनासमोर उभे राहण्याची वेळ त्याच्यावर अगोदरच आली आहे. त्याचा जीवनपट त्याच्या डोळ्यासमोर उभा राहिला तेव्हा त्याने प्रभुची इमानेइतबारे केलेली सेवा त्याला दिसली आणि त्या सेवेचा अविनाशी जीवन मिळण्यासाठी कितीसा उपयोग होईल ह्या विचाराने तो सर्द झाला.

नंतर बेनेटने मला अगदी कळवळून सांगितले की त्याने जे काही सेवाकार्य केले, मंडळीच्या सभेंना हजेरी लावली, मिशनरी कौंसिलच्या सभा आणि मंडळीसंबंधातील अनेक कामे त्याने आनंदाने केली; ती केवळ देहाने केली, त्याच्या बुद्धिमत्तेने केली; परंतु पवित्र आत्म्याच्या चेतावणीने ती त्याने केली नव्हती.

त्या दहा दिवसांच्या कठीण समयात देवाने बेनेटला दाखवून दिले की त्याने केलेली ती 'योग्य' कामे म्हणजे लाकूड, गवत व पेंढा अशी आहेत. (पवित्र शास्त्रात आपण समजतो ती 'योग्य' कामे ही गवत, लाकूड, पेंढा अशी आहेत कारण ती अग्नीत टाकली म्हणजे त्यांची राख होते.) अशा कर्मांचा सार्वकालिक जीवनासाठी काहीच उपयोग होत नाही.

बेनेटच्या जीवनातील हा भयावह अनुभव म्हणजे त्याच्यासाठी संजीवनाचा अनुभव होता. आम्ही त्याला ओळखत होतो, त्याच्यावर प्रीती करीत होतो. देवाच्या कार्यात त्याने स्वतःला आनंदाने झोकून दिले होते. नंतर तो आम्हाला जे काही पूर्वी म्हणाला ते समजले; स्वतःच्या कर्तृत्त्वाने नव्हे तर देवाच्या कृपेने पवित्र आत्म्याच्या चेतावणीने त्याचे उर्वरित आयुष्यात कार्य केले हे त्याच्या जिवंत साक्षीवरूनच आम्हाला दिसून आले.

सर्व विश्वासणाऱ्यांना एके दिवशी न्यायासनासमोर उभे राहावयाचे आहे हा विचार सर्व ख्रिस्ती लोकांनी गंभीरपणे केला पहिजे. हे न्यायासन आणि 'मोठे पांढरे राजासन' यामध्ये फरक आहे. सर्व अविश्वासणाऱ्यांचा न्याय 'मोठे-पांढरे राजासन' पुढे होईल व ते अनंतकाल क्लेश भोगतील. विश्वासणाऱ्यांचा न्याय राजासनासमोर

होईल. विश्वासाने जे केले नव्हते ते अग्नीमध्ये जळून जाईल. जे विश्वासाने केले होते ते देवाच्या गौरवासाठी अनंतकाळ टिकेल कारण ते काम खुद्द देवानेच केले होते! त्या दिवशी अनेक ख्रिस्ती लोकांना कळून चुकेल की मंडळीत त्यांनी केलेली कामे, मंडळीमध्ये असलेली त्यांची लोकप्रियता, त्यांना त्यामुळे मिळालेला आनंद आणि मोठेपणा ही देवाच्या दृष्टीने शून्य आहेत कारण त्यामध्ये आत्म्याच्या चेतावणीचा पूर्ण अभाव होता.

## कोरा कागद

माझ्या समोर दोन कोरे कागद आहेत. त्यावर काहीच लिहिलेले नाही. कोणी काही लिहिले नाही किंवा चित्रही त्यावर काढले नाही. तुम्ही त्या कोऱ्या कागदांकडे पाहिले म्हणजे त्यावर कोणाचे विचार लिहिले नाहीत किंवा कोणी चित्रही काढलेले नाही असे दिसेल. तसेच त्या कोऱ्या कागदावर कोणी चूक केल्याचेही आढळणार नाही! त्या कोऱ्या कागदावर सुंदर असे काही नाही आणि कसला डागही नाही. ते केवळ कोरे कागद आहेत, बस्स! त्यावर काहीच नाही.

तुमचे आणि माझे जीवन असेच कोऱ्या कागदाप्रमाणेच झाले असते. कधीतरी केलेल्या पातकांमुळे त्यावर डाग पडले होते परंतु येशूच्या प्रायश्चित्ताच्या रक्तामुळे आणि देवाच्या दयेमुळे ते डाग धुतले गेले. जीवनाच्या पुस्तकातील प्रत्येक डागाळलेले पान आता देवाच्य कृपेमुळे स्वच्छ झाले आहे. आता ती पाने बर्फासारखी शुभ्र झाली आहेत (यशया १:१८). एक ख्रिस्ती म्हणून मी जेव्हा माझ्या गतजीवनातील पाने चाळतो तेव्हा मला दिसते की मी कळत नकळत केलेल्या

पातकांमुळे पवित्र आत्म्याला किती खिन्न केले. जर येशूच्या रक्ताने ती पाने शुभ्र झाली नसती तर ती अशीच डागाळलेली राहिली असती. देवाने खरेच माझ्यावर किती कृपा केली आहे, मी या जीवनातील पापांनी डागाळलेली ती पाने देवाने धुऊन ती बर्फासारखी पांढरी शुभ्र केली आहेत. कोरी, शुभ्र पाने! हालेलुया! एकही डाग नसलेली कोरी पाने!

अर्थात एक गंभीर विचार माझ्या मनात आहे. पवित्र आत्म्याने जे माझ्याद्वारे केले नाही ते माझ्या अविनाशी जीवनासाठी जमेस ध ारता येत नाही. जीवनातील अशा दिवसांचे वर्णन संत पौलाच्या शब्दात करता येईल. ‘जणू काय अग्नीतून बाहेर पडलेल्यासारखा तारला जाईल’ (१ करिंथ ३:१५). जेव्हा पवित्र आत्मा माझ्या जीवनातून भरभरून वाहत नसेल आणि माझ्या गतपातकांची क्षमा माझ्या प्रभुने मला केली असेल तर माझ्या अविनाशी जीवनासाठी मी काहीच केलेले नाही. केवळ कोरे पान! बस्स बाकी काहीच नाही!

जीवनातील काही पाने सदैव कोरी राहतील. तर काही पानांवर सुंदर चित्रे असतील की जी पाने ख्रिस्ताच्या जखमी हातांनी मोठ्या प्रेमाने रंगवलेली असतील. ती पाने म्हणजे देवाचे सदैव गौरव आहेत. ही सुंदर सचित्र पाने म्हणजे विश्वासणाऱ्यांच्या जीवनात देवाचे निवडलेले पात्र म्हणून देवाने त्यांच्याकरवी करून घेतलेली चिरकाल टिकणारी कामे होय. होय, कोरी पाने! पण त्यांवर काहीतरी महत्वाचे आहे! हालेलुया!

# वायफळ वर्षे

ज्यांना देव रोज 'या व मजबरोबर जेवा' असे आमंत्रण देतो तेच लोक आपल्या आयुष्याची अनेक वर्षे व्यर्थ घालवत असतात ही दुःखाची बाब आहे. देवाबरोबर आनंददायक सहभागिता भोगण्याऐवजी आणि तारणाऱ्याला संतोषविण्याऐवजी ते आपल्या आयुष्याची वर्षे वाया घालवातात.

एका वयस्कर गृहस्थाच्या आठवणीने माझा जीव गलबलतो. जीवनातील अनेक सुसंधी गमावल्या व मी तारणाला आता मुकलो, जीवनातील सगळी सुखे मी भोगली पण तारण गमावले अशी त्याची स्थिती होती. माझ्या परिवर्तनानंतर मी व माझे काही मित्र एका दवाखान्यात आजाऱ्यांसाठी प्रार्थना करावयास गेलो. दर शनिवारी आम्ही तेथे जाऊन सुवार्ता सांगत होतो. तेथे काही वयस्कर रूग्ण होते. त्यांना दवाखान्यातून बरे होऊन जाण्याची आशा नव्हती. एका शनिवारी मी अशाच एका वयस्कर रूग्णाच्या खाटेजवळ गेलो. त्याची अवस्था गंभीर होती व पुढच्या शनिवारी आमची पुन्हा भेट होणार नाही, तो मरेल असे मला वाटले.

पवित्रशास्त्रामधील वचनांद्वारे दिलेला संदेश त्याने ऐकला व तो गलबलला. त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळले. अडखळत तो म्हणाला, ''मला माहीत आहे, माझे तारण झाले व मी स्वर्गात जाईन.'' मी म्हणालो, ''किती छान!'' मी पुढे काही बोलण्याच्या आतच तो हुंदके देऊ लागला. आंतरिक वेदना त्याला जाणवू लागल्या. खोल आवाजात तो कुचबुजला, ''माझे वय आता एक्काहत्तर वर्षांचे आहे आणि जीवनातील सत्तर वर्षे मी वाया घालविली.''

नवीनच परिवर्तन झालेला मी काय म्हणणार? मी त्याचे कसे सांत्वन केले हे मला आता आठवत नाही; पण मला खात्रीने आठवते की त्या रात्री मी माझ्या घरी गेलो, गुडघे टेकले व प्रार्थना केलीः 'प्रभू मी सुद्धा काही काळानंतरचा माझा भविष्यकाळ माझ्या आजवर उभा असलेला पाहणार आहे. जेव्हा मी स्वर्गात येण्याची वेळ होईल तेव्हा तारलेला आत्मा पण हरवलेले जीवन घेऊन मला यावयाचे नाही. मी माझे जीवन पुन्हा या रात्री तुला देतो. अविनाशी जीवनाप्रत तूं मला ने म्हणून मी प्रार्थना करतो.''

जुन्या करारात हबक्कूकने आपल्याला इशारा दिला की आपण एखादी गोष्ट करण्यासाठी श्रमांची पराकाष्ठा करतो पण नंतर आपल्या लक्षात येते की आपल्या हाती काहीच लागले नाही. त्याने लोकांना म्हटले, ''धार्मिक तर आपल्या विश्वासाने वाचेल'' (हबक्कूक २:४). त्याने आणखी असे म्हटले की देवावर पूर्णपणे विसंबून राहण्यासंबंधी जे विश्वास धरत नाहीत असे लोक त्याच्या जीवनातील कामे म्हणजे 'अग्नीला भक्ष्य होतात' (हबक्कूक २:१३). कारण त्या लोकांनी देवावर अजिबात अवलंबून न राहता शहर वसवले होते, आणि मग सगळ्या शहराची जळून राखरांगोळी झाली. तसेच जर आपण प्रभु येशूवर अवलंबून न राहता काही केले तर आपण देवाच्या भस्म करणाऱ्या अग्नीत जळून राख होऊ.

नव्या करारात नंतर पौलानेही अशीच ताकीद दिली आहे.

''या पायावर (प्रभु येशू ख्रिस्त) कोणी सोने, रुपे, मोलवान पाषाण, लाकूड, गवत, पेंढा ह्यांनी बांधतो. तर बांधणाऱ्या प्रत्येकाचे काम उघड होईल, तो दिवस ते उघडकीस आणील कारण तो

अग्नीसह प्रकट होईल आणि प्रत्येकाचे काम कसे आहे ह्याची परीक्षा ह्या अग्नीनेच होईल. ज्या कोणाचे त्या पायावर बांधलेले काम टिकेल त्याला मजूरी मिळेल, ज्या कोणाचे काम जळून जाईल त्याचा तोटा होईल, तथापि तो स्वतः तारला जाईल परंतु जणू काय अग्नीतून बाहेर पडलेल्यासारखा तारला जाईल'' (१ करिंथ ३:१२-१५).

त्या दवाखान्यातील त्या एकहात्तर वर्षांच्या वृद्धाला त्याच्या तारणाबद्दल आनंद वाटला पण तो अग्नीतून बाहेर पडलेल्यासारखा तारला गेला याबद्दल त्याला वाईटही वाटले. त्याच्या जीवनातील गवत, लाकूड, पेंढा त्या अग्नीमुळे जसा जळून लातो तसेच सोने, रुपे उजळून निघते; आणि त्याद्वारे पवित्र आत्मा देवाचे अविनाशी घर बांध ात असतो.

## अनंत प्रकाश

जी ख्रिस्ती व्यक्ती ख्रिस्तात जगत असते, विश्वासात वाढत जाते व देवाच्या इच्छेप्रमाणे वागते अशा व्यक्तीद्वारे देव त्याचे सार्वकालिक कार्य करीत असतो. असे लोक आपला प्रत्येक दिवस आनंदाने व्यतीत करतात व साक्ष देतात, ''म्हणून न हालविता येणारे राज्य आपल्याला असल्या कारणाने आपण उपकार मानू, तेणेकरूण देवाला संतोषकारक होईल अशी त्याची सेवा, आदर व भय धरुन करूं' (इब्री १२:२८). आपला एकत्रित समय परिणामकारक असेल तर आपल्याला आत्म्याच्या प्रेरणेने चालण्यास उत्तेजन मिळेल. आपण देहाच्या ताकदीवरच जगणार नाही.

देवाच्या सर्वसाक्षी प्रकाशामध्ये ज्यांनी देवाची पात्रे म्हणून जिवंत देवाची सेवा केली ते एक दिवस खूप आनंद करणार आहेत. आपण त्याच्या मेजवानीच्या मेजापाशी दिवसें दिवस नजीक येत आहोत आणि प्रकाशाचा व प्रितीचा देव आपल्याला पारदर्शी सहभागितेसाठी बोलावत आहे. याप्रकारे आपण त्याच्या प्रकाशाचे व प्रितीचे माध्यम या अंधाऱ्या आणि स्वार्थी जगासाठी होणार आहोत.

## आत्मिक तपासणी

१. मी आज आहे तसाच जगू लागलो तर ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर माझ्या जीवनात काही फळ आढळेल काय?

२. मी प्रार्थना करतो तेव्हा अनंत प्रकाश अशा देवासमोर येतो कां किंवा तो माझा स्वर्गीय सहाय्यक आहे असे मला वाटते?

३. दावीदाची प्रार्थना म्हणणे मला आता गरजेचे आहे, ‘तुझ्या वचनाप्रमाणे मला नवजीवन दे’? (स्तोत्र ११९:२५)

*हे प्रिय प्रभु, माझ्यासाठी तू मोड*
*जीवनाची भाकर*
*समुद्राच्या तिरावर प्रभु तू अशीच*
*मोडली होती भाकर*
*पवित्र पानापलीकडे प्रभु*
*मी तुला शोधतो*
*माझा जीव तुझ्यासाठी व्याकुळला*
*आहे रे जिवंत शब्दा*
*तूच आहेस जीवनी भाकर*
*माझ्यासाठी रे प्रभु*
*तुझे दिव्य वचन सत्य आहे*
*माझ्या तारणासाठी*
*तुझ्याबरोबर जेऊ दे*
*राहू दे मला स्वर्गामध्ये*
*तुझ्या सत्यावर प्रेम करू दे*
*कारण तूच प्रीति आहेस*
*आता तुझा आत्मा प्रभु*
*माझ्यासाठी पाठवून दे*
*स्पर्श करील तो नेत्रांना*
*आणि मग दृष्टी येईल मला*
*तुझ्या वचनात दडलेले सत्य*
*दिसू दे माझ्या नेत्रांना*
*तुझ्या वचनांतून प्रकटतांना*
*दिसतोस प्रभू तूं मला*

*मेरी ॲन लॅथबरी*

*प्रकरण ८*

# या आणि जेवा

गालील समुद्राच्या किनाऱ्यावर वाळूमध्ये देवाचा पुनरुत्थित पुत्र उभा होता. कोणाचेही लक्ष त्याच्याकडे नव्हते. तो एकटाच उभा होता. थकल्या-भागलेल्या शिष्यांना सकाळच्या धुक्यामुळे कदाचित तो दिसला नसेल. कदाचित येशू ख्रिस्ताच्या त्या क्रूर वधस्तंभावरील मरणामुळे त्यांचे आत्मिक नेत्र बंद झाले असावेत.

किनाऱ्याच्या जवळपासच ते शिष्य एका छोट्या नावेत बसून मासे पकडण्याची धडपड करीत होते. रात्रभर त्यांचा तो खटाटोप चालू होता. तरी त्यांच्या जाळ्यात एकही मासा सापडला नव्हता. त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी कोणी तरी विचारले –‘मुलांनो तुम्हांजवळ खावयासाठी काही आहे काय?’ मग दूरवर असलेल्या त्या व्यक्तीच्या मुखातून आज्ञा झाली –‘नावेच्या उजव्या बाजूला जाळे टाका म्हणजे तुम्हाला मासे सापडतील.’

तंद्रीतून जागा होत योहानाने तो आवाज ओळखला आणि तो

ओरडलाच –'हा प्रभु आहे!' शिष्यांची आशा पल्लवीत झाली. त्यांनी त्याच्या आज्ञेप्रमाणे जाळे टाकले आणि आश्चर्य म्हणजे ते जाळे माशांनी गच्च भरले. पेत्राने उत्साहाच्या भरात पाण्यात उडी टाकली आणि पोहत पोहत तो त्याच्या गुरुजीकडे गेला (योहान २१:११).

समुद्र किनाऱ्यावर गौरवाचा स्वामी येशू ख्रिस्त यानेच अग्नी पेटविला. सगळे शिष्य भोवताली जमल्यावर येशूने मासे घेतले ते भाजले व भोजन तयार केले. त्या थकलेल्या आणि भुकेजलेल्या शिष्यांना मग त्याने प्रेमाने बोलावले – 'या आणि जेवा' (योहान २१:१२).

गेली दोन हजार वर्ष असे आमंत्रण दिले जात आहे. अनंतकालाच्या किनाऱ्यावर येशू उभा आहे आणि रोज रोज तो आपल्याला बोलवित आहे. त्याने स्वतः तयार केलेल्या स्वर्गीय भोजनासाठी तो आपल्याला बोलवित आहे. येशू ख्रिस्त म्हणजे खुद्द देवच, त्यानेच आमच्यासाठी रोजचे अन्न अतिशय काळजीपूर्वक तयार केले आहे. ते आमच्या विश्वासाकरिता अन्न आहे. ते अन्न म्हणजे देवाचे वचन, पवित्र शास्त्र.

काही क्षणातच मी तुम्हाला 'माझा एकत्रित समयांत' येऊन देवाचे वचन ऐकण्यासाठी बोलावीन. तुमच्या गुरुच्या निमंत्रणाप्रमाणे 'या व जेवा' मी तुम्हाला एकत्रित समयातील अत्यंत मोलवान प्रार्थनेसाठी बोलावतो कारण त्यामुळे तुम्हाला खूप उत्तेजन मिळेल. दोन वेगवेगळ्या मार्गांनी मी हा 'एकत्रित समय' तुम्हासंगती घालवावा असे मला स्पष्ट दिसले आहे.

**प्रथम :** माझ्या एका मित्राने या पुस्तकातील प्रकरणे वाचली आणि

पुस्तकासाठी एक तात्पर्य म्हणून मी हे करावे असे त्याने आग्रहाने मला सांगितले.

**दुसरे** : मागील वर्षांमध्ये वारंवार मला देवाने संधी दिली व देवाने लोकांना अगदी विशिष्ट मार्गाने कसे आशीर्वादित केले याबद्दल देवाने साक्ष देण्याची मला संधी दिली. त्या लोकांना मी अनेकदा माझ्यासह एकत्रित समयात आणले होते.

अशा प्रसंगी हजर असलेल्यापैकी कोणी तरी सहभागी होत असे. कोणी काही प्रश्न न विचारता शांतपणे प्रार्थना मात्र करावयाची, कसला संदेशही द्यावयाचा नाही. आम्ही आमची सहभागिता प्रार्थनेने सुरू करीत असू. यासाठी की पवित्र आत्माच आमचा मार्गदर्शक गुरू असावा. मग आम्ही एकत्रित एखादा निवडलेला शास्त्रभाग मोठ्याने वाचत असू. मग पुन्हा आम्ही त्या शास्त्रभागाकडे वळून त्यातील पहिले वचन मोठ्याने एकत्र म्हणत असू. दुसऱ्याकडे वळण्यापूर्वी आम्ही तीस सेकंद शांततेत घालवत असू. त्या शांत क्षणामध्ये प्रत्येक जण त्या वचनावर मनन करीत असे. मग त्या प्रकरणाच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे आम्ही त्या वचनात शोधत असू. त्यानंतर मग प्रत्येकजण ते वचन पवित्र आत्म्याने त्याच्या किंवा तिच्या हृदयाला कसे लागू केले हे सर्वांना सांगत असे. मग आम्ही त्या संदर्भात प्रार्थना करीत असू. विशेषतः ज्याने यासंबधी आपले विचार मांडले ती व्यक्ती प्रामुख्याने प्रार्थना करीत असे किंवा मंडळीतील दुसरी व्यक्ती प्रार्थना करीत असे.

माझ्या मते 'एकत्रित समय' अगदी उपयुक्त होण्याचा हा चांगला मार्ग आहे. यावेळी, मी जे लोक ह्या पुस्तकाचा गटाने अभ्यास

करीत आहेत. त्यांना सांगेल की त्यांनी इतर कोणत्या सभांना जाण्यापेक्षा या पुस्तकातील सूचना अमलात आणाव्यात (या संबंधी परिशिष्ट अ मध्ये काही प्रश्न दिले आहेत).

सर्वांनी मिळून एकत्रित समयाचे तंत्र प्रथम मला स्वर्गवासी थॉमस बी रीस यांनी दाखवून दिले. ते ब्रिटीश सुवर्ता प्रसारक होते. हे तंत्र त्यांनी यंग पिपल्स हॉलीडे कॉन्फरन्स सेंटर येथे वापरले होते व तेथेच मी ख्रिस्ताकडे वळलो होतो – थॉमस यांनी जे वेगवेगळे प्रश्न विचारले तेच मी 'एकत्रित समय' या प्रकरणात नमूद केले आहेत.

गेली अनेक वर्षे मी अशा सभा घेतल्या त्यावेळी देवाची उपस्थिती आणि पवित्र आत्मा लोकांच्या हृदयाशी बोलत आहे याची मला प्रकर्षाने जाणीव झाली. अशीच एक सभा मी बॅप्टिस्ट चर्च, कॅनडा येथे घेतली तेव्हा एक पाळक मला म्हणाले, "ही भक्ती अगदी आशीर्वादित अशी झाली आणि माझ्या संपूर्ण पाळकीय सेवेत अशी भक्ती मी कधीच अनुभवली नाही.'

अशाचप्रकारे मी अनेक वेळा अरबी लोकांसाठी जुन्या यरुशलेम शहरामध्ये पुष्कळ सभा घेतल्या. त्यावेळी कॅनेडियन बायबल कॉलेजचे प्राचार्य म्हणाले, 'यापूर्वी आम्हाला यरुशलेममध्ये एवढा आत्मिक लाभ कधीच मिळाला नव्हता."

मंडळीच्या सभेत, कौटुंबीक सहभागितेत, पवित्रशास्त्राभ्यासांत, आणि तरुणांच्या सभेत देवाने या सर्वांना विशेष आशीर्वाद दिला. सर्वांनी वैयक्तिकरित्या देवाच्या वचनांचा स्वीकार केला.

मी 'एकत्रित समय' हे प्रकरण लिहीत असतांना मला समजले की त्यातील सत्य गवसणे हे खरेच अवघड आहे. त्यामधील तेज

आणि माझी वैयक्तिक सहभागिता अशी शब्दबद्ध करण्यापेक्षा तिचा वैयक्तिकरित्या अनुभव घेणे हे कितीतरी जास्त आनंददायक असते.

मी जेव्हा 'माझ्या' एकत्रित समयात' येतो तेव्हा त्यासंबंधीचे काही साधे नियम मी तुमच्यासमोर ठेवत आहे.

**पहिले** : मी माझ्या आवडीचा शास्त्रभाग किंवा नेहमी वाचला जाणारा शास्त्रभाग निवडत नाही! माझ्या रोजच्या 'एकत्रित समयासाठी' मी पौलाचे करींथकरास पत्र हा शास्त्रभाग वाचतो.

**दुसरे** : आज वाचलेल्या शास्त्रभागाच्या प्रत्येक वचनाबरहूकुम स्पष्टीकरण करीत नाही.

**तिसरे**: माझा 'एकत्रित समय' हा अगदी नैसर्गिक करावयाचा आहे. या वचनांसंबंधी पवित्र आत्म्याने मला जो बोध केला तो मी तुमच्यापुढे मांडणार आहे.

**चौथे**: देवाच्या वचनांवर मी प्रार्थनापूर्वक मनन केले तेव्हा देव मला काय म्हणाला हे मी तुम्हाला सांगणार आहे. त्यासाठी काही आधी दिलेल्या प्रश्नांचा मी आधार घेणार आहे.

मी माझे मनन तुम्हाला सांगतांना, तुम्हाला 'एकत्रित समय' हा अगदी वैयक्तिक अनुभव असतो हे प्रकर्षाने जाणवेल. आज तुम्ही ज्या परिस्थितीत आहात ती माझ्यापेक्षा भिन्न आहे हे मला माहीत आहे. तसेच सहा महीन्यानंतर मीही वेगळ्याच परिस्थितीत असेन याचीही मला जाणीव आहे. देव त्याच्या आपल्यावरील प्रीतीस्तव आपण ज्या परिस्थितीत असतो त्या परिस्थितीत तो आपल्याला भेटत असतो. आपण जसे असू तसे तो आपल्याला भेटतो. ते इतर कोणाच्या परिस्थितीवर किंवा ठिकाणावर अवलंबून नसते. तुम्ही

पुढील नोंदी वाचल्या म्हणजे माझ्यापेक्षा तुम्ही वेगळ्या वातावरणात आहात असे तुम्हाला वाटेल. कारण तुमच्या गरजेनुसार देव तुमच्याबरोबर बोलेल. प्रभुबरोबर राहण्यास व जेवण्यास तोच तुम्हाला रोज निमंत्रण देतो.

देवाचे वचन हे केवळ जिवंत आणि सामर्थ्यवान आहे एवढेच नाही तर ते आमच्या हृदयासाठी त्याचे स्वतःचे वैयक्तिक वचन आहे! 'कारण देवाचे वचन सजीव, सक्रीय असून....मनांतील विचार व हेतु ह्यांचे परीक्षक आहे' (इब्री. ४:१२). ह्यापेक्षा अधिक वैयक्तिक ते काय असू शकते?

आजच्या माझ्या मननासाठी करिंथकरास २ रे पत्र याचा पहिला अध्याय पवित्र शास्त्रातून मी निवडला आहे. माझ्याबरोबर तुम्हीही तुमचे पवित्रशास्त्र उघडा.

***आता पहाटेचे ५:०० वाजले आहेत - मी माझ्या खोलीचा दरवाजा बंद केला आहे आणि देवाबरोबर मी एकांतात असून पवित्र शास्त्र उघडले आहे.***

मी माझे हृदय देवासमोर उघडे करून आलो आहे आणि मी सध्या ज्या परिस्थितीत आहे ती साधारण अशी आहे.

● डॉरथी जे दुःख व वेदना सध्या सहन करीत आहे त्यासंबधी मी काळजीत आहे. गेल्या आठवड्यापासून तिचे दुखणे अधिक वाढले आहे.

● तिच्या आजारपणामुळे आम्हाला येत्या हिवाळ्यामध्ये आम्ही ज्या सेवाकार्याचे नियोजन केले ते पार पडेल किंवा नाही याचीही काळजी माझ्या मनात आहे. आमच्या दूरवरच्या सेवाकार्यासाठी करावा लागणारा

प्रवास आणि त्यामुळे डॉरथीला होणारा त्रास पाहून मी डॉरथीला मागे म्हटले होते, ‘डॉरथी मी तुला पुन्हा अशा कामासाठी पुढे नेणार नाही. ’ तरीही देवाने आमच्या या संयुक्त सेवाकार्यावर भरपूर आशीर्वाद पाठविला आणि आम्ही दोघेही म्हणालो, ‘‘खरोखर हे किती महान आहे.’’ आता यावेळी तुझी काय इच्छा आहे प्रभुजी?

● आज केनियातील परिस्थितीबद्दल माझ्या मनावर प्रचंड ताण आहे. पूर्वी देवाने आमच्या तेथील कार्यांवर आशीर्वाद पाठविला होता. सध्या तेथील परिस्थिती अत्यंत अस्थिर आहे. महागाई भयंकर वाढली आहे. तेथे ख्रिस्ताची सेवा करणाऱ्या सेवकासाठी आम्हाला अधिक काही केले पाहिजे.

● माझ्या आणि डॉरथीच्या कुटुंबातील काहीजण अकाली मरण पावले आणि काहीजण भयंकर आजारामुळे मृत्यूंशी झुंज देत आहेत. आमच्या क्लिष्ट व अकल्पित कामाच्या स्वरुपामुळे आणि डॉरथीच्या प्रदीर्घ आजारामुळे व अशक्त प्रकृतीमुळे त्या कुटुंबियांना आम्ही त्यांच्यावर किती प्रेम करतो हे कृतीने आम्हाला दाखवणे शक्य नाही.

## प्रार्थना

*हे बापा, तू मला आज फार लवकर जाग येऊ दिली म्हणून मी तुझी स्तुती करतो. तूं माझ्या हृदयाशी बोलावे एकढीच तुझी इच्छा नाही तर जेव्हा मी सहभागितेत येणाऱ्या लोकांना तुझ्या वचनासंबंधी जे सांगेन त्यामुळे त्यांना आशीर्वाद मिळावा ही तुझी इच्छा आहे असा माझा विश्वास आहे.*

*प्रिय प्रभु, जेव्हा लोक हे सगळे वाचतील व माझ्या मनातील*

*विचार त्यांना कळतील तेव्हा माझे मन केवळ तुझ्याबद्दलच जागृत ठेव. म्हणून मी तुला कळकळीने विनवितो की माझे हृदय पवित्र आत्म्याने भर, माझे मन व लेखणी पारदर्शी ठेव. तुझ्याशी मी अगदी खरेपणा दाखवावा असे कृपा करून कर. मी पुन्हा कबूल करतो की माझे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्‌ ये गुप्त आहे. या सुंदर अभिवचनाबद्दल मी तुझा आभारी आहे. मी हे जे लिखाण माझ्या हाताने येथे पृथ्वीवर करीत आहे तरी ते माझ्या वैयक्तिक दृष्टीने कबुलित करण्याची शक्यता मला जाणवते. म्हणूनही प्रभु मी तुझी स्तुती करतो. कारण हे प्रभु तूच स्वर्गातील माझा प्रमुख याजक आहेस आणि माझी प्रार्थना आणि स्तुती तूच पित्याकडे सादर करणार आहेस कारण तूंच सर्वज्ञ आहेस. म्हणून प्रभु मोठ्या आशेने मी तुझ्या वचनाकडे येतो आहे. आज प्रभुजी तूं माझे नेत्र उघड म्हणजे तुझ्या शास्त्रातील अद्‌भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील.*

प्रिय वाचक, आज मी करिंथकरांस २ रे पत्र याचा पहिला अध्याय मोठ्याने वाचणार आहे. मी अध्याय स्पष्ट आवाजात न अडखळता वाचणार आहे. तुम्ही तसेच माझ्याप्रमाणे करा.

या अध्यायाचे काही क्षणापूर्वी वाचन केल्यावर मला संत पौल हा एक आदर्श ख्रिस्ती आहे हे जाणवले. मला आज अशी खात्री वाटते की देव माझ्या प्रश्नांचे आज मला उत्तर देईल. या वचनामध्ये अनुकरण करावे असे कोणते उदाहरण आहे?

मी पहिला अध्याय वाचल्यानंतर, पवित्र आत्म्याद्वारे मला असे वाटले की मी पौलाचे अनुकरण करावे, माझ्या प्रभुचा मी एक चांगला

सेवक व्हावे असे मला वाटते. प्रत्येक वचनांवर मनन करण्यापूर्वी मी प्रभुला तसे सांगेन.

## प्रार्थना

*प्रिय प्रभु येशू, माझ्या जीवनतील सेवेद्वारे पौला प्रमाणेच कार्य प्रतीत व्हावे अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. अनेक मार्गांनी तू माझ्या जीवनात आशीर्वादाची वृष्टी केली आहेस. परंतु मी तुला योग्य तो प्रतिसाद दिला नाही याबद्दल मला दुःख वाटते. तुझ्या सहभागितेकरिता माझे हृदय खूप उत्सुक असते परंतु तुझी सहभागिता इतरांशी वाटून घेण्याची संधी तूं देतोस; तेव्हा मात्र मी भित्रा बनतो व दूर राहतो. आता मी पुन्हा या वचनांवर मनन करीत असतांना, तुझी समक्षता मला लाभू दे, तुझे सामर्थ्य मला लाभू दे. माझ्यामध्ये तुझ्या स्पर्शाने नवीन जीवन निर्माण कर त्यामुळे माझी स्वार्थी वृत्ती कायमची नाहीशी होऊ दे आणि तुझ्या नामासाठीच मी जगावे असे कर.*

आता मी पुन्हा त्या अध्यायाकडे वळतो आणि प्रत्येक वचन विचारपूर्वक वाचतो. हे वाचत असतांना पवित्र आत्म्याने मला सोडू नये म्हणून मी सतत प्रार्थना करत राहतो व देवाला त्या वचनांतून मला कोणता संदेश द्यावयाचा आहे याकडे ध्यान देतो. अशाप्रकारे देवाबरोबर माझे दुहेरी नाते प्रस्थापित होते. तो मजबरोबर बोलतो आणि मी त्याच्याबरोबर. प्रत्येक वचनावर मनन करतांना मी स्वतःला बजावत असतो की जे वचन मला अगोदरच ठाऊक आहे त्याकडे मी दुर्लक्ष करता कामा नये. कदाचित तेच वचन आज देव माझ्या हृदयात सजीव

करील व त्यातून मला नवी दृष्टी प्राप्त होईल म्हणून मी विचारतो. या शास्त्रभागात देव जो पिता यासंबंधी काही नवा विचार मांडला आहे काय?

## वाचन

**वचन ३ :** *करुणाकर पिता व सांत्वनदाता देव*

आज वचन वाचत असतांना माझ्या लक्षात आले की दुसऱ्या वचनामध्ये देवाच्या पितृत्वाबद्दलचा संदर्भ येथेही दिलेला आहे. समासामध्ये दिलेल्या संदर्भाचे असे भाषांतर होऊ शकेल. 'आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचा देव आणि पिता' यासंबंधी थोडा विचार करा. प्रभु येशू ख्रिस्ताचा देव व पिता हा माझा देखील करुणाकर पिता आहे. तोच मला स्वास्थ देतो. मला स्वास्थ लाभावे म्हणून माझ्या स्वर्गीय पित्याने मला त्याची कृपा आणि शांती दिली आहे.

## प्रार्थना

हे पित्या, मी तुझी स्तुती करतो. आभार मानतो व तुजपुढे नतमस्तक होतो. तुझ्या 'कृपेबद्दल' मी तुझे आभार मानतो. तुझी 'अक्षय शांती तूं माझ्या हृदयात ठेवली आहेस. तुझ्या कृपेद्वारे तुझ्यामध ये कायम बसणारी शांती, स्थैर्य, ऐक्य आज तूच मला दिले आहे. हालेलुया! तुझ्या पवित्र आत्म्याने माझ्या हृदयात कार्य होऊ दे असे मी तुला विनवितो. तुझ्या पवित्र समक्षतेत मी नतमस्तक होतो. तू माझे हृदय पूर्ण शांतीने भरून टाक अशी मी तुला प्रार्थितो.

## वाचन

**वचन ४:** *तो आमच्यावरील सर्व संकटात आमचे सांत्वन करितो, असे की ज्या सांत्वनाने आम्हाला स्वतः देवाकडून सांत्वन मिळते त्या*

*सांत्वनाने आम्ही जे कोणी कोणत्याही संकटात आहे त्यांचे सांत्वन करावयास समर्थ व्हावे.'*

पौलाच्या या साक्षीवर मी जेव्हा मनन करतो तेव्हा जे सांत्वन त्याला त्याच्या स्वर्गातील पित्याकडून मिळाले त्या शब्दासोबत इतर कोणते शब्द त्याने या संदर्भात वापरले ते मी पाहतो. ते शब्द आहेत : संकट, संकटात असलेले, दुःख, मृत्युदण्ड. पवित्र आत्मा मला दर्शवितो की 'सांत्वन' या शब्दापासून हे शब्द फारच भिन्न आहेत.

मी पुढे वाचतो तसे माझ्या लक्षात येते की देव आपल्यावर पाठवित असलेल्या संकटामागे देवाचा एक विशिष्ट हेतु पौलाच्या साक्षीत दिसतो. तो म्हणजे : आपण स्वतःवरच विसंबून राहू नये तर मेलेल्यांना जिवंत करणाऱ्या देवावरच विसंबून राहावे. ४ थे वचन वाचतांना माझ्या लक्षात येते की पौलाचेच सांत्वन पावणे महत्वाचे नसून त्याने इतरांचे सांत्वन करावयाचे आहे याकरिता मला प्रार्थना केलीच पाहिजे!

## प्रार्थना

*हे प्रभु तुला हे पूर्ण ठाऊक आहे माझ्या जीवनात असे प्रसंग आले की जेव्हा मी प्रामाणिक पणे दुःखितांचे सांत्वन केले आहे. डॉरथी तिच्या शारीरिक अस्वास्थामुळें दुःखी असतांना मी तिचे सांत्वन करीत असतो. तुझ्यापासून मिळणारे सांत्वन मी तिला देतो.*

*पुष्कळ वेळा मी तिच्याकडून बरेच काही घेतले आहे पण तिला मात्र मी क्वचित तुझे सांत्वन व शांती देण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या स्वार्थीपणाची तूं मला क्षमा कर. सेवा घेण्यापेक्षा सेवा करण्याच्या वृत्तीने तू माझे हृदय भर.*

*अनेक दुःखी लोकांचा मी विचार करतो. ते अतिशय एकाकी व दुःखी अवस्थेत आहेत. भूक, आजार आणि मृत्यु यामुळे त्यांचे जीवन अगदी उध्वस्त झाले आहे. प्रभु मी तुला विनंती करतो की माझ्या हृदयात तू शांती भर आणि त्यामुळे तुझी समक्षता माझ्या जीवनातून दिसेल आणि दुःखितांचे दुःख मला हलके करता येईल.*

*मी ही प्रार्थना करीत असतांना मला जाणवते की जीवनातील दुःखांचे सांत्वन तुझ्याजवळ आहे, मग ते दुःख कितीही कठीण असू दे. ते दुःख तुझ्या करुणाकर हृदयामुळेच येते यासाठी की मी माझ्यावर नव्हे तर तुझ्यावर विसंबून राहावे.*

आता या क्षणी देवाचे वचन माझ्या हृदयात समर्थपणे घुसले आहे. पौलाला सुद्धा त्याच्या सेवाकार्यात अनेक संकटांना तोंड द्यावे लागले हे मला समजते कारण त्याने स्वतःवरच अवलंबून रहू नये. मग देव जर त्याच्या प्रेमाखातर माझ्यामधील गर्विष्ठपणाविरुद्ध माझ्या जीवनात कठीण प्रसंग आणीत असेल तर मी का कुरकुर करावी?

## प्रार्थना

*हे प्रभु तुझ्या प्रेमाच्या सेवाकार्याबद्दल व माझ्या जीवनाबद्दल मी तुझे आभार मानतो. इतर लोकांनी ही प्रार्थना वाचावी व ती मी लिहावी हे अवघड आहे. पौलाने त्याच्या भयंकर संकटात पारदर्शीपणा दाखविला ते पाहून मला उत्तेजन मिळते. त्याने त्याच्या जीवनातील चांगल्या गोष्टीच नमूद केल्या नाहीत. तुझी सेवा करीत असतांना जेव्हा मला मी अगदी एकाकी असल्याचे जाणवले त्याबद्दल, माझ्यासंबंधी लोकांनी गैरसमज*

*करून घेतला त्याबद्दल, माझ्या जीवनातील मूर्खपणाने व पापीपणाने केलेल्या घोडचूकांबद्दल, मी माझ्यावर अवलंबून राहून जेव्हा भयंकर प्रसंगी मी अपेक्षीत ठरलो त्याबद्दल तुझे उपकार मानतो. आता हे येशू तुझ्या पवित्र समक्षतेत मी पौलाप्रमाणे तुझ्यावरच नेहमी अवलंबून राहीन असे तुला वचन देतो.*

प्रभु मी पौलाचे शब्द त्या दिवशी वाचले : 'देव आमचे सामर्थ्य आहे' या सकाळी मी वचन देतो की प्रभु तुच माझे सामर्थ्य आहेस. हे प्रभु आता जे शास्त्रवचन आज माझ्यासमोर आहे त्याबद्दल मी तुझी स्तुती करतो - तू मला सोडविले आहे, तू मला सोडवितोस आणि तूच पुढेही मला सोडवशील - माझ्यापासून! अशा सर्वोत्तम तारणाबद्दल मी तुझे आभार मानतो!

*आता हे प्रभु, पवित्र आत्मा माझे हृदय सामर्थ्यवान बनवीत आहे. केवळ तुझ्या सामर्थ्यानेच ते समर्थ होत आहे. म्हणून आज तुझ्या प्रेमाखातर तू माझा दिवसभर उपयोग करून घे. तुझ्या प्रेमाची ज्या लोकांना आज गरज असेल त्यांना मदत करण्यास तूं मला शक्ती पुरव.*

## वाचन

**वचन ११ :** *तुम्हीही आमच्यासाठी प्रार्थना करून आम्हाला सहाय्य करावे....आमच्या वतीने पुष्कळ जणांना उपकारस्तुती करावी.*

जर पौलाच्या सेवाकार्यामुळे अनेक जणांची तोंडे देवाकडे वर गेली नसती तर त्याचे मला आश्चर्य वाटले असते. तसेच माझ्या

अनेक मित्रांनी माझ्याकरिता प्रार्थना केली नसती व माझे सहाय्य केले नसते तर त्याचेही मला आश्चर्य वाटले असते.

## प्रार्थना

*हे प्रभु, तू तुझ्या लेकरांच्या मनामध्ये डॉरथीसाठी आणि माझ्यासाठी प्रार्थना करण्याचे जे ओझे दिले त्या तुझ्या प्रेमाबद्दल मी किती आभार मानावेत हे मला कळत नाही. अशा या तुझ्या आश्चर्यकारक प्रीतीबद्दल मी तुझे किती व कसे आभार मानूं?*

आता मध्यस्थीच्या प्रार्थनेत मी माझ्या, काही मित्रांना देवासमोर सादर करीत आहे. वचनाच्या प्रकाशामध्ये मी त्यांच्यासाठी प्रार्थना करतो. पवित्र आत्मा माझ्या हृदयाला उत्तेजित करीत आहे. तोच देवाला विनंती करीत आहे की या मित्रांच्या जीवनात देवाने शांती व सामर्थ्य ओतावे कारण त्यांचा देवावर पूर्ण भरवंसा आहे.

## वाच न

**वचन १५, १७-१८**:.. *पहिल्याने तुम्हाकडे यावे.....जसा बेत असता मी चंचलपणा केला काय?....आमचे तुमच्या बरोबर बोलणे होय, नाही असे नाही.*

विचारांच्या क्रमावर मी मनन करतो. पौलाच्या दुसऱ्या भेटीमध्ये करिंथकरांच्या संबंधी त्यांना सांत्वन प्राप्त व्हावे व त्यांना लाभ व्हावा अशीच पौलाची इच्छा होती. त्यांच्याकडून काही मिळावे ह्या हेतूने तो त्यांच्याकडे गेला नाही. उलट त्याला त्यांनाच काहीतरी द्यावयाचे होते. त्याने त्याच्या प्रवासाचा बेत संदिग्ध ठेवला नाही.

(त्याच्या प्रवासाचा खर्च कोण करणार याबद्दल काहीच उल्लेख केला नाही. या प्रवासात पैशाला महत्व नाही हे माझ्या ध्यानांत आले आहे). करिंथ येथे जातांना त्याच्या मनांत वैयक्तिक स्वार्थ मुळीच नव्हता.

## प्रार्थना

*प्रिय प्रभु, तुझ्या आत्म्याने व वचनाद्वारे माझ्या मनात काही चुकीचा हेतु असेल तर मला दाखवून दे. कदाचित त्यामुळे पवित्र आत्मा खिन्न होईल. या हिवाळ्यात मी कोठे सेवाकार्य करावे या संबंधी तुझी इच्छा काय आहे हे मला दाखीव. करिंथकरांनी पौलासंबंधी गैरसमज करून घेतला कारण त्याने त्याच्या प्रवासाचा बेत बदलला होता. पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनानुसारच त्याने तसे केले होते. पौलाने प्रथम होय म्हटले व नंतर नाही म्हटले यासाठी मुझे आभार मानतो. त्याने जे वचन तेथे गाजविले ते तूं पारखले आहेस. माझ्या जगात - जेथे परिस्थिती क्षणोक्षणी बदलत असते तेथे प्रभु तूच माझा खडक आहेस. या जगातही आधी केलेले बेत बदलावे लागतात. प्रभु तुझी योजना काय आहे हे तू मला दाखवून दे. संधिसाधुपणामुळें मी काही बदल करू नये म्हणून मला त्यापासून वाचव. मी रोज तुझ्या समक्षतेत चालावे यासाठी मी प्रार्थना करतो.*

## वाचन

**वचन २० :** *देवाची वचने कितीही असोत, त्याच्या (ख्रिस्ताच्या)*

*ठायी होय हे आहे, म्हणून आम्ही देवाच्या गौरवाला त्याच्याद्वारे आमेन म्हणतो.*

मला असे दिसते की देवाची अभिवचने आमच्यामधून वैयक्तिक स्वरुपाची बनतात. मी विचारतो. 'या वचनामध्ये माझ्यासाठी काही अभिवचन आहे काय?'

## प्रार्थना

*आमच्यामधून प्रभु? देवाचे अभिवचन आमच्यामधून! देवाचे ख्रिस्तामधील अभिवचन? प्रभु ख्रिस्तातील सर्व अभिवचने? होय प्रभु, तुझे आभार मानतो. आज सकाळी तुझ्या समक्षतेत मी होय म्हणतो. हे देवा तू ख्रिस्तामध्ये मला जे दिले त्याची पूर्ण जाणीव नाही. तुझ्या शिवाय माझे जीवन किती रिते असते ह्याची मला कल्पनाही करता येत नाही. आजच्या दिवसाला सामोरे जातांना प्रभु मला केवळ तुझीच गरज आहे. या दिवसातील मला मिळणारी संधी, येणारे परीक्षा प्रसंग आणि घ्यावे लागणारे निर्णय यासाठी मला तुझी गरज आहे.*

आता माझ्या प्रभुची स्तुती-आराधना करण्यात मी थोडा वेळ घालविणार आहे कारण माझे अंतर्याम त्याच्या शांतीने भरून वाहात आहे. माझ्या प्रार्थनांची निश्चित उत्तरे मला ठाऊक नाहीत. पण ते महत्वाचे नाही कारण आता देवाची शांती माझ्या हृदयात वसत आहे. मी माझ्या प्रभुसोबत 'एकत्रित समय' अनमोल असा घालविला आहे. त्याची स्तुती असो. आज मी या दिवसाचा आरंभ करतांना देवाने त्याच्या वचनातून मला मोलवान अन्न दिले आहे. त्यावर माझे मन

व हृदय मनन करील व मी दिवसाला सामोरे जाण्यास तयार राहीन.

म्हणून आपण सतत लक्षात ठेवले पाहिजे की जेव्हा आपण सकाळी देवाजवळ येतो तेव्हा आपला आत्मा शांतीत असावा.

प्रभु येशू ख्रिस्त रोज आपल्याला वैयक्तिकरित्या आमंत्रण देतो हे किती नवल आहे. तुमचे नाव घेऊन तो अत्यंत प्रेमाने म्हणतो या आणि जेवा!

तुझे कधी न बदलणारे सत्य सदा उभे,
जे तुझा धावा करतात त्यांना तू तारतोस
तुझा शोध करणाऱ्यांसाठी तू आहेस चांगला
तू ज्यांना मिळालास त्या सर्वांत सर्व आहे
हे जीवनीभाकर, तुझी चव घेतो आम्ही
तुझे सेवन करण्याची आहे मनी इच्छा
तुझ्या झऱ्याचे पाणी पितो आम्ही
आमचा जीव त्याने होतो ताजातवाना

बर्नाड ऑफ क्लेरवॉक्स

**टीप :** दररोजच पवित्र शास्त्राभ्यासाची गरज नाही परंतु 'एकत्रित समय' मात्र आवश्यक आहे.

## शास्त्राभ्यास

तुम्ही वाचलेल्या शास्त्रभागावर मनन चिंतन करतांना येथे काही प्रश्न दिले आहेत - त्यामुळे तुतचा शास्त्राभ्यास अधिक फलदायक होईल.

हा शास्त्रभाग कोणाबद्दल आहे?

हा शास्त्रभाग कोणाकडे निर्देष करतो?

लेखकाने नेमके कोणते महत्वाचे शब्द वापरलेत?

कोणत्या कालात हा शास्त्रभाग लिहिला गेला?

शास्त्रभाग लिहिण्याचा उद्देश कोणता आहे?

कोणत्या परिस्थितीत हा शास्त्रभाग लिहिला?

यापूर्वी व यानंतर हा शास्त्रभाग किती समर्पक आहे?

*'तूं सत्याचे वचन नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी असा स्वतःला सादर करण्यास होईल तितके कर' (२ तीमथ्य : २:१५).*

# एकत्रित समय

रोज शास्त्रभाग वाचल्यानंतर तुमच्या त्यावरील मननासाठी प्रश्न : या वचनामध्ये :

टाळावयाचे पाप कोणते आहे?

कोणती ताकीद दिली आहे?

कोणती आज्ञा पाळावयाची आहे?

कोणते अनुकरणीय उदाहरण आहे?

कोणते वाईट उदाहरण टाळावे?

देव जो पिता यासंबंधी कोणता नवा विचार आहे?

देव जो पुत्र यासंबंधी कोणता नवा विचार आहे?

देव जो पवित्र आत्मा यासंबंधी कोणता नवा विचार आहे?

सैतानासंबंधी ताजी-नवी दृष्टी दिली आहे काय?

सैतानाच्या दुष्ट हेतूसंबंधी नवा विचार कोणता आहे?

सैतानाच्या गूढ योजनासंबंधी काय म्हटले आहे?

*''वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असूं नका, अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता. परंतु जो स्वातंत्र्याच्या परिपूर्ण नियमांचे निरीक्षण करून ते तसेच करीत राहतो तो ऐकून न विसरणारा होता कृती करणारा होतो व त्याला आपल्या कार्यात धन्यता मिळेल'' (याकोब २:२२,२५).*

# रोजचे प्रार्थनेचे मार्गदर्शन

सुमारे ५० वर्षापूर्वी थॉमस रीस यांनी प्रार्थनेसंबंधी एक पद्धत दिली होती. तेव्हा नुकतेच माझे परिवर्तन झाले होते तेच मार्गदर्शन मी व डॉरथी रोज आमची मध्यस्थीची प्रार्थना करतांना वापरतो.

देवाच्या वचनांचे ग्रहण केल्यानंतर, व ते मस्तकातून हृदयाकडे पोहंचल्यावर आपली प्रार्थना सबब बनते. रोजचा तोचतोचपणा टाळून आपली मागणी इतरांसाठी करतांना नवेपणा जाणवतो व नव्याने आभार मानता येतात. आपल्याकडे मागण्यांची लेखी नोंद नसते परंतु पवित्र आत्मा आपल्याला प्रार्थनेत सहाय्य करतो व आपल्या तातडीच्या गरजा आपण देवापुढे मांडू शकतो.

*''कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभार प्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा'' (फिलिप्पै **४:६**).*

टीप : पुढे दिलेले रोजचे प्रार्थनेचे मार्गदर्शन हे तुमच्या वैयक्तिक गरजा व रोजच्या ज्या काही गरजा असतील त्यासाठी देखील आहे.

| | |
|---|---|
| **सोमवारी**<br>सुवार्तीकांसाठी | ज्या सेवकांच्या कार्यामध्ये देवाला संतोष वाटतो आणि आम्ही त्या कार्यात सहभागी केले जातो. |
| **मंगळवारी**<br>आभार प्रदर्शन | देव कोण आहे हे जाणून त्याचे आभार मानणे व त्याची उपकारस्तुती करणे. त्याने जे दिले व देणार आहे त्याबद्दल आभार मानणे. |
| **बुधवारी**<br>कामकऱ्यांसाठी | पाळक, सुवार्ता प्रसारक, पवित्र शास्त्र शिक्षक आणि सर्व ख्रिस्ती कामगार. |
| **गुरुवारी**<br>कामकाजासाठी | जबाबदाऱ्या, सेवाकार्य, आर्थिक बाबी. |
| **शुक्रवारी**<br>कुटुंबासाठी | आपले स्वतःचे छोटे कुटूंब व आपल्या नातेवाईकांचा मोठा परिवार. ज्यांनी माझ्यावर, डॉरथीवर, आमच्या मुलांवर व नातवंडांवर प्रेम केले असे परिवारातील सर्व लहान थोर. |
| **शनिवारी**<br>पाप्यांसाठी | 'तुमचा देवाचा शोध' याद्वारे होणारे जगातील सेवाकार्य, ज्या लोकांना आम्ही रस्त्यात भेटून साक्ष दिली, ख्रिस्ताशिवाय जगात असलेले आमच्या परिवारातील प्रियजन, इत्यादी. |
| **रविवारी**<br>संत जनांसाठी | असे लोक ज्यांना आम्ही ओळखतो व जे नुकतेच ख्रिस्ताकडे वळले आहेत, प्रार्थनेतील आमचे सहकारी ज्यामुळे आमचे जीवन समृद्ध झाले आहे, ज्या मंडळीचा छळ होत आहे, ज्यांच्या बद्दल आम्ही बरीच माहिती गोळा करीत आहोत आणि आज मंडळीमध्ये संजीवन यावे यासाठी. |




तारणाविषयी देवाचा
जो मार्ग आहे
त्याविषयी अधिक
स्पष्टपणे तुम्हाला
जाणून घ्यायचे
असेल तर हे पुस्तक
उपलब्ध आहे.

# तुमचा देवाचा शोध

***तुमचा देवाचा शोध हे पुस्तक सुवार्ताप्रसाराकरिता तुमचे उत्तम साधन होईल.***

"या पुस्तकासाठी मी वीस वर्षे प्रार्थना केली."
- जॉर्ज वर्वर, संस्थापक ऑपरेशन मोबलायजेशन

***50 भाषेंमध्ये 3 दशलक्ष प्रती छापल्या गेल्यात.***

www.CCIM-Media.com